
# छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९३७ । वर्ष १५ अंक १२
वार्षिक वर्गणी ₹ २००/ मूल्य ₹ ३०

## रसास्वाद विशेषांक



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

# ततः किम् ?

उमेदीत आरंभ हो जीवनाचा, कुलीनाघरी जन्म झाला ततः किम्?
मिळे गोमटे रूप, बुद्धी कुशाग्र, सुविख्यात शाळेत आला ततः किम्?
शिकूनि कला, शास्त्र, विद्या समग्र,परीक्षेत उच्चांक केला ततः किम्?
मिळे वैद्यकी, यांत्रिकीला प्रवेश, व्यवस्थापनी, शासनी वा ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। १ ।।

कबड्डीत, खोखोत निष्णात झाला, नि फुटबॉल, टेनीस जिंके ततः किम्?
सतारीत, गाण्यात, नाट्यात रंगे मिळाल्याच सर्वत्र टाळ्या ततः किम्?
पडू लागली छाप संभाषणी अन् सभा जिंकिल्या भाषणांनी ततः किम्?
कथा, लेख, काव्ये प्रसिद्धीस आली, बहू छापुनी ग्रंथ झाले ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। २ ।।

विदेशी प्रवासास जाणे घडे वा तिथे राहणे नित्य झाले ततः किम् ?
सुखे देखिली, ऐकिली, चाखिली अन् किती हुंगिली, स्पर्शिली ती ततः किम्?
बडी नोकरी वा निजी कारखाना पगारात, सत्तेत वृद्धी ततः किम् ?
पदे भूषवीली पुढारीपणाची मिळाली समाजी प्रतिष्ठा ततः किम् ?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। ३ ।।



गुणी, गौर, सच्छील लक्ष्मीच जैसी अशी बायको लाभलेली ततः किम् ?
गुणी, देखणा आणि कर्तृत्वशाली पती लाभला राजबिंडा ततः किम् ?
फुलासारख्या हासऱ्या, गोजिऱ्या त्या मुलांनी घरा शोभविले ततः किम् ?
घरी फ्रीज, टि.व्ही.नि सोयी सुखाच्या गडी, फोन, दारात गाडी ततः किम् ?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। ४ ।।

अशा शर्यती चालल्या आंधळ्यांच्या तयामागुनी धावणे हे ततः किम् ?
कुठे जात आम्ही ? पुढे काय आहे ? असा प्रश्न का हो पडे ना तुम्हाला ?
जरी लोक येथील कोट्यानुकोटी कसे दैन्य देशात कोणी बघेना ?
करू मातृभूमी जगी श्रेष्ठ ऐशी चला पौरुषाची प्रतिज्ञा करू या
असे दिव्य आव्हान हे विक्रमाचे जिणे राष्ट्रकार्यार्थ हो कांचनाचे ।। ५ ।।

**– डॉ. अशोक निरफराके**

# छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९३७। वर्ष १५ अंक १२

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २७८ वा अंक, वर्ष २४ अंक २

प्रकाशन दिनांक - सौर १० भाद्रपद, शके १९३७/१ सप्टेंबर २०१५


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*


**• संपादक, प्रकाशक, मुद्रक •**
महेन्द्र सेठिया

**• कार्यकारी संपादक •**
शिल्पा कुलकर्णी

**• संपादक मंडळ •**
शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन

**• मुखपृष्ठ •**
राहुल देशपांडे

**• आतील चित्रे •**
राहुल देशपांडे, अंजली पुरंदरे

**• शीर्षक लेखन •**
नावडकर बंधू



**• संपर्क पत्ता •**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org

**ई-मेल** - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



**मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ २००, **द्वैवार्षिक :** ₹ ४००,
**त्रैवार्षिक :** ₹ ५५०,
**दशवार्षिक :** ₹ १,७००.
या विशेषांकाची किंमत : ₹ ३०
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)


## • रसास्वाद विशेषांक • अंतरंग •


४. **संवाद** - महेन्द्र सेठिया

५. **आस्वादाच्या वाटेने...** - शैलजा देशमुख

  ८. **नेत्रसुख** - सुनीला गोंधळेकर

  ११. **भोवतीची गंधवार्ता** - आश्लेषा महाजन

  १४. **ऐकू आनंदे...** - शिल्पा कुलकर्णी

  १७. **जसा स्पर्श पाण्यावरी चांदण्यांचा...** - अंजली कुलकर्णी

  २०. **जय खादाडी** - प्राची कुलकर्णी-गरुड

२५. लेखमाला... **द्रष्टे समाजशिल्पी आप्पा पेंडसे** (लेखांक १)
  **प्रतिभावंत संगीतोपासक आप्पा** - डॉ. व. सी. ताम्हनकर

२९. कथा रसास्वाद... **व्हाइसरायच्या भेटीचा दिवस** - आ. ना. पेडणेकर

३३. कलावंतांच्या नजरेतून कलाकृती...
  **दैवी प्रतिभेचे 'चित्र'रूप** - गोपाळ नांदूरकर
  **मी अनुभवलेली अविस्मरणीय मैफल!** - शर्वरी जमेनिस

३७. ललित... **भाग्ययोग** - मल्हार अरणकल्ले

४१. आस्वाद कवितेचा... **पुस्तकांचं आभाळमन** - शैलजा देशमुख

४४. **छात्र प्रबोधन वर्ष पंधरा आढावा**

४७. कविता... **आस्वादाचे अष्टक** - सुनील शिनखेडे

४८. **छात्र प्रबोधन दिवाळी अंक नोंदणी आवाहन**

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **ततः किम्?** - डॉ. अशोक निरफराके

**याशिवाय -** प्राणिमात्रांनाही संवेदना असतात - डॉ. कांचनगंगा गंधे (१०,१३,१७,१९,२३), आदरांजली, 'आकार'ली चित्रकला (२४), गवत हिरवंच का दिसतं? (२८), किस्से पुलंचे, हसरा कोपरा (४०), थोडीशी गंमत...वैजनाथ दुलंगे (४७), प्रतिसादी वाचकवीर व्हा... (५०)

**तळटिपेतील ओळी -** पद्मभूषण पुरस्कार, जरूर पाहावेत असे चित्रपट, कलाक्षेत्रातील संस्था व जरूर वाचावीत अशी पुस्तकं.


**मुखपृष्ठाविषयी** - रंग-रस-गंध-स्पर्श-नाद यांनी आपले आयुष्य व्यापलेले असते. त्यांद्वारे आपल्याला जगाचे ज्ञान तर होतेच; परंतु निसर्गाने निर्मिलेल्या अनेक गोष्टींतील सौंदर्य जाणवते. आपल्या अनुभवांना एक अनोखे परिमाण लाभते आणि त्यातूनच सर्व कलांची निर्मिती होते. आपण फक्त हे अनुभव संवेदनशीलतेने घेतले पाहिजेत. त्यासाठी स्वच्छ मनाने अनुभवांना सामोरे गेले पाहिजे. या मुखपृष्ठात अनेकविध आकार व रंग निसर्गातील विविधतेचे दर्शन घडवतात तर रंगलेपनासाठी वापरलेला पोत वेगळा दृश्य परिणाम देतो. **- राहुल देशपांडे**


**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**


**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : ए. आर. रेहमान** - संगीत क्षेत्रातील कामगिरीबद्दल (२०१०)

**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

## संवाद

**आस्वाद घेत रसिकतेने जगू इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,**

छात्र प्रबोधनचा हा **'रसास्वाद'** विशेषांक तुम्हाला नक्कीच भावेल असा विश्वास वाटतो. तुम्ही एखाद्या कलेचा, साहित्याचा, खेळाचा, तंत्रज्ञानाचा, निसर्गाचा आणि खरंतर तुमच्या आसपास घडणाऱ्या अनेक गोष्टींचा आस्वाद घेत असता. (घेत नसाल, तर या रसास्वाद विशेषांकाच्या वाचनातून तुम्ही नक्कीच घ्यायला लागाल!) पण म्हणजे तुम्ही नेमकं काय करत असता?

सर्वप्रथम तुमच्या पंचज्ञानेंद्रियांद्वारा भवतालच्या जगाचं तुम्ही ज्ञानग्रहण करत असता. पाहणं, ऐकणं, खाणं, वास घेणं, स्पर्श करणं या क्रिया पंचज्ञानेंद्रियांद्वारे (डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा) तुम्ही करत असता. त्यातून तुम्हाला ज्ञान मिळत असतं. **हे ज्ञान अत्यंत अचूकपणे, बारकाव्यासह, सर्व बाजूंनी मिळवण्याचा प्रयत्न करणं म्हणजे आस्वादाच्या दिशेनं टाकलेलं पहिलं पाऊल!** निसर्गात भटकायला गेलो तर सूक्ष्मातले सूक्ष्म आवाज तुमच्या कानांनी तुम्हाला टिपता येतात का? तसा प्रयत्न तुम्ही जाणीवपूर्वक करता का? २०-२५ वेगवेगळ्या प्रकारचे आवाज तुम्ही टिपण्याचा प्रयत्न कधी केलाय का? की कानाला *'हेडफोन'* लावून गाणी ऐकण्यात किंवा मोठमोठ्याने आरडाओरडा करण्यात तुम्ही मशगुल असता? रंगांच्या विविध छटा, विविध रूपं नुसत्या डोळ्यांनी आपण पाहतो का? की निव्वळ 'कॅमेऱ्याने' भराभर 'फोटो' काढण्यातच तुम्ही दंग! हेच इतर ज्ञानेंद्रियांबाबतही अन् निसर्गाशिवाय इतर गोष्टींबाबतही घडतंय का? उत्तम आस्वाद घेण्यासाठी पंचज्ञानेंद्रियांच्या क्षमता पुरेपूर वापरायला, वाढवायला, ताणायला पाहिजेत.

**यापुढची पायरी म्हणजे मनाची संवेदनशीलता, एकाग्रता, उत्कटता, खुलेपणा वाढवणं.** अभ्यास, परीक्षा, स्पर्धा, क्लासेस, आळस आणि आकर्षणे या चक्रात अडकल्यामुळे भवतालच्या गोष्टींचा आस्वाद घ्यायला वेळ कुठंय? निवांतपणा कुठंय? खरं ना! पण असा निवांतपणा तुम्ही ठरवून काढायलाच हवा. विविध कलांची प्रदर्शनं पाहणं, मैफिलींना जाणं, कलात्मक वस्तू आणि वास्तू पाहणं, रसिक आणि कलाकारांच्या सान्निध्यात राहणं, दैनंदिन जीवनातल्या गोष्टींमधलं सादर्य अनुभवण्याचा प्रयत्न करणं यासाठी तुम्ही आवर्जून वेळ काढायला हवा. यासाठी 'याचा मला लगेच काय फायदा?' हा विचार बाजूला ठेवायला हवा. मन मोकळं आणि खुलं करायला हवं. आस्वाद घेण्याची, सौंदर्य टिपण्याची उत्सुकता, कुतूहल, मनाचा कोवळेपणा असायला हवा. त्याचबरोबर त्या कलेबद्दल थोडंसं ज्ञान मिळवता आलं तर आस्वादाचा रंग खुललाच म्हणून समजा! संगीतातले सूर, ताल, लय कळायला लागले तर तुम्हाला संगीत अधिक आवडायला लागेल. चित्र, प्रकाशचित्र पाहताना त्याचा पोत, रंगांचे मिश्रण, छायाप्रकाशाची जादू, चित्राची मांडणी इ. गोष्टी समजायला लागल्या तर चित्राचा आस्वाद अधिक अर्थपूर्ण रीतीने घेता येईल. त्यामुळे विविध गोष्टींबद्दलची वैशिष्ट्ये समजून घ्यायचा प्रयत्न करण्याने आस्वाद घेण्याला एक प्रकारचा डोळसपणा येतो.

असा शरीर-मन-बुद्धिने आस्वाद घेता-घेता विवेकबुद्धीही जागृत ठेवायला हवी. तुमच्या व इतरांच्या अहिताचं पाहणं, ऐकणं, खाणं इ. टाळायला हवं. त्यासाठी 'चांगलं काय अन् वाईट काय?' याबद्दलची तुमची समज वाढायला हवी. जे तुम्ही पाहू नये, ऐकू नये, खाऊ नये अशा कितीतरी गोष्टी, माध्यमे आणि जाहिरातींद्वारा तुमच्यावर आदळत असतात. त्यापासून आपण पळून जाऊ शकत नाही; पण कशाला 'नाही' म्हणायचं हे मात्र तुम्ही ठरवू शकता. त्यामुळे जे शाश्वत मूल्यांना उजाळा देणारं आहे, कल्पकतेला - प्रतिभेला वाव देणारं आहे, जगण्यातला उत्साह अन् आनंद वाढवणारं आहे, बीभत्स वा कोणाच्या शोषणावर आधारित नाही अशा गोष्टींमधलं सौंदर्य जाणून घेण्याचा प्रयत्न करणं आणि त्याचा आनंद अनुभवता येणं हे जमायला हवं. याबाबत तुमच्या आई-वडिलांशी, शिक्षकांशी गप्पा मारून अधिक समजून घ्या.

तर अशारीतीने सौंदर्यदृष्टी मिळवत, वाढवत, अनेक छोट्या-मोठ्या गोष्टींमधला आस्वाद घेता येणं, 'मध' चाखता येणं ही खरी जगण्यातली समृद्धी! ही मिळवता आली तर कितीही ताण, दुःख, निराशा, कंटाळा येऊ दे त्यावर मात करायला ही आस्वादकाची, रसिकतेची वृत्ती नक्कीच बळ देईल. त्यासाठी उत्तम पाहण्याचा, ऐकण्याचा, खाण्याचा 'रियाज' मात्र करायला हवा अन् भरभरून 'दाद'ही देता यायला हवी. असं करता-करता केव्हातरी इतरांनाही आस्वाद घेता येईल अशी कृती तुमच्या हातून घडली तर!! या सगळ्यासाठी हा 'रसास्वाद' विशेषांक तुम्हाला नक्कीच मदत करेल असा विश्वास वाटतो. यंदाच्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने आपल्या सर्वांची आस्वादक वृत्ती अन् रसिकता वाढीला लागावी अशी कला अन् बुद्धीची देवता श्री गणेशाकडे मनापासून प्रार्थना!

**तुमचा दादा,**

**(महेन्द्र सेठिया)**

**पोकळीतुनी घुमवू आम्ही यशोदुंदुभी गान । स्वच्छ मोकळ्या श्वासासाठी भले पाखडू प्राण।।**

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : शशी कपूर -** अभिनय क्षेत्रातील कामगिरीबद्दल (२०११)

**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे -** दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

# आस्वादाच्या वाटेने...

**– शैलजा देशमुख**



**हिरव्याकंच झाडीची सुंदरता, आकाशाची विशालता, पक्ष्यांचं कूजन आणि समुद्राच्या लाटांमधील नादमयता, फुलांचा नाजूक स्पर्श अन् भूकंपाची उग्र आंदोलनं, पहिल्या पावसाच्या वेळी येणारा मृद्‌गंध अन् वाऱ्याच्या लहरीबरोबर येणारा बकुळीचा गंध, चिंचा-बोरं-आवळ्याची आंबट-गोड-तुरट चव या साऱ्याचा अनुभव आपण डोळे, नाक, कान, जीभ, त्वचा या पंचेंद्रियांनी घेत असतो.**

**रस-रूप-गंध-नाद-स्पर्श या संवेदना आपण वेगळ्या करू शकत नाही. कोणत्याही अनुभवाची चाहूल लागली की, तो आपलासा करण्यासाठी सगळी इंद्रियं सज्ज असतात. तो अनुभव घेण्यातली लय-उत्कटता साधली तर आस्वादाची कृती पूर्ण होते. आणि खूप मोठ्या आनंदाचा साठा आपल्याला गवसतो!**

**विविध कलांचा उगम अशा अनुभवातून होत असतो. त्यांचा आस्वाद घ्यायचा असेल तर आपल्या संवेदना जाग्या हव्यात, मन उत्सुक हवं; थोडंसं सजगही हवं. या विभागातील लेख तुम्हाला आस्वादाच्या वाटेने प्रवास करायला नक्कीच काही दिशा दाखवतील...**

---

दिवाळी जवळ येते. नवे कपडे, फटाके, आकाशकंदील अन् कायकाय! वाजतगाजत दिवाळीची पहाट उजाडते. हवेतला गारवा स्पर्श करीत असतो. दुरून कुणीतरी वाजवलेल्या फटाक्यांचा आवाज कानी पडत असतो. उटण्याचा, 'मोती' साबणाचा, अत्तराचा सुगंध मनात भरून राहातो. वाफाळलेल्या पाण्याचा, नव्या कोऱ्या कपड्यांचा स्पर्श शरीराला सुखावत असतो. प्रत्येकाच्या दारात तेवणाऱ्या पणत्यांचा मंद प्रकाश, दिव्यांच्या माळा, आकाशात झुलणारा आकाशकंदील नजर खिळवून ठेवतो. स्वयंपाकघरात आईची लगबग! चकल्या, चिवडा, करंजी, लाडू अशा एक ना अनेक पदार्थांची ताटं भरण्यात आई मग्न असते. तिखट, गोड अशा विविध चवींचे आकर्षक रूपातले ते पदार्थ जिभेला चाळवतात! दारातल्या रंगीबेरंगी कलात्मक रांगोळ्या डोळ्यांना सुखावतात. दिवाळीच काय, आपले सगळे



**मनाच्या आकाशी किती भास होती। किती कल्पनांच्या नव्या संगती।।**

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : मीरा नायर** – दिग्दर्शन क्षेत्रातील कामगिरीबाबत (२०१२)

**प्रायोजक - बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे**

सण, उत्सव आठवून बघा. रस-रंग-रूप-गंध-नाद स्पर्शातून अनुभवण्याच्या अनेक गोष्टींतून आपण आनंद मिळवण्याचा प्रयत्न करत असतो.

सण-समारंभ तर जाऊद्या; पण रोजच्या ठरलेल्या दिनक्रमातून वेळ काढून आपण गाणी ऐकतो, टि.व्ही पाहतो, एखाद्याच चविष्ट पदार्थाचा आस्वाद घेतो, कपडे खरेदी करताना त्यांचा रंग, पोत याचा विचार करतो, एखाद्या फुलाचा सुगंध भरभरून घेतो, आपल्या भावना व्यक्त करताना कधी मित्राला टाळी देतो, बरेच दिवसांनी भेट झाली तर कडकडून भेटतो, हे लहान लहान क्षण किती आनंद देणारे असतात. अनुभवलंय कधी तुम्ही?

आमच्या शेजारचा अमेय मात्र बरेचदा ''आज किती बोअर होतंय, वेळच जात नाहीये'', ''शी, मला नाही फिरायला आवडत.'' ''आईने केलेला स्वयंपाक नाहीच आवडत मला!'' अशी कुरकुर करत असतो. तुमचं होतं असं कधी? कधीतरी की नेहमीच? अशा कंटाळ्याने आपल्याला घेरून टाकू नये, यासाठी सगळ्या गोष्टीतला आनंद घ्यायला शिकणं म्हणजे आस्वाद घ्यायला शिकणं खूप गरजेचं आहे. फावल्या वेळात आपल्याला आवडेल ते छानसं पुस्तक वाचायचं, सुरांच्या दुनियेत हरवून जायचं, कधी जंगलातल्या पाऊलवाटा शोधत फिरायचं, एखादा सिनेमा भान हरपून पाहायचा, एखादी हस्तकलेची वस्तू करण्यात रमायचं! असं आपल्याला काय करायचं ते ज्याचं त्याने ठरवायचं असतं.

या झाल्या मुद्दाम करण्याच्या गोष्टी! आपल्या रोजच्या जगण्यातही असे अनेक आनंदाचे क्षण आपण मिळवत असतो. पाहा, एखाद्या समारंभाला तुम्हाला जायचं असतं तेव्हा छानशी केशभूषा, वेशभूषा करावी, मोजकेच अलंकार वापरावेत. आपल्या छानशा राहाणीतून पाहाणाऱ्याचा उत्साह द्विगुणित करावा, आनंदात सामील व्हावं असं आपल्याला वाटतं. आई एखाद्या खाद्य पदार्थाची डिश सजवते त्यातही रंगसंगती, कुशल मांडणी असते. पिवळेधम्म वाफाळलेले कांदेपोहे, त्यावर शुभ्र नारळ आणि हिरवीगार कोथिंबिरीची नक्षी... खायला किती छान वाटतं ना! एखादं घर अगदी छोटंसंच असतं. पण घराची नीटनेटकी मांडणी मनाला आनंद देतेच ना! देवघरात आजोबा फुलांची छोटीशी आरासच मांडतात! तिथल्या प्रसन्न वातावरणात मन कसं प्रसन्न होतं. आता या सगळ्या खरंतर कलाच आहेत. रोजच्या जीवनातल्या... सगळ्यांना आनंद देणाऱ्या. नजरेला, मनाला सुखवणाऱ्या! वेगवेगळ्या प्रकारचे, वेगवेगळ्या इंद्रियांनी घेण्याचे हे अनुभव आपल्या रोजच्या जीवनाशी निगडित असतात.

ध्वनी आणि दृष्टीची जाणीव आपल्याला खूप लहानपणीच होते. गंध ही संवेदना ध्वनीपेक्षाही शरीराच्या निकटची. गंध हे अग्रदूत असतात आणि व्यक्ती निघून गेल्यावरही रेंगाळत राहतात. स्पर्श तर अधिकच जवळीक साधतो. आणि चव तर आपल्या शरीराच्या आत विरघळून जाते. मात्र या संवेदना आपण वेगळ्या करू शकत नाही. कोणत्याही अनुभवाची चाहूल लागली की, तो आपलासा करण्यासाठी सगळी इंद्रियं सज्ज असतात. तो अनुभव घेण्यातली लय आपल्याला साधली तर आस्वादाची कृती पूर्ण होते. असा आस्वाद घेणं ही एक सर्वसामान्य कला आहे.

साधा एक चित्रपट पाहायचा म्हटलं तरी काय अनुभवायचं, कधी केलाय विचार? उदाहरणार्थ तुमच्यापैकी अनेकजणांनी नुकताच 'किल्ला' हा चित्रपट पाहिला असेल. 'तो आवडला,' असं तुम्ही म्हणता म्हणजे नेमकं काय होतं? त्याची गोष्ट आवडली; त्यातील मुलांचा अभिनय आवडला. कोकणचं सुंदर दर्शन घडवणारी फोटोग्राफी आवडली. चित्रपट मनात रेंगाळत राहिला की, आपलं मित्रांबरोबर थिएटरमध्ये गेलो, पॉपकॉर्न खात मजा केली आणि विसरूनही गेलो सगळं?

गोष्ट तशी साधी. वडिलांविना पोरकेपण अनुभवणारा तुमच्याच वयाचा चिन्मय आईची बदली झाली म्हणून पुण्याहून कोकणात राहायला येतो. नवीन ठिकाण, नवी शाळा, नवे मित्र, नवे घर यांच्याशी

रंगीत फुलपाखरे सांगतात मला। रसास्वाद घे तू प्रत्येक चांगल्या गोष्टीतला...।।



**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : टी.व्ही. गोपालकृष्णन्** – वादन क्षेत्रातील कामगिरीबाबत (२०१२)

**प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका**

जुळवून घेणं चिन्मयला जड जातं. आईचीही तशीच अवस्था आहे. चिन्मयची नव्या दोस्तांशी होणारी दोस्ती, त्यांनी केलेली धमाल, शाळेतले गमतीदार प्रसंग हे तुम्हाला सगळ्यांनाच आवडले असतील; पण चिन्मयची हळूहळू वाढत जाणारी समज, त्याचं मोठं होणं, सुरुवातीला बदली होऊन नवीन गावी यायला सतत कुरकुरणारा चिन्मय चित्रपटाच्या शेवटी आईची पुन्हा बदली होते तो बदल किती संमजसपणे स्वीकारायला तयार होतो हे जाणवलं का तुम्हाला? भर पावसात समुद्रकाठच्या किल्ल्यात मित्र आपल्याला एकटं सोडून गेले म्हणून चिन्मयला वाटणारी भीती, दु:ख, अपमान, नंतर एका नाविकासोबत एकट्याने केलेली सुमुद्रातली भटकंती, त्याच्या भावना व्यक्त करणारी छोटीशी भावकविता तुम्हाला अस्वस्थ करून गेली का? ही झाली काही सौंदर्यस्थळं! सिनेमाचं चित्रीकरण, अभिनय, सुंदर कथा, ध्वनिमुद्रण इ. सर्व घटकांचा दिग्दर्शकाने घातलेला मेळ - एक सुंदर चित्र अगदी तुम्हाला आपलंसं वाटेल असं एकसंध चित्रण तुम्ही अनुभवलंत का?

असे अनुभव तुम्ही घेतही असता; पण नकळत. आपण जाणीवपूर्वक उघड्या डोळ्यांनी, उघड्या कानांनी, उघड्या मनाने असं एखादं गाणं, चित्र, एखादा सिनेमा, नाटक वा पुस्तक वाचायला शिकू तेव्हा मिळणारा आस्वादातला आनंद खूप मोठा असेल.

गाणं तर आपल्या रोजच्या जगण्याशी खूपच जवळचं असतं. अगदी बाळासाठी म्हटलेलं अंगाईगीत, घरकाम करताना आईचं गुणगुणणं, वर्गात चाल लावून ताला-सुरात म्हणतो त्या कविता... सुरांची भाषाही शब्दांपलीकडची असते. आपलं राष्ट्रगीत 'जन-गण-मन' कानावर पडतं तेव्हा *थिएटरमध्ये* जमलेलं *पब्लिक* नि:शब्द उभं राहातं त्यावेळी नकळत डोळे भरून येतात. माझ्या देशाचं गाणं आहे हे... माझ्या देशाचा मला अभिमान आहे. असं कितीतरी शब्दांच्या पलीकडचं मनात दाटून येतं. कधी चक्क डोळ्यात पाणी येतं. लय, ताल ही निसर्गाची देणगी आहे. त्यामुळे नृत्य पाहाताना, गाणं ऐकताना आपण नकळत ताल धरतो.

कलेच्या वेगवेगळ्या अभिव्यक्तीत आपल्या मनातल्या अनेक अस्फुट भावना आपल्याला भेटत असतात. छानसं चित्र समोर आलं की, भले चित्रकलेच्या तंत्राचा आपल्याला फारसा परिचय नसतो; पण कधी त्यातली रंगसंगती, कधी चित्राचा विषय, कधी चित्रातला मूड, कधी त्यातला नाजूकपणा, कधी वास्तवाचं दर्शन मनाला भिडतं. हे समजायला आपण चित्रकार असायची गरज नसते. ते आपल्याला जाणवत असतं... फक्त त्यासाठी सगळ्या संवेदना जाग्या असायला हव्यात.

आता आपली प्रत्येकाची आवडनिवड वेगळी असते, त्यानुसार आवडणारं गाणं, चित्रपट, नाट्य, शिल्प भले वेगवेगळं असेल; पण त्यात काहीतरी सौंदर्य असतंच. एखाद्या प्रसन्न वृत्तीच्या माणसाला उजळ रंग, प्रसन्न गाणं, विनोदी पुस्तक, चित्रपट आवडतो, उगवतीच्या सूर्याचा प्रकाश आवडतो तर एखाद्या अंतर्मुख व्यक्तीची आवड याच्या उलट असेल. पण प्रत्येकवेळी त्यात काहीतरी समज असणं महत्त्वाचं.

एखादी कथा तुम्हाला आवडते म्हणजे नेमकं काय? तिचं कथानक, व्यक्तिचित्रण, प्रसंग, सुरुवात-शेवट, भाषा यातलं मला काय भावलं याचा विचार करता येणं, त्याचा आनंद घेता येणं म्हणजे आस्वाद! पुस्तकांच्या जगात प्रवेश करून आपल्याला जे आवडेल ते जर सजगपणे वेड्यासारखं वाचायला लागलं ना की, हळूहळू आपोआपच उमजायला लागतं त्यातलं सौंदर्य! आता तुम्हाला वाटेल सजगपणा आणि वेड किती विरोधी शब्द; पण त्यांची सांगड घालता आली की, पुस्तकं आपल्याला वेगळ्या विश्वात घेऊन जातात. गाण्याचे सूर मनाला आनंद देतात. एखाद्या वक्त्याचं प्रभावी भाषण ऐकताना आपण तल्लीन होऊन जातो... वाऱ्याबरोबर येणारी सुगंधाची झुळूक नाकाला जाणवते. समोर आलेला चविष्ट पदार्थ अधाशासारखा न खाता रसनेवर घोळवत आस्वाद घेण्यातला आनंद समजू लागतो.

इतकं सगळं झाल्यावरही एक प्रश्न उरतोच.



**कविता म्हणजे रंगपंचमी, शब्दार्थ रंगविणारी। कविता म्हणजे शब्ददिवाळी, लक्षदीप पेटवणारी।।**

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : जतिन दास** - चित्रकला व शिल्पकला क्षेत्रातील कामगिरीबद्दल (२०१२)

**प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड**

कशासाठी हा खटाटोप? काय पाहावं? काय ऐकावं? काय अनुभवावं? असे प्रश्न कशासाठी? त्याचं अगदी सोप्पं समजणारं उत्तर म्हणजे स्वत:च्या आनंदासाठी! पण आनंदाचीसुद्धा प्रतवारी असते. आपल्या इंद्रियांना तात्पुरता मिळणारा आनंद आणि मनाला, बुद्धीला होणारा आनंद एकाच प्रतीचा नसतो. आस्वाद घेण्याची कला एकदा आत्मसात झाली तर जीवनातला एकसुरीपणा, कंटाळवाणेपणा आपोआप गळून पडतो. जी कला, जी पुस्तकं, चित्रं, नाटकं, जे संगीत आपल्याला आवडेल त्यात रमायला आपण शिकलो तर नकळत प्रत्येक गोष्टीतलं सौंदर्य आपल्याला दिसायला लागतं.

मित्रांनो, आताशा तुम्हाला मित्रांमध्ये रमायला जितकं आवडत असेल तितकंच कधीतरी एकटं असावंसंही वाटत असेल. 'मी' कुणीतरी वेगळा आहे. हे जाणवायला लागलं असेल. अशावेळी आपल्या व्यक्तिमत्त्वातलं काहीतरी पकडायला शिकायला हवं. बरेचदा आपण नुसतेच कॉम्प्युटर गेम्स किंवा इंटरनेटच्या मायाजालात अडकतो. 'मला गावंसं वाटतंय, वाचावंसं वाटतंय, भटकंती करावीशी वाटतेय,' असं वेड लागण्याचं हे वय निसटून गेलं की, मोठेपणी उरतात ती रुक्ष व्यवहारी चौकटीत जगणारी मनं!

आपल्याला विशेष आवड असणाऱ्या एखाद्या कलेचा थोडाफार जरी आस्वाद घेता यायला लागला तर आपलं व्यक्तिमत्त्व हे Receptive होईल. संगीताची जाण असली तर भोवतालच्या साध्यासुध्या आवाजातही संगीत ऐकू येईल. चित्रकलेची जाण वाढवली तर पुस्तकाच्या मुखपृष्ठावरचं चित्रसुद्धा आपण न्याहाळून पाहू. आपला पुस्तकांचा कप्पाही नीटनेटका ठेवावा हे नकळत वाटू लागेल. तुम्हाला एकदा कलात्मक दृष्टी मिळाली की, त्याचबरोबर नेहमीची शिस्त विसरून मुक्तपणे भटकण्यातला आनंदही समजायला लागेल.

*एक सांगू, गर्दीतून जाताना कानावर सूर पडले, खुशाल थांबावे,*
*भोवतालच्या गोंगाटाला विसरून जावे...*
*वाऱ्यावरून येणाऱ्या प्राजक्ताच्या गंधात बुडून जावे...*
*आकाशातल्या ढगात वेगवेगळे आकार शोधावेत...*
*एखादा सुंदर पदार्थ चाखताना त्याची चव जिभेवर घोळवावी...*

असे सर्व व्हायचे तर मनाचे दरवाजे उघडे ठेवायला हवेत; प्रत्येक अनुभव रसिकतेने घ्यायला हवा. असे झाले तर कध्धी कध्धी कंटाळा म्हणून येणार नाही. कलावंत नाही झालो तरी आनंद मिळवायला एवढे नक्कीच पुरेसे असते!

●●●

**- शैलजा देशमुख**
सी - १०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २,पुणे 411009
sgdeshmukh50@gmail.com


# नेत्रसुख

**- सुनीला गोंधळेकर**

गणपतीचे दिवस होते. गणपती पाहायला गर्दी लोटली होती. त्या गणपतीच्या गर्दीत रमा हरवली. बरोबर असलेले आई-बाबा, दादा कोणीच दिसेना आणि रडायलाच यायला लागलं तिला. खूप खूप रडायला यायला लागलं. तिला रडताना पाहून एका काकांनी तिला जवळच्या पोलिस चौकीत आणून सोडलं. रमाला कळेनाच आता काय करावं? ती आणखीनच रडायला लागली. कोणी खायला वडा आणला; पण जीभ नकोच म्हणाली. कोणी उकडू नये म्हणून पंखा लावला; पण शरीर त्या गार स्पर्शालाही नकोच म्हणालं. कोण कोण काय काय विचारत होतं; पण कान नकोच म्हणाले काहीही ऐकायला. काही वेळानं पोलिस स्टेशनच्या दारात आई-बाबा आणि दादा दिसले तसे रमाचे डोळे सुखावले. रमाला त्यांच्या नजरेतून माया, आपलेपण निर्मळपणे दिसत होतं. आपलं मायेचं माणूस डोळ्यासमोर आलं की कसं छान, आश्वासक वाटतं. बघूनही कळत होतं की, हे रमाचेच आई-बाबा असले पाहिजेत.

**कळसावरती हेमझळाळी खाली फुलांचा सडा। आशेच्या किरणांनी द्रवते हिरवी काळीजकडा।।**

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : मंगेश पाडगावकर** - साहित्य क्षेत्रातील कामगिरीबाबत (२०१३)
**प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे**



पोलिसांना सांगायलाही लागलं नाही ते कोण आहेत ते. डोळ्यांना किती किती कळतं, नाही?

दिवसभर डोळे सारखे कामात असतात. सारखं काही ना काही पाहात असतात, टिपत असतात. घरात जेवायला कितीही पदार्थ केलेले असले तरी छान रंगसंगती साधून सजवून ठेवलेल्या पदार्थाकडे डोळे आपोआप वळतात आणि तोंडाला पाणी सुटतं. सुवाच्य, सुंदर अक्षरात लिहिलेल्या वहीची नोंद डोळे पटकन घेतात. नवीन रंग दिलेली इमारत पटकन लक्ष वेधून घेते. टपोऱ्या फुलांकडे नजर जाते. सुरेख पूजा बांधलेली देवाची मूर्ती नजर खिळवून ठेवते. दिव्यांचा झगमगाट डोळे दिपवतो. आजीचा सुरकुतलेला चेहरा दृष्टीला पडताच लहानपण आठवतं. रंग भरून प्रमाणबद्ध काढलेली घरासमोरची साधीशी रांगोळी नजरेत भरते. आपणच केलेल्या नीटनेटक्या प्रकल्पाकडे पाहात राहावं असं वाटतं. भूमितीमधे काढलेल्या सुबक आकृत्या पाहात राहाव्या अशा दिसतात. सुंदर काय ते डोळ्यांना माहीत असतं आणि सुंदरतेकडे डोळे आपणहून जातात. त्यालाच तर आपण 'नेत्रसुख' म्हणतो. चांगलं, रसरशीत, सुंदर असं काही सकारात्मक दिसलं की, मनाला जाणवतं ते नेत्रांच्या वाटेनं आलेलं सुख. सादर्याच्या सुखाची लयलूट करायला आपले डोळे सदैव तयार असतात.

नेहमी सतत गप्पा मारणारा मिहीर जेव्हा सहलीला जातो ना तेव्हा अगदी गप्प गप्प असतो. गावाला जाताना, सहलीला गेल्यावर तो गाडीच्या खिडकीतून बाहेर बघत राहतो. निसर्गातल्या रंगांची मनोहारी उधळण पाहून नेत्रसुख मिळतं. नदी, ओढे, धबधबे यातून खळाळणारं स्वच्छ पाणी, झाडांच्या हिरव्या छटा, डोंगरमाथ्यांची भव्यता, टुमदार घरांची लालचुटुक छपरं, वळणदार रस्ते अशा निसर्गानं रेखाटलेल्या सुंदर चित्रांनी मन हलकं होतं. चांगल्या चित्रातल्या रंगांच्या लहानशा रेषा नजर टिपून घेते. लक्ष देऊन पाहिलं की, देवळातल्या कोरीव कामात चितारलेल्या मूर्तींचे बारकावे नजरेत भरतात. डोळे रंग न्याहाळतात, रेषा पाहतात, आकार समजून घेतात, अंतरसुद्धा जाणतात. डोळयांना त्रिमिती समजते, प्रमाणबद्धता समजते, तसाच वस्तूंचा पोतही कळतो.



**खळाळणारे झरे सानुले, हिरवी हिरवी राई। गिरिशिखरांचे उन्नत सुळके, मनास मोहून घेई।।**



**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : जसपाल सिंग भट्टी–** विनोदी कलाकार, अभिनय क्षेत्रातील कामगिरीबाबत (२०१३)

**प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली**

**प्राणिमात्रांनाही ‘दृश्य’ संवेदना असतात...**

* फुलपाखरं आणि किड्यांच्या डोळ्यांमध्ये खूप लहान लहान भिंगं असतात. त्या भिंगांचा मिळून त्यांचा एक ‘डोळा’ होतो. या भिंगांना ‘ओमॅटिडिया’ म्हणतात. या भिंगांमुळे एकाच वेळेला या किड्यांना अनेक दिशांना बघता येतं, एवढंच नव्हे तर त्यांनी ‘रंग’ व ‘हालचाल’ टिपता येते. फुलापासून निघणारे *अल्ट्राव्हायोलेट* किरण फुलपाखराचे डोळे अगदी सहज पाहू शकतात. त्यामुळे फुलपाखरांना फुलांचे रंग कळतात.

* वटवाघळं रात्री उडत असली तरी त्यांचे ‘डोळे’ त्यांना ‘भक्ष्य’ ‘बघण्यासाठी’ उपयोगी पडत नाहीत. ते तोंडातून विशिष्ट आवाज काढतात. त्या ‘ध्वनीलहरी’ हवेतून भक्ष्यापर्यंत पोहोचतात. ध्वनीलहरी भक्ष्यावर आपटल्या की पुन्हा वटवाघळापर्यंत परत येतात, म्हणजेच त्या ‘बूमरँग’ होतात, हा ‘प्रतिध्वनी’ वटवाघळाला भक्ष्यापर्यंत पोहोचवते, त्यामुळे भक्ष्य त्यांना ‘दिसते’! यालाच ‘एको लोकेशन’ असेही म्हणतात.

* ज्या प्राण्यांची उत्क्रांती अंधारात झाली त्या प्राण्यांचे डोळे फारसे विकसित झाले नाहीत किंवा त्यांना ‘डोळा’ हे इंद्रियच नाही. गुहेत राहणारा ‘केव्ह फिश’ (अॅस्टीयानॅक्स मेक्सिकॅनस) डोळ्यांनी ‘बघण्याची’ क्रिया विसरलाच आहे. त्यामुळे डोळ्याच्या ठिकाणी नुसताच गोल असतो; पण तरीही त्याला प्रकाशाचे ज्ञान ‘पिनल ग्लॅन्ड्स’च्या साहाय्याने होते. त्यामुळेच हे मासे डोळे नसले तरी प्रकाश ‘बघू’ शकतात.

डोळ्यांनी पाहूनच कळतं एखादी वस्तू मुलायम आहे, खरखरीत आहे, दाट आहे का पातळ आहे ते. लहान बाळाच्या अंगत्वचेचा कोवळेपणा नुसता पाहूनही कळतो. तसाच दगडाचा कठोरपणाही समजतो डोळयांना. पाण्याचं वाहणं समजतं डोळ्यांना आणि डोंगरांचा भक्कम स्थिरपणाही समजतो.

बारकावे टिपण्यात तर डोळे माहीर असतात. पलंगावरची बारीकशी सुरकुती डोळ्यांना खुपते. दाणे भाजल्यावर काळा झालेला दाणा नजरेतून सुटत नाही. ड्रेसवर पडलेला बारीकसा डागही नजरेतून निसटत नाही. मित्राच्या किंवा मैत्रिणीच्या चेहऱ्यावर उमटलेली नाराजी दिवसभर मनात सलत राहते. डोळ्यांनी वाचायची कला माणसाने किती विकसित केली आहे. पुस्तकातली अक्षरं तर वाचता येतातच; पण त्याशिवाय आणखी कितीतरी वाचत असतो आपण. डोळ्यांतून माणसं वाचता येतात, प्रदेश वाचता येतात, परिस्थितीचे ताणे-बाणे वाचता येतात. कणखर मनं वाचता येतात, अगतिक डोळे वाचता येतात, जितक्या बारकाईने वाचता येईल भोवताल तितका अधिक समजत जातो. जितक्या आत्मीयतेने वाचता येतं ना, तसतशी माणसं अधिक उलगडत जातात.

पण डोळे मोठे लबाड. जे समोर येतं ते सगळं तसंच्या तसं पाहात नाहीत काही ते. डोळे तेच बघतात जे आपल्याला बघायचं असतं. समोर असूनही न बघण्याचं स्वातंत्र्य डोळे सतत घेतात. म्हणून तर आईला दिसला तरी आपल्याला पसारा दिसतच नाही. बाबांना पेपरातल्या लाल फुल्या दिसतात; पण आपल्याला फक्त बरोबरच्या खुणा लक्षात राहतात. मोठी माणसं अनेकदा म्हणतात, मी पाहिलं पण मला दिसलं नाही. हरवलेली पट्टी शोधली, दिसली तरी कधी कधी दिसतच नाही त्याला आपण तरी काय करणार? पाहणं आणि दिसणं यात फरक आहे. डोळे पाहू शकतात; पण मनाला किंवा बुद्धीला ते दिसतं, जाणवतं, समजतं, भावतं, आवडतं. डोळ्यांनी पाहिलेलं जेव्हा बुद्धीला भावतं ना, तेव्हाच डोळे पाणावतात. म्हणून तर महिनाभर वारीत पायी पायी वाटचाल करत पंढरीरायाजवळ पोहोचलं की, विठूमाऊलीचं दर्शन होताच भक्तांचे डोळे सुखावतात, विसावतात.

डोळ्यांकडे एक अगदी वेगळी ताकद आहे. शब्दांशिवाय संवाद साधण्याची. डोळे इतके बोलके होतात की, शब्दांची गरजच राहात नाही अनेकदा. म्हणून तर पेपरला निघताना आईकडे पाहिलं तरी पुरतं; पण प्रगतिपुस्तक आल्यावर आई-बाबांच्या डोळ्यांना डोळा देता येतो का ? हा खरा प्रश्न.



वरती मंडप निळ्या नभाचा खाली हिरवागार गालिचा। मुक्त अंगणी निसर्गलीला निरखित हरखुनि जाऊ ।।



**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : डॉ. कनक रेळे** – नृत्य क्षेत्रातील कामगिरीबाबत (२०१३)

**प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर ट्रस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५**

मैत्रिणी-मैत्रिणींमधलं, मित्रा-मित्रांमधलं खास हितगुज डोळ्यांतूनच होतं की! डोळे खुणा करतात आणि समोरच्याला लगेच कळतं. सुमेधने डोळे मोठे केले की साहिल गप्प होतो. कविता आणि सविता यांच्यात नजरानजर झाली की दोघी एकदम वर्गाबाहेर पडतात.

पण या अवतीभोवती पाहात राहून सतत भवताल टिपून घेत राहणाऱ्या डोळयांबरोबर आणखीही वेगळे, खास डोळे आहेत आपल्याकडे. हे विशेष डोळे दिसत नाहीत आपल्याला; कारण ते बाहेर नाही तर आत बघतात. हो. स्वतःच्या आत, अगदी आत, खोलवर, स्वतःकडेच पाहणारे अंतःचक्षू. दिवसरात्र स्वतःवरच लक्ष ठेवणारे आणि स्वतःला आणखी चांगलं, आणखी सक्षम करायला तत्पर असणारे अंतःचक्षू. अंतःचक्षू आपल्या स्वतःची आपल्याच डोळ्यात जी प्रतिमा तयार करतात ना, ते खरं नेत्रसुख. तुम्हीसुद्धा अनुभवत असाल असं नेत्रसुख. स्वतः ठरवलेलं काम वेळेत पूर्ण करून, एखादं नवं कौशल्य शिकून, स्वतःच्या क्षमतांचा कस लावून आपल्याच नजरेत तुम्ही आपली प्रतिमा उंचावत असणार. तुम्हीही असं मनाला शांत करणारं, मनाला उभारी देणारं नेत्रसुख मिळवत असणार, खचितच.

●●●


**– सुनीला गोंधळेकर**
'श्री' बंगला, तुकाराम सोसायटी, संतनगर, अरण्येश्वर, पुणे-९

---

# भोवतीची गंधवार्ता

**– आश्लेषा महाजन**

दूर कुठेतरी रानावनात पाऊस पडला नि वाऱ्यासोबतची गंधवार्ता पंचक्रोशीत दरवळली. त्या हव्याहव्याशा मृद्‌गंधानं चराचराला नवा हुरूप दिला. गंध हा शारीर अनुभव असतो. अगदी आतला-देहस्वी. नाकावाटे आपल्या हृदयापर्यंत पोचणारा नि मग मेंदूतही लहरणारा. तो मातीचा गंध मी अधीरतेने हुंगत राहिले. तर चिरंजीव म्हणाला, ''हा काही मातीचा वास नसतो. मातीमध्ये कोशात (शेलमध्ये) दडून बसलेले सूक्ष्म जीवाणू पावसाने जागे होतात, कोशातून बाहेर येतात, त्याचा तो गंध असतो...''





रानामधले हिरवे घरटे जपून ठेवा। सजीव सळसळ मुठीत घेऊन श्वास भरावा।।

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : अनिता देसाई –** लेखन क्षेत्रातील कामगिरीबाबत (२०१४)

**प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे**

कुठल्याशा विज्ञान-मासिकातील बौद्धिक होतं ते. ते जरी खरं असलं तरी मृद्गंधाची मजा काही औरच. मृद्गंध म्हणजे पावसाची नांदीच.

त्यानंतर कधीमधी येतो- धुळीचे लोट घेऊन येणारा आगंतुक वळीव. त्याचा गंध जरा वेगळाच बरं का. मृद्गंध+रानावनातला ओला-हिरवा सुवास+ फळाफुलांची घमघम+ धुरळ्याचा मातकट गंध.. असे सारे एकत्र केल्यावर येतो तो त्या अतिथी वळिवाचा सुवास. वादळवारा सुटला की, झाडांवर झाडे घासू लागतात. त्या घर्षणातून त्या झाडांचा विशिष्ट गंधही त्या मृद्गंधात मिसळलेला असतो.

गंध आपल्याशी बोलत असतो. नकळत तो काही संदेश देतो, सुचवतो, हाक मारतो. रात्री रस्त्यानं जाताना एखाद्या झुळकीसरशी रातराणीचा मंद गंध येतो, धुंद करतो. रातराणी म्हटलं की, मला आठवते- आजीची परसबाग. रातराणीभोवती साप विळखा घालतो, हा आजीचा गैरसमज मी कसा दूर केला होता, तेही आठवतं. गंधाचं आपल्याभोवती असणं आपण नीट अनुभवायला हवं. म्हणजे पाहा, कुठूनतरी गुळासारखा गोड मातकट वास येतो. तो औदुंबराच्या फळांचा असतो. तो वास दाखवतो- औदुंबराचा अतोनात बहर नि त्याच्यावर घोंघावणाऱ्या आळ्या-किड्यांच्या-पक्ष्यांच्या येरझाऱ्या. आजी म्हणायची, 'औदुंबर आहे, म्हणजे खाली भरपूर पाणी असणार जमिनीत.' गंधांच्या सोबत अशा कितीतरी आठवणीही तरंगत येतात.

नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुवास घेत वरच्या वर्गात गेल्यावर ध्यानात येतं की, सगळ्या शाळेलाच एक कुठलासा नवा वास येतोय. कारण नव्या वर्षात शाळेला दिलेल्या रंगाचा भलताच कोरा कोरा वासही भरून वाहत असतो.

एकदा बालपणी आम्ही एका निसर्ग सहलीला गेलो असताना डोळे बांधून गंध ओळखायचा खेळ खेळत होतो. आमचे जीवशास्त्राचे सर कुठलेसे पान वा फूल नाकापाशी धरायचे नि काही *क्ल्यू सुद्धा* द्यायचे. त्यावेळी लिंबाच्या पानाचा आंबटसर पण बहारदार वास, निलगिरीच्या पानाचा मस्त गंध, बकुळीच्या नि सोनचाफ्याच्या फुलांचा गोड-मत्त सुवास आम्ही सहज ओळखला. मघईच्या पानाचा नि तमालपत्राचा वास मात्र आम्हाला मुळीच ओळखता आला नाही. सरांनी सडलेल्या कंदमुळापासून अगदी पक्ष्यांच्या विष्ठेच्या वासाचाही आम्हाला परिचय करून दिला. जंगलामधल्या मोहाच्या फुलांच्या वासानं आम्हीही मोहित झालो.

गंधांच्या नानाविध गोष्टी करण्याची मग स्पर्धाच लागली. कोणी म्हणे कस्तुरी मृगाच्या बेंबीमध्ये सुगंधी पदार्थ असतो, तीच कस्तुरी. पण त्या कस्तुरीचा म्हणे त्याला पत्ताही नसतो. कोणी म्हणे दवणा जातीच्या नागाचाही विशिष्ट दर्प येतो. कीटकांना आणि प्राण्यांनाही गंधाची भाषा फार छान कळते. गंधाच्या माध्यमातून संदेश देत मधमाशा मधाने पोळी भरतात. प्राण्यांच्या मूत्राच्या वासावरून माग काढत ते परस्परांना शोधतात. कुत्र्यांच्या घ्राणेंद्रियाच्या मदतीने गुन्हेगाराला पकडले जाते, हे तर आपल्याला ठाऊकच आहे. अशा बऱ्याच जोड्या नि गाळलेल्या जागा मी मनातल्या मनात भरल्या.

आमचा हा खेळ आणि गप्पा चालू असताना सागर मात्र हिरमुसलेला होता. त्याला म्हणे कुठलाच गंध ओळखता येत नव्हता. त्याच्यामध्ये गंधहीनतेचा दोष होता म्हणे. सर्दी झाल्यावर जसा आपल्याला वासच येत नाही, तसे नेहमीच होते सागरला. रंगांधळेपणा असतो, तसा 'गंधांधळेपणा' असतो काहींमध्ये. अरेरे! केवढ्या मोठ्या संवेदनांना तो मुकत होता!

आमच्यासाठी मात्र ती वासांची सहल अनेकविध वासांचे भान देणारी आनंदयात्राच ठरली.

अशाप्रकारे आमचा गंधांचा अभ्यास इतका झाला की 'नवरात्रात भोंडला खेळून झाल्यावर, खिरापतीला काय गं?', असं विचारल्यावर डोळे बांधून वासावरून खाऊ ओळखायचा नवा पायंडाच आम्ही पाडला. त्यातून आमची गंधसंवेदना भलतीच ताजी झाली.

एकेका माणसाला सुद्धा विशिष्ट वास लगडलेला



पंखी येता बळ। लाभू दे पोकळी। चोचीत मोकळी। धून भरे।।



**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : कमल हसन-** अभिनय, दिग्दर्शन, पटकथा लेखन यांबद्दल (२०१४)

**प्रायोजक - चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे**

**प्राणिमात्रांनाही 'गंध' संवेदना असतात...**

* फुलपाखरं, किडे यांना 'वासा'चे ज्ञान असते. त्या कामी त्यांना त्यांचे 'पाय' व 'मिशा' मदत करतात. फुलपाखरांच्या मिशांवर छोट्या गोळ्यासारखा एक 'सेन्सर' असतो, त्यामुळे त्याला फुलाचा/फुलातल्या मधाचा 'वास' येतो, त्यामुळे ते फुलाकडे आकर्षिले जाते, एवढेच नव्हे तर एखादं विषारी झाड/फूल असेल तर तेही त्याला कळतं !

* अस्वल वासाच्या बाबतीत एकदम 'चॅम्पियन' (तरबेज) समजले जाते. अस्वलाचं नाक मोठं असतं, शिवाय त्याच्या नाकपुड्या आणि आतल्या भागातही कातडीच्या खूप घड्या असतात. त्यांच्यावर असलेल्या 'विशिष्ट उंचवट्यामुळे' त्यांना वास येतो. म्हणूनच 'वास' हुंगत हुंगत अस्वल भक्ष्य पकडते.

* बहुतेक पक्ष्यांना वासाचे ज्ञान फारसे नसते. पण 'अलबॅट्रॉस' हा समुद्रपक्षी त्याच्या चोचीवरच्या लांब नाकामुळे समुद्रावर तरंगणाऱ्या भक्ष्याचा 'वास' घेऊ शकतो व त्याची शिकार करू शकतो.

* खेकड्याला वासाचे ज्ञान त्याच्या तोंडाजवळच्या 'मिशांमुळे' होते. या मिशांवर 'टूथब्रश' सारखे असंख्य 'केस' असतात. जेव्हा खेकडा श्वास घेतो, तेव्हा तो त्याचे 'हात' पाण्यात मारतो. 'हात' पाण्याच्या खाली गेले की 'टूथब्रश' 'उघडतो', त्यातून पाणी आणि वास आत जातो, त्याचवेळेस तो स्सऽस्स ऽऽ स्स ऽऽऽ स्स आवाज काढतो. जेव्हा खेकड्याचा 'हात' पाण्याच्या वर येतो तेव्हा हा 'टूथब्रश' बंद होतो; आणि आत तो 'वास' व पाणी राहते. खेकड्यामध्ये 'वासाचे मान' असणाऱ्या काही पेशी असतात. त्यांच्यापर्यंत हा वास पोहोचवला जातो, त्यामुळे जवळपास काय आहे ते तो ओळखू शकतो.

असतो. डोळे मिटूनही ओळखावं, कोण आहे ते! तुम्हालाही जाणवेल की तुमच्या आजीच्या पदराला खास गंध असतो, आईच्या हाताला विशिष्ट सुगंध असतो..मला तर एक मजेदार कविताच सुचली मग–

*कळते कसे?*
*आज्जी असल्याचं लग्गेच कळे*
*देवघरातल्या उदबत्तीमुळे...!*
*आईची चाहूल सांगतो पाहा–*
*दरवळणारा आल्याचा चहा..!*
*ताईचे येणे कळते कसे?*
*घमघम अत्तर लावते पिसे...!*

गंधांच्या दुनियेत बऱ्याच गमती असतात. तांदळाला आंबेमोहराचा वास येतो, तर एका विशिष्ट हळदीला आंबेहळद म्हणतात, कारण तिला आंब्याचा गंध असतो. निसर्गाची ही किमया अनुभवायला नाक मात्र जागं हवं.

मित्रांनो, एखादा गंध आला की विशिष्ट आठवणी येतात. बालपणी दुपारपासूनच दाण्याच्या कुटाचा, ताज्या कोथिंबिरीचा नि हिरव्या मिरचीचा वास यायला सुरुवात व्हायची, तेव्हा शनिवारचा उपवास करणाऱ्या बाबांसाठी साबुदाण्याची खिचडी तयार होत असल्याची कुणकुण आम्हा पोरांना लागायची नि आम्ही खिचडी करणाऱ्या आज्जीच्या आसपास घुटमळू लागायचो. आजही घराच्या फाटकापासूनच छाती भरून वास घेत चिरंजीव येतो नि डोळे मिटून विचारतो, 'पनीर टिक्का मसाला?' किंवा 'भोपळ्याचे घारगे?' तेव्हा माझ्यातल्या अन्नपूर्णेला छान वाटत असेल ना? गंधावरून पदार्थ कसा झालाय, हे सुग्रणीला नि खवैय्यालाच उमजतं. पदार्थांचे छान छान वास आले, की तुमच्या पोटातले कावळेही ओरडू लागतात, हो ना? शेजारच्या घरात पावभाजीचा बेत आहे हेही लग्गेच नाकाला कळते. आंब्याच्या मोसमात हापूस आंबा पिकलाय, हे घरादारापासून लपून राहात नाही आणि फणसाचा घमघमाट तर चक्क डोक्यात जातो!

आणखी एक गंमत तुमच्या ध्यानात आलीय का? विशिष्ट काळाला विशिष्ट गंध असतो. श्रावण महिन्याला प्राजक्ताचा गंध लगडलेला असतो, तर भाद्रपदाला गणपतीच्या मोदकांचा सुवास असतो. कार्तिक महिन्यात दिवाळीच्या फराळाचा खमंग वास नि सुवासिक अभ्यंग स्नानाचा गंध दरवळत राहतो.



दहा दिशा या खुल्या भोवती, फिरे मोकळे वारे। सांगा मजला कशा अडवतील, भिंती, खिडक्या, दारे।।

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : थेटाकुडी हरिहर विनायक्रम** – 'घटम्' वादनातील कामगिरीबाबत (२०१४)

**प्रायोजक – सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे**

तर वसंत ऋतूला मोगऱ्याचा गंध असतो. गंधाच्या जशा आठवणी असतात, तसा आठवणींचाही गंध असतो. शेवग्याच्या आमटीचा वास आला की, मला बालपणीच्या नारायणगावातील घराच्या परसातला शेवगा, चिंच, डाळिंब आठवतो. त्या झाडांसोबत कितीतरी आठवणी आहेत माझ्या. आयुर्वेदाच्या किंवा काष्ठौषधीच्या दुकानात गेले की त्रिफळाचूर्णाचा, शिकेकाई-रिठ्याचा गंध येतो. बालपणी शिकेकाई-*स्पेशल* खसखसून आंघोळ घालणाऱ्या आमच्या आईसाहेब आठवल्याशिवाय राहात नाहीत. तुळशीच्या, फुलांच्या, चंदन-धूप-कापराच्या नि केवड्याच्या एकत्रित सुगंधानं कुठल्याही देवळाचा गाभारा कोंदाटून जातो, तेव्हा मला भागेश्वराच्या देवळाची नि तिथल्या देवचाफ्याच्या गंधाचीच आठवण येते.

खरंच, गंधानं किती व्यापलंय ना आपलं जीवन! पानाफुलांची गंधमोहिनी सांगणारी कितीतरी गाणी नि कविता आहेत, ललित लेख आहेत. असं साहित्य मिळवून तुम्ही जरूर वाचा, मग तुम्हाला जाणवेल की, शब्दगंधही कसा मनात दरवळतो! हे सारं नाक तयार ठेवून अनुभवलं की त्याची मजा घेता येते. गंध आपल्याला संवेदनशील करतो. जगण्याचा आनंद घ्यायला शिकवतो. फक्त आपण त्याच्या असण्याकडं नीट बघायला हवं.

ही गंधमोहिनी अनुभवण्यासाठी घ्राणेंद्रिय म्हणजे नाक मात्र सजग नि दक्ष हवं. शब्दांविना खूप काही बोलणाऱ्या गंधाला रसिक वृत्तीनं आपल्या आत सामावून घ्यायला हवं. खरं तर **श्रोत्रं चक्षु स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च**! म्हणजे पाचही ज्ञानेंद्रियांनी जागं राहायला हवं. त्यांच्या परस्परांशी असलेल्या नात्यामुळे जीवनाचा आनंद द्विगुणित नव्हे, पंचगुणित होतो!

काही वास मात्र नकोसे वाटतात. आधुनिक जीवनशैलीतून आणि नवनव्या सुखसुविधांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा दर्प नकोसा होतो. सिमेंटच्या शहरांमध्ये, डांबराखाली झाडे-वनस्पती कमीकमी होत गेल्या. कृत्रिम गंधांची दुनिया अवतरली. परफ्युम्स, डिओड्रंट, रूमफ्रेशनर, सेंट यांनी वातावरण भरून जातंय. खाद्यपदार्थांवरही कृत्रिम गंधांचा स्वाद आरूढ झालाय. त्यांच्या प्रभावाखाली आपली संवेदना बोथट होतेय की काय असं मनात येतं.

असे असले तरीही वसंत फुलतच राहतो. जाई-जुई गंधगाणे गाते. रातराणी गंधवार्ता आणते. मोगऱ्याचे गजरे विकणारी ती फुलराणी दिसली की मी गंधवेडी होत तिला हाक मारते...कारण रसरशीत गंधसंवेदना जगण्यात बहार आणते. हा न दिसणारा, तरी अस्तित्वात असणारा गंध म्हणजे जणू परमेश्वरच आहे. जाणवतो, पण दिसत नाही.

●●●

**– आश्लेषा महाजन**
'मंजिरी', २३० चित्रलेखा सोसायटी,
सहकारनगर क्र. १, पुणे – ९

# ऐकू आनंदे...

**– शिल्पा कुलकर्णी**

'**आवाज की दुनियाके दोस्तो...**' अर्थात माझ्या प्रिय मित्र-मैत्रिणींनो अशी सुरुवात वाचून तुम्ही जरा दचकलात नं...? कुठलातरी कार्यक्रम ऐकायला बसलोय, असंच क्षणभर वाटलं नं तुम्हाला? अहो, नुसतीच आवाजांची दुनिया काय कामाची? जोपर्यंत तो आवाज तुमच्या कानापर्यंत येत नाही, पोहोचत नाही आणि थेट मनाला भिडत नाही... म्हणून मग 'आवाज की दुनिया' बरोबरच '**सभी सुननेवालोंको प्यारभरा नमश्कार**' असं म्हणायलाही 'आकाशवाणी'वरचा निवेदक विसरत नाही. खरं नं?

खरंच, या 'श्रवणा'ची शक्ती किती अफाट आणि अचाट आहे नाही? मूल अगदी तान्हं असल्यापासून



हिरव्या पानांमधून, मधुर 'कुहूकुहू' येते । इतके दिवस, माहीत नव्हतं, झाडसुद्धा गाते।।

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : गुलाम मोहम्मद शेख** – कला क्षेत्रातील कामगिरीबाबत (२०१४)

**प्रायोजक - श्री. राहुल भिडे, पुणे**



‘श्रवणा’च्या माध्यमातून ते भवतालाचं आकलन करू लागतं. ते जसं जसं मोठं होऊ लागतं, तसतसं विविध प्रकारचे आवाज, शब्द त्याच्या कानावर पडतात. त्याच्या ज्ञानात झपाट्याने भर पडत जाते. नंतर नंतर तर ते मूल इतकं शहाणं होतं की, आईचे कुठले शब्द ‘कानात’ पडू द्यायचे आणि कुठले ‘कानावरून’ जाऊ द्यायचे याचंही ज्ञान त्याला होऊ लागतं...

मित्रांनो, गंमत जरा बाजूला ठेवूया. आता जरा विचार करा हं... दिवसभरात कानावर पडलेल्या आवाजांपैकी ‘तो’ आवाज दिवसभर, अगदी रात्री झोपेपर्यंत कानात घुमत राहिलाय, असं तुमच्या बाबतीत कधी झालंय का? थांबा, थोडं विस्तारपूर्वक सांगते. सकाळपासून विविध प्रकारचे आवाज, बोलणं, म्हणणं तुमच्या कानावर पडतं. त्यातला ‘तो’च आवाज तुम्हाला विशेष भावतो, आवडतो. ‘तो’ आवाज म्हणजे पक्ष्यांची किलबिल असेल, पानांची सळसळ असेल किंवा हळुवार पावसाचं ‘रिमझिमणं’ असेल. ऐकलेलं एखाद्याचं भाषण असेल, आकाशवाणीवरचं एखादं गाणं असेल, त्यातली सुरेल तान असेल किंवा पाय थिरकायला लावणारा वाद्यांचा गजर असेल... ऐकताक्षणी तुमचं अवघं विश्व क्षणभरासाठी ‘तो’ आवाज व्यापून टाकतो. तुमच्या कानांची ओंजळ होते. कानातून अलगद ‘तो’ आवाज मनात उतरतो. त्यातला नाद, लय, भाव थेट हृदयाला भिडतो. त्याक्षणी तुमच्या सर्व संवेदना जणू ऐकण्याच्या शक्तीत एकवटल्या जातात. त्या आवाजाची विलक्षण मोहिनी तुमच्या मनावर पडते. त्यातल्या भावाशी, नादाशी, आशयाशी तुमचं मन एकरूप होऊ पाहतं. ते मन कधी त्यातल्या तरलपणाची अनुभूती घेतं तर कधी त्यातून व्यक्त होणाऱ्या नाद-छटांचा अर्थ उलगडण्यात गुंतून पडतं. त्या आवाजाशी तुम्ही तादात्म्य पावता.

तुमच्या बाबतीत असं कधी झालंय? माझी खात्री आहे, तुम्हाला असा अनुभव कळत-नकळत एकदातरी आला असणार. आणि हे सर्व इतक्या स्वाभाविकपणे आणि विलक्षण गतीनं घडतं की, तुम्ही त्या आवाजाचा ‘आस्वाद’ घेताय, हे तुमच्या गावीही नसतं...

प्रत्येकाच्याबाबत अशाप्रकारे ‘श्रवणास्वाद’ घेण्याची रूपंही वेगवेगळी असू शकतात. ‘गगन सदन तेजोमय’, ‘हमको मनकी शक्ती देना’ या किंवा अशासारख्या



ऊन कोवळे, वारा अवखळ, पुष्पांचा परिमळ। निर्झरामध्ये डुंबत राहू, ऐकत निर्मळ खळखळ ।।

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : जाहनू बरूवा** – दिग्दर्शन क्षेत्रातील कामगिरीबद्दल (२०१५)

**प्रायोजक - प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे**

प्रार्थना ऐकल्यानंतर तुमचे डोळे नकळत पाणावतात. त्या निर्गुण, निराकार शक्तीपुढे मनातल्या मनात तुम्ही नतमस्तक होता. एक प्रकारचा 'सुकून' तुमच्या मनाला मिळतो. ती जादू शब्दांची असते. ती प्रार्थना म्हणणाऱ्या स्वरांची तर असतेच; पण तुमचाही कुठंतरी त्या प्रार्थनेशी मूकसंवाद सुरू असतो. हो नं...?

'घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' ही भूपाळी 'ऐकताना' त्यात वर्णन केलेलं पहाटेचं सुंदर चित्र तुमच्या डोळ्यांसमोर उभं राहातं. मन जणू 'त्या' पहाटेत फेरफटका मारून ताजंतवानं होतं, प्रसन्न होतं. अशी प्रसन्नता मग दिवसभर तुमच्या दैनंदिन कामात डोकावत राहते. तुमचं काम, अभ्यास हे कंटाळवाणं न वाटता, त्यातली मजा तुम्ही अनुभवायला लागता. कधी एखादा पोवाडा ऐकून तुमच्या मनात 'वीरश्री' संचारते. माहीत असलेल्या किंवा अनामिक वीरांच्या शौर्याला मनातल्या मनात तुम्ही 'सलाम' ठोकता त्यांच्याप्रति अभिमान आणि कृतज्ञतेने मन भरून येतं.

मंडळी, एखाद्याचं भाषण, वैचारिकही दीर्घकाळ मनात रेंगाळत राहतं बरं का... प्रा. शिवाजीराव भोसले असतील, बाबासाहेब पुरंदरे असतील त्यांच्या आवाजाच्या मोहिनीतून आपण कित्येक तास बाहेर पडू शकत नाही. आवाजातील चढ-उतार, शब्दफेक, त्यांची धीरगंभीर शैली, बोलण्यातले आवाहन आणि बोलताना घेतलेला *'पॉज'ही* अर्थवाही असतो. तो तुम्हाला काहीतरी सांगून जातो. पु. लं ना ऐकताना कंटाळा, ताणतणाव, शीण यांनी मनावर आलेली जळमटं क्षणात नाहीशी होतात. मन हलकंफुलकं, स्वच्छ होतं.

तुमची आवडती कविता, हलकीफुलकी ठेका धरायला लावणारी गाणी, तुमच्या आवडीचं एखादं वाद्य तुम्ही ऐकलं की वेगळीच ऊर्जा तुमच्या तना-मनाला मिळते. हीच ऊर्जा खरंतर तुमचं जगणं अधिक समृद्ध करत असते.

सर्व मंगेशकर कुटुंबीय, पं. भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर, वसंतराव देशपांडे, अल्लारखाँ, झाकिर हुसेन, हरिप्रसाद चौरसिया,



पं. रविशंकर, पं. शिवकुमार शर्मा यांना 'ऐकणं' म्हणजे कानांना मेजवानी असते, हो नं! ही यादी तुम्ही तुमच्या आवडीप्रमाणे कितीही वाढवू शकता. ह्या यादीत असलेले, नसलेले सर्वजण, किशोर, रफीपासून ते थेट आजचे आघाडीचे गायक, संगीतकार, वादक, उत्तम वक्तृत्वशैली असलेले वक्ते हे सर्वचजण आपल्या सर्वांच्या आनंदाचे निधान आहेत.

मित्रांनो, संगीत आपल्या निसर्गात ठायी ठायी भरून राहिलं आहे. ते संगीत ऐकायला मात्र मन खुलं आणि कान 'तय्यार' असायला हवेत. मग डोंगरदऱ्यातली वाऱ्याची 'शीळ' तुम्हाला साद घालेल. खट्याळपणे खळाळणारा निर्झर तुमचं लक्ष वेधून घेईल. आसमंत दणाणून सोडणाऱ्या ढगांच्या नगाऱ्यांचा तुम्हाला त्रास होणार नाही. पावसाच्या ताशात तुम्ही सचैल नाहून निघाल. समुद्राच्या गाजेचं धीरगंभीर म्हणणं कळेल. संगीत आणि निसर्ग हे जणू हातात हात घालून जातायत, त्याची अनुभूती तुम्हाला येईल. निसर्गात फिरताना गीतकार गुलजारांनी म्हटलंय



झऱ्यासारख्या झुळझुळणाऱ्या पाण्याचं, पाण्याचं। माझं जग गाण्याचं, गाण्याचं।।

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : सुधा रघुनाथन** - संगीत क्षेत्रातील कामगिरीबद्दल (२०१५)

**प्रायोजक - कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे**

**प्राणिमात्रांनाही 'श्रवण' संवेदना असतात...**

* झुरळं, किडे, टोळ, मधमाशा, माशा यांना 'कान' नसले तरी त्यांच्या पायांवर, गुडघ्यात किंवा मिशांवर छोटे 'केस' असतात. तेच त्यांचे 'कान'! या कानांमुळेच त्यांना जवळचा आवाज ऐकू येतो, ते आवाजाची दिशा ओळखू शकतात.
* साप, नाग यांना फक्त अंत:कर्ण असतो. हा अंत:कर्ण जबड्याच्या हाडाला जोडलेला असतो. सापाच्या जवळून एखादा प्राणी, भक्ष्य गेले तर जमीन थोडी कंप पावते. ही थोडी कंपनेसुद्धा सापाच्या/नागाच्या जबड्यातून अंत:कर्णापर्यंत पोहोचतात. त्यामुळे ते भक्ष्याची हालचाल 'ऐकू' शकतात आणि ते भक्ष्यापर्यंत पोहोचतात.
* घुबडाचे 'कान' एका रेषेत नसतात. त्याचा एक 'कान' थोडा वर आणि एक थोडा खाली, डोक्याच्या बाजूला; पण डोळ्यांच्या पाठीमागे असतात. घुबडाचं तोंड एखाद्या थाळीसारखं चपटं असतं. तेही घुबडाला आवाज ऐकण्यात मदत करतं! त्यामुळे जमिनीवरचा पानाखालच्यासुद्धा भक्ष्यानी थोडा जरी आवाज केला तरी त्याला तो लगेच ऐकू येतो. समजा डावीकडून आवाज आला तर घुबड स्वत:चं तोंड पूर्ण फिरवते त्यामुळे दोन्ही कानांपर्यंत आवाज एकाच वेळेस पोहोचतो; आणि ते 'भक्ष्य' मिळवते.
* उंदराचे कान खूप 'तिखट' असतात. प्लॅस्टिकच्या पिशवीची चेन जरी लावली तरी त्याला तो 'आवाज' 'कर्णकर्कश' वाटतो.
* कबुतरं व हत्ती यांना लहानातल्या लहान 'ध्वनीलहरी'सुद्धा ऐकू येतात. दूरवर जरी वादळ होत असलं तरी ते हत्तीला 'ऐकू' येतं.

तसं, ***वादिमे गुँजती हुअी 'खामोशियाँ' सुने।*** म्हणजे नेमकं काय ऐकायचं हे हळूहळू उमगायला लागेल...

तर मंडळी, असं 'कानसेन' होण्यासाठी 'श्रवणभक्ती' हवीच!! आणि भक्ती म्हटलं की तिथे 'भाव' आला. त्या भावात डुंबणं आलं, लय समजून घेत घेत तल्लीन होणं आलं आणि 'त्या' आवाजापाशी शरण जाणं आलं. अशी 'शरणागती' पत्करण्यात केवढा मोठा आनंद लपलेला आहे; हे तुम्ही श्रवणभक्ती किती श्रद्धेनं, तरीही किती सजगपणे करता यावर अवलंबून आहे. या दिशेने तुमच्या श्रवणाचा प्रवास होण्यासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा!!

●●●

**– शिल्पा कुलकर्णी**
सी – २०४, पाटे संस्कृती, तुळशीबागवाले कॉलनी,
सहकारनगर नं. १, पुणे 411009

---

# जसा स्पर्श पाण्यावरी चांदण्यांचा...

**– अंजली कुलकर्णी**

''आरोहीबाळा, आजीकडे राहायचं हं शहाण्यासारखं'' असं म्हणत रियानं आरोहीला आपल्या आईच्या घरी, आईच्या हाती सोपवलं आणि ती कामावर निघून गेली.

आज पहिल्यांदाच रिया आठ महिन्यांच्या आरोहीला सोडून घराबाहेर पडली होती. दोघींनाही टेन्शन आलं होतं. 'आरोही राहते की नाही?'

''तिला ते मऊ फरचं टेडी बेअर दे. तिला फार आवडतं.''

रिया म्हणाली. थोडावेळ थांबून ती जड पावलांनी बाहेर पडली. ती निघताना आरोहीचं तिच्याकडे लक्ष नव्हतं म्हणून बरं. ती टेडी बेअरच्या मऊशार स्पर्शात रमून गेली होती.

खेळून दमल्यावर आरोहीचे डोळे मिटू लागले.


आजीनं पटकन तिला पलंगावर ठेवलं आणि अगदी शेवरीच्या कापसासारखं मऊ पांघरूण हळूच



झरझर झरती पाऊसधारा क्षणात वाहे वारा। इथल्या वातावरणामध्ये, आनंद खिरतो न्यारा।।

**पद्मभूषण पुरस्कारप्राप्त कलाकार : गोकुळोत्सवजी महाराज –** संगीत क्षेत्रातील कामगिरीबद्दल (२०१५)

**प्रायोजक – सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे**



तिच्या अंगावर घातलं. हलके हलके ती आरोहीच्या कपाळावर थोपटत राहिली.

आजीच्या प्रेमळ बोटांनी आणि शेवरीच्या पांघरुणाच्या उबदार स्पर्शानं अशी काही जादू केली की, दोन मिनिटात आरोही नि:शंकपणे गाढ झोपी गेली. स्वप्नांच्या राज्यात मस्त रमलेल्या आरोहीकडे बघून आजीनं समाधानाचा नि:श्वास सोडला आणि झोपलेल्या आरोहीच्या सायीसारख्या गालांचा तिनं हळूच पापा घेतला.

खरंच! स्पर्श किती बोलका असतो. जे शंभर शब्दांतून सांगता येत नाही ते एक आश्वासक स्पर्श सांगतो. आजीच्या थोपटण्यातून आजीच्या मनातलं अपार प्रेम आठ महिन्यांच्या आरोहीपर्यंत किती छान पोहोचलं! शेवरीच्या कापसाच्या पांघरुणानं तिच्या मनात किती सुखद संवेदना निर्माण केल्या!

निसर्गानं माणसाला पंचेंद्रिये दिली. नाक, कान, डोळे, जीभ आणि त्वचा. या पंचेंद्रियांच्या मदतीनं त्यानं साऱ्या सृष्टीला जाणावं, समजून घ्यावं, जगाचं ज्ञान मिळवावं, सृष्टीतील विविध गोष्टींचा आनंद उपभोगावा आणि तिच्याविषयी कृतज्ञ राहावं यासाठीच या पंचेंद्रियांची योजना!

ही पंचेंद्रिये आपल्याला रूप-गंध-नाद-रस-स्पर्श या संवेदनांचं ज्ञान देतात. म्हणून तर आपण त्यांना ज्ञानेंद्रिये म्हणतो.

खरंतर प्राण्यांनादेखील या संवेदना असतात. परंतु माणसाचा प्रगत मेंदू या पाच जाणिवांचा नीट अर्थ लावू शकतो.

यातल्या स्पर्शजाणिवेचं काम काय असतं? बघा ना! आपल्यासमोर कुठलीही वस्तू धरली तरी फक्त डोळ्यांनी बघून आपलं समाधान होत नाही. आपण त्या वस्तूला हात लावून बघतोच. मऊ आहे की खडबडीत, लुसलुशीत आहे की विसविशीत, कडक आहे की मृदू, रेशमी आहे की खरखरीत, मखमली आहे की टोचणारं, दणकट आहे की पिचकट; याचा



निळ्या धुक्याचे पटल रेशमी, कुठे सांडते ऊन। कधी अचानक कानी पडते, कोकिळेची धून।।



**जरूर वाचा : गोष्टी माणसांच्या- सुधा मूर्ती** - भेटलेली माणसे, त्यांच्या अनुभवांचे मार्मिक चित्रण - मेहता प्रकाशन

**प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. २५३८०४०६), पुणे**

**प्राणिमात्रांनाही 'स्पर्श' संवेदना असतात...**

* माशा, किडे, मकोडे, डास, फुलपाखरं अशा कीटकवर्गीय प्राण्यांमध्ये, त्यांचे पाय, मिशा त्यांच्यावरचे केस यांच्यामुळे स्पर्शज्ञान होते.
* नाकतोड्याच्या पोटावर काही 'संवेदनशील केस' असतात. त्याच्यावर हल्ला करणाऱ्या भक्षकामुळे किंवा इतर कोणत्याही कारणाने हवा थोडी जरी हलली तरी ते त्याला लगेच समजते. म्हणूनच नाकतोड्याला पकडणे कठीण असते.
* ऑक्टोपस त्याच्या वळवळणाऱ्या/हलणाऱ्या पायांमुळे खरखरीत आणि गुळगुळीत पृष्ठभाग ओळखू शकतो.
* काही पक्ष्यांच्या चोचीजवळ छोटे केस असतात. किडे, कीटक खाताना हे केस अगोदर किड्यांना स्पर्श करून 'भक्ष्य' कसं आहे याचा अंदाज घेतात.
* वाघाला स्पर्शाचे ज्ञान अचूक असते. त्यामुळेच अंधारातही त्याला 'भक्ष्य' आणि 'भक्षक' लगेच ओळखू येतो. वाघाला स्पर्शाचे ज्ञान पाच वेगवेगळ्या प्रकारच्या 'मिशांमधून' होते. प्रत्येक मिशीच्या तळाशी, कातडीच्या आत रक्ताची एक कुपी *(कॅप्सुल ऑफ ब्लड)* असते. वाघ जेव्हा एखाद्या गोष्टीच्या (भक्ष्याच्या किंवा इतर कोणत्याही प्राण्याच्या) जवळ जातो, तेव्हा मिशीचा त्या गोष्टीला स्पर्श होतो, रक्ताची कुपी हलते, तिची जागा थोडी हलते, त्यामुळे समोरच्या भक्ष्याने थोडी जरी हालचाल केली तरी ती त्याला खूप मोठी भासते.

हातानंच अंदाज घेतो. मग ते एखादं नवं खरेदी केलेलं टेबल असो वा लोकरीचा गुंडा. स्पर्श करून आपण त्या वस्तूचा पोत, दर्जा, गुणवत्ता तपासत असतो. त्या त्या वस्तूनं जसं असायला हवं तशीच ती आहे ना, हे आपण स्पर्शानं बघत असतो. स्त्रिया साडी, ड्रेस घेताना तीनतीनदा हातानं त्याचा पोत तपासतात. रंग तर भरतोय डोळ्यांत, पण सूत? ते स्पर्शानंच समजतं.

उन्हाळ्याच्या दिवसात दिवसभर उन्हाच्या झळा अंगाला भाजून काढत असतात. उकाड्यानं अंगाचा उकडलेला बटाटा झालेला असतो; पण संध्याकाळ झाली की, पश्चिमेकडून थंड वाऱ्याची सुंदर झुळूक येते आणि शरीराला तिचा स्पर्श झाला की, दिवसभराचा वैताग नि शीण उतरून जातो.

थंडीत हुडहुडी भरणारी गार हवा शरीराला सुखावणारी. तनामनात उत्साह भरणारी. बोचऱ्या थंडीत स्वेटर शालींचा उबदार स्पर्श सांभाळत गरम गरम चहा पिणं म्हणजे स्वर्गसुखच.

आणि पावसाळा! वा! तो तर पंचेंद्रियांचा सोहळा भोगण्याचा ऋतू. पहिल्या पावसातली पहिली सर अंगावर झेलताना होणारा आनंद केवळ अनुपम्य.

ओल्या मातीचा मत्त गंध, अंगावर शिरशिरी उठवणारा पावसाच्या थेंबांचा स्पर्श, रिमझिम झरणाऱ्या धारांचा नाद आणि एकटक पावसाकडे बघणं - पंचेंद्रिये नुसती 'आनंद आनंद' म्हणत एकवटून येतात.

हवेचा स्पर्श, पाण्याचा स्पर्श, सूर्यप्रकाशाचा स्पर्श, फुलाच्या पाकळीचा स्पर्श, फुलपाखराच्या पंखांचा स्पर्श, पाळलेल्या आवडत्या कुत्र्याचा वा मांजरीचा स्पर्श, तान्ह्या बाळाच्या गालाचा स्पर्श, स्पर्धेत बक्षीस, परीक्षेत चांगले गुण मिळाल्यावर वडिलांनी पाठीवर दिलेली शाबासकीची थाप, पराभवात आईनं मायेनं जवळ घेऊन दिलेला धीर, भोंडल्याचा फेर धरून गाताना मैत्रिणीच्या हातात मिळवलेला हात... खरंच, स्पर्शाची ही अनंत रूपं आहेत म्हणून माणसाच्या जीवनात आनंदाचे झरे आहेत.

स्पर्श फक्त ज्ञान, फक्त सुख देत नाही; स्पर्श जागवतो माणसाच्या मनीचा आतला भाव. माणसाच्या मनातली इतरांप्रति असलेली भावना.

स्वागतासाठी करण्यात आलेलं हस्तांदोलन असो, अवघड वळण चढत असताना आधारासाठी दिलेला हात असो किंवा कित्येक दिवसांनी मित्र भेटल्यावर



आयुष्याचे आभाळ व्हावे, स्वप्न मनाशी पाही। क्षण नाजूक सोनेरी मोहक त्यात रमावे आम्ही।।

जरूर वाचा : चार नगरांतले माझे विश्व - जयंत नारळीकर - आत्मकथन-मौज प्रकाशन



प्रायोजक - सौ. रंजना सतीश कुलकर्णी, सातारा

अत्यानंदानं अधीरपणे मारलेली मिठी असो...

स्पर्श विविध प्रकारचा असतो. चांगला आणि वाईटही असतो. त्यातला फरक आपण ओळखायचा असतो.

स्पर्शाला अर्थ असतो हे हळूहळू उमगायला लागतं. मग नैसर्गिकपणे केलेला स्पर्श, हवाहवासा मायेचा स्पर्श, औपचारिकपणे केलेला स्पर्श आणि बसच्या गर्दीत अनुभवायला येणारा अगदी नकोसा वाटणारा स्पर्श... अशी स्पर्शांची प्रतवारी आपलं मन आपोआप करू लागतं. त्याचप्रमाणे प्रतिसाद देऊ लागतं. 'उत्कट' भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठी नकळतपणे स्पर्श केला जातो तरीही 'स्पर्श' कसा, केव्हा आणि किती मोकळेपणाने करायचा याचं आपलं आपल्यालाच भान असायला हवं.

स्पर्शातून विविध भावना व्यक्त होतात. ज्ञानेश्वर मुक्ताबाईंची कथा तुम्हाला माहीत आहे ना?

ज्ञानदेवांना मांडे खायची इच्छा झाली म्हणून मुक्ताई हरखून, उत्साहानं कुंभाराकडून खापर घेऊन येत होती. वाटेत विसोबा खेचर भेटले. मुक्ताईनं, 'मांडे करण्यासाठी खापर घेऊन चालले आहे,' असं त्यांना सांगितलं. विसोबांना राग आला. 'संन्याशाची पोरे आणि मांडे खायला हवेत?' असे म्हणून त्यांनी मुक्ताईच्या कोवळ्या गालावर जोराने थप्पड मारली. तिच्या हातातील खापर फोडून फेकून दिले.

मुक्ताई रडत रडत घरी आली. प्रेमळ भावाला मांडे करून देता येत नाहीत, याचे तिला वाईट वाटत होते.

ज्ञानदेवांनी स्वत:च्या हातांनी तिचे अश्रू पुसले. तिची समजूत घातली. आपल्या पाठीवर अग्नी निर्माण करून तिला मांडे भाजण्यास सांगितले.

विसोबांचे हात आणि ज्ञानदेवांचेही हातच. पण दोघांच्या स्पर्शातला भाव किती वेगळा. एकाने आपल्या स्पर्शाने मुक्ताईला रडविले, दुसऱ्याने आपल्या स्पर्शाने तिला माया दिली, धीर दिला.

मित्रांनो आणि मैत्रिणींनो आपण आपल्या ज्ञानेंद्रियांचा वापर इतरांना दु:ख देण्यासाठी करायचा की, आनंद देण्यासाठी याचा विचार आपणच करायचा!

●●●

**– अंजली कुलकर्णी**
३, विघ्नहर, जयवर्धमान सोसा., बिबवेवाडी, पुणे 411037

---

# जयस्वादाडी

**– प्राची कुलकर्णी–गरुड**

मित्रांनो, आपण खूप खूप आनंदात असलो की काय काय करतो बरं? गाणं गुणगुणतो, नाचतो आणि काहीतरी आवडता पदार्थ खातो. थोडक्यात पार्टी करतो. कधी एकट्याचीच, कधी टोळकं जमवून..हो ना? आता नाच किंवा गाणं हा ज्याच्या–त्याच्या आवडीचा किंवा कौशल्याचा भाग आहे. पण खायला तर सगळ्यांनाच आवडतं किनई? तर असं हे आनंदाचं खाणं! 'खायला काय काय आवडतं?' असा प्रश्न विचारला गेला रे गेला की, समोरच्याच्या तोंडाला पदार्थांच्या नुसत्या आठवणींनीच पाणी सुटलं म्हणून समजा.

आपल्या आवडीच्या पदार्थाची मनातल्या मनात आपण कल्पना केली की नजरेसमोर आधी तरळतो तो त्या पदार्थाचा रंग, पोत, तापमान, गंध आणि चव! म्हणजे असं बघा, छान पावसाळा सुरू आहे आणि आपण घराच्या गॅलरीत पागोळ्या तळव्यांवर झेलतोय किंवा एखाद्या गड–किल्ल्याच्या वाटा धुंडाळत फिरतोय. आणि मग जर अशा पडत्या पावसात खमंग

फुले वेचूया नाजुक रंगीत पक्ष्यांचे साथीला संगीत। आंबट-चिंबट चिंचा, कैऱ्या माकड मेवा खाऊ।।

**जरूर वाचा : प्लेईंग इट माय वे – सचिन तेंडुलकर – अनु. दीपक कुलकर्णी** – आत्मकथन–मेहता प्रकाशन

**प्रायोजक - डॉ. विनायक देसूरकर, पुणे**



गरमागरम कुरकुरीत कांदा भजी खावीशी वाटली तर काय चुकलं? गर्रम भज्यांचा घाणा समोर येतो आणि डिशांमागून डिशा फस्त होतात. भज्यांची चव, रंग, पोत, तापमान सगळं सगळं जिभेवरून मेंदूत पक्कं होतं....मनाला आनंद मिळतो. आज अशाच काही आनंदाच्या खाण्याच्या माझ्या आठवणी तुमच्यासाठी!

साधारण १९८८ साली आमचा संपूर्ण कुलकर्णी परिवार सहलीसाठी दक्षिण भारतात गेला होता. लहान-मोठे सगळे मिळून सुमारे तीस जण होतो आम्ही.

त्याकाळी हॉटेल्समध्ये खाण्याची एवढी सवय नव्हती. त्यामुळे मोठ्या बायका सोयीची जागा बघून पटापट स्वयंपाक करत. आणि मग सगळे गोल करून एकत्र जेवत. त्यातही कुलदेवी श्रीशाकंभरीच्या क्षेत्री, बदामीला मंदिराच्या ओसरीत चुलीवर केलेला आमटी-भाताचा स्वयंपाक अजूनही मनात ताजा आहे. पत्रावळीवर वाढलेलं मीठ, पूडचटणी, खाराच्या मिरच्या, द्रोणात आमटी आणि वाफाळत्या भातावर खरपूस तुपाची धार... जीभ, पोट आणि मन अगदी अहा.. अहाहा.. करत होतं! ताजा, स्वत: केलेला गरम स्वयंपाक आमच्या आई-काकू-आज्जी अगदी मायेनं वाढत होत्याच, मोठे चुलत भाऊ जोडीला वेगवेगळी ताजी फळं, त्या-त्या ठिकाणची खासियत असलेले पदार्थ खिलवून मजा वाढवत होते. सोनकेळी, फणस, अननस, शहाळी आणि दक्षिणी आंबे.. चविष्ट, आनंददायी अन आरोग्यदायी.

हंपीच्या पुढे कडाप्पा म्हणून एक ठिकाण आहे. तिथे जरा विश्रांती म्हणून गाड्या थांबवल्या होत्या. तेवढ्यात बाबांनी खबर आणली की, जवळच्याच एका *धाबा कम टपरीवर* उत्तम दहीबुत्ती (फोडणी घातलेला दहीभात) मिळतेय म्हणून. हे एवढं ऐकायचाच अवकाश की, सगळी पार्सलं त्या धाब्यावर पोचलीसुद्धा!! स्टीलच्या मध्यम आकाराच्या वाडग्यांमधून दहीबुत्ती देत होते. सोबत



**सवंगड्यांनो या सारे, आनंदाने नाचा रे। आनंदाची एक शलाका, अवघ्या दुरिता दूर करे।।**

**जरूर वाचा : गावठाण - कृष्णात खोत** - आनंदी नावाच्या खेडयातल्या धडपडया मुलीची कथा-मौज प्रकाशन

**प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली**

लिंबाचं तिखट लोणचं आणि तळलेला अपलम (पापड)! भर उन्हात, भुकेच्या वेळी चविष्ट थंडगार दहीबुत्ती खाऊन जिभेइतकंच मनालाही सुख मिळालं.

पुढे तिरुपतीजवळच्या एका हॉटेलात मिळालेल्या इडल्याही कायम लक्षात राहिल्यात, त्या त्यांच्या लुसलुशीतपणामुळे. हलक्या, सच्छिद्र, मऊसूत इडल्या, अगदी ओठांनी खाता याव्यात असल्या आरवारीत. सोबत भरपूर चटणी आणि भरपूर भाज्या घातलेलं चवदार सांबार. कितीही खा. पोट बिघडायला वावच नाही!

मी साधारण पाचवी-सहावीत असताना पहिल्यांदा आमच्या घरी 'मॅगी' आली. दादा मोठ्या जोशात जाहिरातीतल्यासारखं *'बस टू मिनिट्स'* असं आम्हाला म्हणत होता. पण दहा मिनिटं झाली तरी ते मॅगी काही होईना. काही वेळानंतर दादानं पोहे खायच्या छोट्या वाटोळ्या ताटलीत मॅगी घालून मला दिलं. चमच्यावर गुंडाळून तो गोळा तोंडात टाकला... पण तो गिळगिळीत गोळा काही घशाखाली उतरेना. त्याक्षणापासून मी मॅगी *बॅन* केली... ती २००२ सालापर्यंत!

पण एकदा गंमत झाली. मी आणि माझी मैत्रीण ऑफीसमधून तिच्या घरी गेलो तर घरी कुणीच नव्हतं. स्वत: काही करून खायचा प्र-चं-ड कंटाळा आला होता. मग धूम ठोकली तिच्या माहेरी! आमची चिमणीएवढी झालेली तोंडं पाहूनच काकांनी काय ते ओळखलं. 'पळा, आधी *फ्रेश* व्हा' असा हुकूम सुटला. आम्ही आवरून पुन्हा *हॉलमधे* येतोय तोवर तीन वाफाळते *बाउल्स* घेऊन काका आले. पाहाते तर त्यात मॅगी. माझ्यापुढे धर्मसंकट! पोटात कावळे-चूहे सगळे प्राणिविशेष दौडताहेत आणि समोर आहे मॅगी. 'कायक्रावंब्रं...???'

काका म्हणाले, ''खा गं पटापटा..आज भरपूर भाज्या घातल्यात. हवं तर थोडं सॉस घ्या घालून त्यावर...'' हो-नाही करत त्या मॅगी *सूप कम नूडल्सवर* सॉस घातला आणि भरलेल्या चमच्यावर फुंकर मारून घास तोंडात सरकवला. आणि चक्क *वॉव* झालं की!! *रेसिपी* विचारली काकांना तर ते म्हणाले, ''काही नाही गं..अगदी आपल्या उपम्यासारखंच.'' काकांचं मॅगी *रेसिपीचं सिक्रेट* फारच आवडलं मला. म्हणून अगदी गेल्या महिन्यापर्यंत (महिन्यातून एकदा) मॅगी करून खात होते. मग ती अजिनोमोटोतल्या शिशाच्या प्रमाणाची बातमी आली. आणि पुन्हा एकदा मॅगी *बॅन* झाली!

शाळेत असताना आम्हाला पावभाजीसुद्धा माहीत नव्हती. सॅन्डविचसुद्धा कॉलेजला जाऊ लागल्यावरच समजलं. शाळेतली एक मस्त आठवण आहे. माझी सातवीची परीक्षा झाल्यानंतर आम्ही नगरच्या सातभाई गल्लीतून वेदांतनगरमध्ये, सावेडीला राहायला आलो. तिथल्या नवीन शाळेत *'होमसायन्स'* हा ऐच्छिक विषय होता. त्यादिवसातला शाळेतील हा एक मेजशीर किस्सा.

एक दिवस मॅडमनी सांगितलं की, आज आपण पालक पराठे, कोबीची कोशिंबीर आणि गुडदाणी करणार आहोत. प्रयोगशाळेच्या बरोब्बर मध्यभागी असलेल्या टेबलावर मॅडमनी आधी आम्हाला कृती करूनही दाखवल्या. आणि मग आमच्या दंग्याला सुरुवात झाली.

दाणे भाजून सोलून झाले. इतकं होईतोवर गुळात तूप टाकून तो पातळ करायला स्टोव्हवर केव्हाच चढला होता. त्यात दाणे टाकून बघता बघता गुडदाणी तयार झाली. गार झाल्यावर आम्ही नाजूक हातांनी गुडदाणीच्या सुबक तुकडेवजा वड्या पाडल्या! मग छान तूप-बिप सोडून बारा पराठे तयार झाले.

मग छान उभ्या चिरलेल्या कोबीत कूट, साखर, कोथिंबीर, लिंबाचा रस घालून मस्त तूप-मिरचीची खमंग फोडणी घातली. (फोडणी इतकी खमंग बसली होती की, त्याच मजल्यावर असलेल्या मुख्याध्यापिका लॅबमध्ये डोकावून गेल्या!)

*डिशमध्ये* आम्ही पराठ्याची गुंडाळी, कोशिंबिरीचा इवलासा ढीग(!) आणि त्यातल्यात्यात बऱ्या आकाराच्या वड्या मांडल्या. अधूनमधून गुलमोहराचे कोंबडे, कण्हेरीच्या पाकळ्या आणि ती बाजूला



रेषांच्या भवतालीस कुणी विणले रे पानाला। हिरव्याच मनाचा विणकर विणतो अवघ्या रानाला।।



**जरूर वाचा : मुसाफिर - अच्युत गोडबोले** - आत्मकथन-विकास बुक हाऊस

**प्रायोजक - डॉ. प्रियदर्शी सावंत, बोरीवली**

## प्राणिमात्रांनाही ‘चवीची’ संवेदना असते...

⁕ जमिनीवरचे जे प्राणी फक्त पाला, गवत खाऊन राहतात *(हर्बीव्होरस)* त्यांच्या जिभेवर जास्त प्रमाणात ‘रुची कलिका’ असतात. चरताना कुरणामध्ये एखादं कडू, विषारी झुडूप आलं तर त्यांना लगेच कळतं, शिवाय शरीरातलं क्षाराचं प्रमाण योग्य राखण्यासाठी त्यांना तशा प्रकारच्या पाल्याची निवड या ‘रुचि कलिकांमुळे’ करता येते. जमिनीवरचे जे प्राणी फक्त मांस खाऊन राहतात *(कार्निव्होरस)* म्हणजेच मांसाहारी त्यांच्या जिभेवर त्या मानाने कमी कलिका असतात. उदा. सिंहाच्या जिभेवर ४७० ‘रुची कलिका’ असतात. *कार्निव्होरसना* कडवट व कुजलेला वास जिभेमुळे ओळखता येतो; पण त्यांना ‘गोड’ वास ओळखता येत नाही. जे प्राणी मांसाहारी आणि शाकाहारी असतात त्यांच्या जीभेवर मांसाहारी प्राण्यांपेक्षा जास्त रुचि कलिका असतात शिवाय त्यांना खारट, आंबट, गोड, कडू अशा सर्व चवी कळतात. माणसाच्या जिभेवर १०,००० पेक्षा जास्त ‘रुची कलिका’ असतात.

⁕ प्रत्येक प्रकारातल्या पक्ष्याची जीभ वेगवेगळी असते. बऱ्याच पक्ष्यांच्या जिभेत हाडं असतात. पोपटाच्या जिभेत हाडं नसतात. जे पक्षी पाण्यातलं भक्ष्य/मासे खातात (उदा. बदक, हंस, समुद्रपक्षी इ.) त्यांच्या जिभेवर उंच टोकदार ‘हुक्स’ असतात, तर काहींच्या जिभेवर हुक्स व मऊ केस असतात. केसांमुळे पाण्यातला कचरा त्यात अडकतो, हुक्समुळे ‘भक्ष्य’ तोंडातून निसटत नाही. गाणाऱ्या छोट्या पक्ष्यांची चोच त्रिकोणी असते व त्यावर छोटी पण अणकुचीदार टोकं किंवा केस असतात, ‘कॉरमोरंट’ पक्षी जरी मासे खात असला तरी त्याची जीभ अविकसित असते. अशाच प्रकारची जीभ शहामृग, इमू, किवी (यांना उडता येत नाही) यांचीही असते. जे पक्षी फक्त फुलातला मध खातात त्यांच्या जिभेच्या टोकावर पुष्कळ, बारीक उंचवटे असतात; त्यामुळे तिथला भाग ब्रशसारखा दिसतो. *हमींग बर्डच्या* जिभेवर अशा प्रकारचे उंचवटे असतात पण त्याची जीभ दुभंगलेली असते.

⁕ ‘खूर’ असलेल्या सस्तन प्राण्यांमध्ये जिराफाची जीभ सर्वात मोठी १.४ फूट लांब, प्रचंड शक्तीशाली, पिळदार असते. त्याची जीभ आणि तोंडातला वरचा भाग इतका कडक असतो की तो काटेरी फांद्या लीलया खाऊ शकतो. एवढेच नव्हे तर तो स्वत:चे शरीर जिभेने खाजवतो व स्वच्छही करतो.

ठेवलेली पालकाची पानं अशी मस्त सजावट केली. दोन *डिश* घेऊन आम्ही मुख्याध्यापिकांच्या ऑफिसमध्ये गेलो. एक *डिश* तिथे ठेवली. नंतर आम्ही आमचा मोर्चा स्टाफ रूमकडे वळवला. तिथे यथायोग्य कौतुक पदरात पाडून घेऊन आम्ही पुन्हा *लॅबमध्ये* पोचलो. उरलेले पराठे आणि बाकी खाऊची वाटावाटी करून आम्ही तिथेच डबे उघडले. ती भूक, ती चव आणि ते दिवससुद्धा आता परत कधीच मिळणार नाहीयेत... कुठल्याही पदार्थाचा आपण जिभेनं आस्वाद घेण्याआधी तो डोळ्यांनी घेतो. पदार्थ तयार करण्यात जेवढं कौशल्य आहे; तेवढंच कलात्मक पद्धतीने तो पदार्थ सजवण्यातदेखील आहे.

मित्रांनो, कधीतरी केलेल्या बाहेरच्या खादाडीत मौज आहे. शिवाय आईनं स्वत:च्या हातानी बनवलेला पदार्थ खाण्यातल्या स्वर्गीय सुखाचा अनुभवही तुम्ही घेता. त्याचबरोबर तुमच्या हातानं पदार्थ बनवून खाण्या-खिलवण्यातलं समाधान तुम्ही मिळवलंत तर दुधात केशर!! हो नं...

●●●

**– प्राची कुलकर्णी-गरुड**
एच- १९०७, आसावरी,
नांदेड सिटी, सिंहगड रस्ता, पुणे 411041




क्षितिजाला आता नाही कसली सीमा। नव आशांच्या या सुरू पुन्हा मोहिमा।।

**जरूर वाचा : नवा दिवस – कवितासंग्रह – मंगेश पाडगावकर –** मौज प्रकाशन


**प्रायोजक – श्री. सौरभ सुधीर दप्तरदार, पुणे**

# 'आकारली' चित्रकला




– वैजनाथ दुलंगे

## *आदरांजली...*



भारताच्या अवकाश संशोधन क्षेत्रात ज्यांनी अत्यंत मोलाचे योगदान दिले, विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ज्यांना 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविण्यात आले असे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे २७ जुलै २०१५ रोजी वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. २००२ ते २००७ या काळात भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून आपल्या चमकदार कामगिरीची मोहोर भारतीयांच्या तसेच विदेशीयांच्या देखील मनावर उमटवणारे ते पहिलेच शास्त्रज्ञ होते. तामिळनाडूनील 'रामेश्वर' या छोट्याशा गावात अत्यंत बिकट परिस्थितीत कलामांचा जन्म झाला. अगदी गरीब कुटुंबात जन्माला आले असले तरी देशातील एक प्रसिद्ध वैज्ञानिक म्हणून त्यांनी लोकांच्या मनात आदराचे स्थान मिळवले. हीच त्यांची खरी श्रीमंती होती.

जुलै १९८० मध्ये **एसएलव्ही३** हा प्रक्षेपक तयार करणाऱ्या प्रकल्पाचे ते संचालक होते. त्यांच्या परिश्रमामुळेच आपला देश उपग्रह सोडू शकणाऱ्या देशांच्या यादीत गणला जाऊ लागला. **अग्नी १** व **पृथ्वी** या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीत त्यांची कामगिरी मोठी होती. त्यांचे अग्निपंख (अनुवाद- विंग्ज ऑफ फायर), अ व्हिजन फॉर न्यू मिलेनिअम, इंडिया २०२०, माय जर्नी इ. अनेक पुस्तके मुलांना तसेच तरुणांना प्रेरणादायी ठरली. भारत महासत्ताक होण्याचे स्वप्न कलामांनी पाहिले. त्यासाठी काय-काय करता येईल याविषयीची माहिती त्यांनी **इंडिया २०२०** या पुस्तकातून दिली. **पद्मभूषण, पद्मविभूषण** आणि **भारतरत्न** या मानाच्या **पद्म** सन्मानासोबत इतर अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. विज्ञानासह अध्यात्माची आस असणारे डॉ. कलाम हे उत्तम वीणावादकही होते.

**त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!**



**या धरतीवरती माझी रुजुनी नाती। माणूस माणसावरती करू दे प्रीती।।**

**जरूर वाचा : १०० कविता** – कुसुमाग्रजांनी निवडलेल्या १०० कवितांचे संकलन – अनुभव प्रकाशन

**प्रायोजक - श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे**

ऑगस्ट २०१५ ते ऑगस्ट २०१६ हे वर्ष ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक व आद्य संचालक डॉ. वि. वि. तथा आप्पा पेंडसे यांचे जन्मशताब्दी वर्ष! गेल्या महिन्याच्या अंकात त्यांच्या कार्याचे पुण्यस्मरण करणाऱ्या 'वरदविनायक हे संचालक!' या पद्याचा रसास्वाद आपण वाचलात. या अंकापासून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारी द्रष्टे समाजशिल्पी- आप्पा पेंडसे' ही लेखमाला आपण सुरू करत आहोत.

द्रष्ट्या, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ आप्पांच्या व्यक्तिमत्त्वात एक सच्चा कलावंत, कलोपासक रसिक दडलेला होता. नि:संगतेने कामात मग्न असताना ते रसिकतेने जगले. सगळ्या जाणिवा जाग्या ठेवून आपल्या भोवतालचं विश्व त्यांनी आनंदाने अनुभवलं. प्रबोधिनीचे सुंदर, नवीन, कल्पक रूप, आकार नि स्वर त्यांच्या प्रतिभेने दिले.

रसास्वाद विशेषांकात या लेखमालेतील 'प्रतिभावंत संगीतोपासक आप्पा' या पहिल्या लेखात जाणून घेऊया आप्पांच्या बुलंद व्यक्तिमत्त्वातील या हळव्या/नाजूक पैलूविषयी!

**जन्मशताब्दी वर्ष!**

## द्रष्टे समाजशिल्पी आप्पा पेंडसे


**'दशपैलू आप्पा' लेखमाला - १**



**ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक**

# प्रतिभावंत संगीतोपासक आप्पा

**– डॉ. व. सी. ताम्हनकर**



सकाळी सातचा सुमार. आप्पा परांडे वाड्यातल्या वरच्या खोलीत होते. रस्त्यावरून एक अंध वारकरी खांद्यावर एकतारी घेऊन गात चालला होता. 'वारियाने कुंडल हाले.' तो मधुर, आर्त आवाज ऐकून आप्पा सज्जातून बाहेर डोकावले. त्यांनी मला सांगितलं की, ''जा त्याला वर घेऊन ये.'' मी त्याप्रमाणे भरभर खाली जाऊन त्या वारकऱ्याला आप्पांकडे घेऊन आलो. मी त्यावेळी बी.कॉमच्या शेवटच्या वर्षाला असताना वर्षभर आप्पांकडे राहात होतो. त्या वारकऱ्याला वर आणल्यावर आप्पांनी त्याला खोलीत एक सतरंजी टाकून बसवलं. म्हणाले, ''बाबा, आणखीन दोन-तीन अभंग गा.'' आणि त्याने एकतारीवर फार सुरेल, तन्मय होऊन अभंग म्हटले. आप्पा प्रसन्न झाले. त्यांच्याकडे चहा कसा मिळणार? त्यांनी त्याला गूळपाणी दिले. हातावर रुपया ठेवला आणि म्हणाले, ''बाबा, इकडे आलात की येत जा.'' तर असे होते संगीतप्रेमी आप्पा.

देवाने अनेकांना अनेक देणग्या दिलेल्या असतात. डॉ. जयंत नारळीकर, डॉ. वसंतराव गोवारीकर यांना देवाने विज्ञान संशोधनातील प्रतिभेची देणगी दिली. कुसुमाग्रजांना, बालकवींना अप्रतिम काव्यस्फूर्तीची देणगी दिली. लता आणि आशा मंगेशकर, भीमसेन जोशी किंवा कुमार गंधर्व यांना अपूर्व गायनी कळा दिली. त्याप्रमाणे



विज्ञानाला अध्यात्माची सात्विक बैठक असो । पुरुषार्थाला कारुण्याची ओली झालर दिसो।।

**चित्रपट पाहा : निशाणी डावा अंगठा –** साक्षरता अभियानाची दाणादाण कशी उडाली हे सांगणारा चित्रपट

प्रायोजक - श्री. निखिल धारवाडकर, बंगळुरू

आप्पा पेंडसे या व्यक्तीला देवाने उदार मनाने अनेक प्रकारच्या प्रतिभेची देणगी दिली. ते मनस्वी, प्रतिभावंत, संगीतातले जाणकार होते. इतरांच्या ठिकाणी असलेल्या प्रतिभेचा शोध घेण्यासाठी जी संवेदना लागते तीही त्यांच्याकडे होती.

**संगीताचा सखोल संस्कार**

संगीताचा मनुष्याच्या जीवनावर फार सखोल परिणाम होत असतो, असा निदान माझा तरी अनुभव आहे. अर्थवाही शब्द आणि भावमधुर स्वर यांचा उत्कट ठसा माणसाच्या मनावर उमटतो.

स्वामी विवेकानंदांच्या चरित्रातील एक प्रसंग आप्पा सांगत असत. स्वामीजी आणि त्यांचे गुरू भगवान रामकृष्ण परमहंस हे दोघेही दैवी प्रतिभा आणि स्वर लाभलेले गायक होते. स्वामीजींना एकदा एका स्थानकावर स्टेशन मास्तरांच्या घरी जाण्याचा प्रसंग आला. पत्नी गावाला गेल्यामुळे स्टेशन मास्तरांनी स्वत:च स्वामीजींसाठी चुलीवर स्वयंपाक करायला घेतला. स्वामीजी त्यांच्याजवळ बसून गात होते.

गाण्याचा अर्थ असा होता 'मित्रा, तू घरी बसून काय करत आहेस? अंगाला भस्म लाव आणि शिवाच्या शोधाला बाहेर पड!' स्वामीजींच्या गाण्याचा शरश्चंद्र चक्रवर्ती या स्टेशनमास्तरांवर एवढा परिणाम झाला की त्यांनी सरळ चुलीतली राख अंगाला लावली आणि स्वामीजींपुढे उभे राहिले आणि म्हणाले, 'हा मी तयार आहे स्वामीजी! तुमच्या मागे कुठेही येईन.' ध्येयध्यासाने, तपाने पवित्र झालेल्या स्वराचा परिणाम असा विलक्षण असतो. आप्पांच्या स्वराची जातकुळी या प्रकारची होती.

**संगीत साधना**

आप्पा अगदी तरुण असताना महाराष्ट्रातल्या एका नामवंत गायकांनी त्यांचं गाणं ऐकलं. ते म्हणाले, 'आप्पा, तुम्ही तुमचा एक जन्म गाण्याला अर्पण करा.' पण आप्पांना तसं करणं शक्य नव्हतं. कारण त्यांना देशाचं रूप पालटणारी बलशाली संघटना करण्याचा ध्यास लागला होता. त्यांनी यासाठी तरुण मनांना अत्यंत उत्कट देशभक्तीने भारलेल्या गीतांमधून आवाहन केलं. त्यांनी मला शिकवलेली गीतं – 'तुम्ही अम्ही सकल हिंदू बंधु बंधू, ॐ तत्सत्‌चि ललकारी गर्जवी, हे अखंड राष्ट्रपुरुष, लाल शालू नेसली सुरम्य पश्चिमा.'

वाद्यांमध्ये आप्पांना सनई खूप आवडत असे. तशाच प्रकारचं सोलापूरकडचं वाद्य म्हणजे सुंद्री. ती त्यांना अतिशय आवडत असे. काही दिवस त्यांनी वाजवण्याचा प्रयत्नही केला; पण रीड फुंकण्याने येणाऱ्या ताणामुळे त्यांनी तो सोडून दिला. परंतु त्यांना सर्वात प्रिय असे ती बासरी. दिवसभराचं काम झालं की, रात्रीच्या शांत वेळी आप्पा अत्यंत तन्मय होऊन डोळे मिटून बासरी वाजवत. त्यांचा स्वत:चा शीणभार तर बासरीच्या सुरांनी उतरून जात असेच; परंतु दुरून येणाऱ्यालाही ते स्वर मंत्रमुग्ध करत. 'तोडी' हा आप्पांचा आवडता राग. लताताईंनी लिहिलेल्या 'हिंदूभूमिच्या गौरवात मज श्रेय गवसले हो' या समर्पणगीताला आप्पांनी या तोडी रागातच चाल लावली. डॉ. अशोक निरफराके यांना 'तत: किम्' हे ध्रुपद असलेलं गीत लिहायला त्यांनी सुचवलं. त्याचेही स्वर तोडीचेच आहेत. 'हे वीर विवेकानंद' या गीतालाही आप्पांनीच चाल लावलेली आहे.

**ये रे नारायणा...**

ज्ञान प्रबोधिनीचे पहिले अध्यक्ष श्री. म. गो. कोटिभास्कर यांचं निधन १९६६ मध्ये झालं. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी जी सभा झाली त्यात आप्पांनी तुकाराम महाराजांचं एक भजन हृदय हेलावणाऱ्या स्वरात म्हटलं. त्याचे शब्द होते – 'ये रे नारायणा, पाहे विचारून, तुजविण कोण, आहे मज?'

**उपनिषद् मंत्रांचे दैवी स्वर**

भारतीय संस्कृतीतील अनेक संस्कारांची आप्पांनी अर्थवाही पुनर्रचना केली. वर्षारंभ उपासना, वर्षान्त उपासना, विद्याव्रत संस्कार या आप्पांनी निर्मिलेल्या उदात्त कलाकृती आहेत. त्यातली उपनिषद् मंत्रांची गुंफण जणू दैवी आहे. त्या मंत्रांचा जीवनस्पर्शी अर्थ आप्पांनी त्यांना लावलेल्या चालींमधून उलगडत जातो. सर्वांत अविस्मरणीय संस्कारपुस्तिका विद्याव्रत संस्काराची आहे. वर्षान्त उपासनेत आप्पांनी सोहिरोबा महाराजांचा 'हरिभजनाविण काळ घालवू नको रे' हा सुंदर अभंग घातला आहे. हरिभजनाच्या जोडीला 'ज्ञानार्जनाविण



आकाश धरेचा होईन मी सेतू। फडकेल मानव्याचा इथे केतू ।।

**चित्रपट पाहा : मी शिवाजीराजे भोसले बोलतोय** – सामान्य माणसाचा अन्यायाविरुद्ध लढा दाखवणारा चित्रपट

**प्रायोजक - श्री. अजित कानिटकर, पुणे**

काळ घालवू नको रे' असंही आवर्जून सांगितलं आहे. याच पुस्तिकेत तैत्तिरीय उपनिषदातला एक हृदयस्पर्शी श्लोक आहे. तो शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उद्देशून म्हटलेला आहे. त्याचा अर्थ असा की 'आम्हा शिक्षकांच्या हातूनही चुका होतात. आमचे दोष आणि दुर्वर्तनही तुमच्यापुढे असते. परंतु तुम्ही आमच्यातलं जे चांगलं आहे तेवढंच घ्या. इतर काही नको.' 'यानि अनवद्यानि कर्माणि' या श्लोकाला आप्पांनी जी चाल लावलेली आहे ती म्हणताना आजही मन आणि डोळे ओलावून जातात.

**माझा संगीत प्रवास**

आप्पांचे प्रबोधिनीतले पहिले दोन संगीत शिष्य म्हणजे मी आणि विसुभाऊ. मला गाता येतं हे मला माहीत नव्हतं. पूर्वी ग्रंडिग नावाच्या यंत्रावर गाणी वा भाषणं टेप करता येत. मी गायिलेलं गाणं आप्पांनी या यंत्रावर ध्वनिमुद्रित करून मला ऐकवलं आणि म्हणाले, 'पाहिलंस? तू चांगलं गाऊ शकतोस.' तेव्हापासून आज वयाच्या ८३ व्या वर्षापर्यंत मी गात आहे. प्रथम संघगीत, त्यानंतर प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी रचलेली गीतं, संतांचे विविध भावपूर्ण अभंग, भारताच्या विविध प्रांतभाषांमधली गीतं, टागोरांच्या गीतांजलीमधली इंग्रजी गीतं, गांधर्व महाविद्यालयाच्या प्रारंभिक परिक्षेचे पहिले आठ राग असा माझा संगीतप्रवास चालूच आहे.

**दृक्‌श्राव्य माध्यमाची जाण**

आप्पांना केवळ संगीतातलीच नव्हे तर इतर कलांचीही चांगली जाण होती. चाफेकर बंधूंवरचा चित्रपट त्यांनी पाहिला. त्यानंतर आपण दिग्दर्शक असतो तर हा चित्रपट कशारीतीने सादर केला असता यासंबंधीची अनेक कल्पनाचित्रं त्यांनी आमच्यासमोर उभी केली. डॉ. नलूताई गुजराथी या प्रबोधिनीतल्या विद्यार्थिनींची नृत्यं अतिशय सुंदर, कल्पकरीतीने बसवून घेत. पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांच्या भेटीच्या वेळी त्यांनी प्रबोधिनीच्या मुलामुलींकडून 'हे आनंदी गाणे' अत्यंत प्रभावीरीतीने साभिनय बसवून घेतलं होतं. त्या सादरीकरणातील कल्पकता आणि परिश्रम तसंच सामूहिक गुणवत्ता यांचं आप्पांनी मनापासून कौतुक केलं. दृक्‌श्राव्य माध्यमाची एक दुर्मिळ जाण त्यांना होती.

**कलादृष्टी आणि अभिरुची**

ज्ञान प्रबोधिनीच्या वास्तूची संकल्पना पाहिली तर त्यामागे उभी असलेली आप्पांची प्रतिभा आपल्या ध्यानी येते. ज्या प्रवेशद्वारातून वास्तूत यायचं ते प्रवेशद्वारही भव्य आकर्षक असलं पाहिजे हे लक्षात घेऊन पुण्यातील प्रबोधिनीच्या प्रवेशद्वाराची रचना आप्पांनी केली. त्याला जयपूर शैलीचा तोल-डौल आहे. वर्गांना रंग द्यायचा तो घाऊक एकच रंग वापरून, असं प्रबोधिनी विद्यालयात दिसणार नाही. गडद, फिक्या रंगाची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या रंगसंवादाची *हार्मनी* तिथे दिसते.

१९७५ मध्ये युवती प्रशालेची सुरुवात झाली. गणवेश कसा असावा यावर चर्चा झाली. तो ठरावीक पठडीचा नसावा असं आप्पांना वाटत होतं. वेगवेगळ्या प्रयोगांनंतर चाफ्याच्या पिवळ्या रंगाचा कुडता आणि टवटवीत ताज्या पानाच्या रंगाची सलवार, कुडत्यावर हिरव्या फुलांची

## चला मिळवूया ही गुणसंपदा !!

१. आवर्जून एखादी कला जोपासूया.
२. संगीताचे कार्यक्रम, चित्रकला प्रदर्शने यांसारख्या कार्यक्रमांना उपस्थित राहूया.
३. पाठ्यपुस्तकातील कवितेला सुंदर चाल लावून त्याचे साभिनय सादरीकरण करूया.
४. आपल्या वर्गाच्या फलकावर एखाद्या सुंदर कवितेच्या अर्थपूर्ण ओळी रोज लिहूया.
५. वर्गाच्या भिंतींची सजावट वेगवेगळ्याप्रकारे, कल्पकतेने वर्गमित्रांच्या साहाय्याने करणे व वर्ग सजवूया.
६. घरच्या एखाद्या कार्यक्रमासाठी बैठकीच्या खोलीची कलात्मक सजावट करूया.



**निळ्या आभाळाची ओढ वाऱ्याचा सोसाटा । पायतळी फुटतील नव्या नव्या वाटा।।**

**चित्रपट पाहा : गोष्ट छोटी डोंगराएवढी** – कर्जग्रस्त शेतकऱ्याची काळीज हेलावून टाकणारी कहाणी

**प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई**

नक्षी, असा सुंदर गणवेश तयार झाला आणि तो मान्यही झाला. प्रशालेच्या मुलींना तो शोभून दिसे. आप्पा कौतुकाने म्हणायचे, 'आज ही फुलपाखरं दिसताहेत. यांच्या उद्या देवता व्हायला हव्यात!'

विद्याव्रत संस्काराचं निमंत्रण पुण्यातल्या काही मान्यवर व्यक्तींना पाठवायचं होतं. एका अध्यापकांनी निमंत्रणाचा नमुना आप्पांना दाखवला. आप्पा नाराज झाले. म्हणाले, 'किती हे रूक्ष निमंत्रण! किती साचेबंद भाषा! भोवतालची चौकटही तशीच! लोकांना तुमच्या कार्यक्रमाला यावंसं वाटेल असं आर्जव, गोडवा भाषेत पाहिजे. कार्यक्रमाचं महत्त्व आणि स्वरूप नेमक्या, चित्रदर्शक शब्दांत हवं. आणि निमंत्रणाची सजावटसुद्धा कल्पक, नावीन्यपूर्ण हवी!' शिक्षिकांनी या सगळ्या अपेक्षा ध्यानात ठेवून परिश्रमाने, कल्पकतेने नवं निमंत्रणपत्र तयार केलं. ते मात्र आप्पांच्या पसंतीला उतरलं!

प्रत्येक कामात, मग ते लहान असो वा मोठं असो, त्यात कलापूर्णता, अभिरुची, सौंदर्य आणि अर्थपूर्णता, भावपूर्णता कशी येईल याबाबत आप्पा जाणीवपूर्वक प्रयत्न करत आणि तसं इतरांकडून करवूनही घेत!

**नि:संगता आणि रसिकता**

आप्पांनी श्राद्धसंस्काराच्या पोथीतील भजनात एकनाथ महाराजांचा एक हृद्य अभंग घातला आहे.

ऐसे असावे संसारी जोवरी प्राचीनाची दोरी
पक्षी अंगणाशी आले आपुला चारा चरूनी गेले
मुली घरचार मांडिला खेळ मोडोनी – टाकिला
वाटसरू वाटा आले प्रात:काळी उठोनि गेले
ऐसे असावे संसारी, जोवरी प्राचीनाची दोरी
एका विनवी जनार्दना ऐसे असता भय कोणा?

आप्पा अशा नि:संगतेने तरीही रसिकतेने जगले. रस, रंग, रूप, स्वर, लय, ताल, भावमुद्रा यांच्या आविष्कारांनी बनलेलं आपल्या भोवतालचं विश्व त्यांनी मनापासून आनंदाने अनुभवलं आणि त्याला नवीन रूप, आकार नि तसेच स्वर त्यांनी आपल्या प्रतिभेने दिले. आज आप्पा या जगात नाहीत तरी त्यांनी केलेली भावपूर्ण–उदात्त–प्रतिभाशाली संगीत निर्मिती आपल्याजवळ आहे. या भाग्याबद्दल आपण सदैव कृतज्ञ राहूया.


●●●

**– डॉ. व. सी. ताम्हनकर,** ज्ञान प्रबोधिनी, हराळी

---

**विज्ञान प्रयोग**

## *गवत हिरवंच का दिसतं?*



वेगवेगळ्या रंगाचे कागद घ्या. एक पांढरा कागद घ्या आणि टॉर्च. दारं-खिडक्या बंद करून खोलीत अंधार करा. टेबलावर लाल रंगाचा कागद ठेवा. पांढरा कागद त्याच्या शेजारीच उभा धरा. लाल रंगाच्या कागदावर टॉर्चचा प्रकाश सोडा. पांढऱ्या कागदावर लाल रंगाची छटा पसरेल. वेगवेगळ्या रंगांचे कागद ठेवून प्रयोग करा.

ज्या रंगाचा कागद त्या रंगाची छटा पांढऱ्या कागदावर दिसेल.

प्रकाशामध्ये अनेक रंग असताना एकच रंग का दिसतो? लाल रंगाच्या कागदावर प्रकाश सोडला तर लाल रंग बाकीचे रंग शोषून घेतो आणि फक्त लाल रंगच बाहेर सोडतो म्हणून लाल रंग दिसतो. हिरवा गवतावर पडलेला प्रकाश रंग सोडून बाकीचे सगळे रंग शोषून घेतो म्हणून गवत हिरवं दिसतं.



**ही स्नेहमयी ही निरांजनातील वात। ही चैतन्याची लखलखणारी ज्योत।।**

**कलाक्षेत्रातील संस्था :** Ramoji Academy of Film & Television हैद्राबाद, चित्रपट निर्मिती प्रशिक्षण

**प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

कथा रसास्वाद

# व्हाइसरॉयच्या भेटीचा दिवस

**'द डे व्हाइसरॉय केम्' (व्हाइसरॉय गावातून गेले तो दिवस) ही प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांची छोटीशी लघुकथा आहे. त्या कथेचा स्वैर अनुवाद सोबत दिला आहे. त्याचबरोबर तिची मांडणी किती कुशलतेने लेखकाने केली आहे, याचा आस्वाद कथेनंतर दिला आहे. तो वाचून कथा-रचनेतील सौंदर्य जाणून घेण्याचा जरूर प्रयत्न करा.**



त्या दिवशी सकाळी गोपाळच्या आईने लाकडी पेटीतून तपकिरी रंगाचा कोट बाहेर काढला. त्याला पितळी बटणे आणि पिवळी किनार होती. तो कोट तिने गोपाळच्या अंगावर चढवला. असे फक्त महत्त्वाच्या प्रसंगीच व्हायचे. कापूस आणि सागवानी लाकूड यांच्या वासाने गोपाळ उत्साहित झाला. वडिलांसारखाच आपणास वास येतो आहे असे वाटून त्याला आपण खूप महत्त्वाची व्यक्ती आहोत, असे वाटू लागले. त्याने आपली पाटी घेतली आणि मिजाशीत तो घराबाहेर पडला. शाळेत गेल्यावर रविवारची सुट्टी मिळाल्यावर होतो तशा आनंदात खिदळणाऱ्या मुलांमध्ये तो मिसळला.

हिंदुस्थानचा व्हाइसरॉय त्या छोट्या गावातून जाणार होता. आपल्या पत्नीबरोबर तो त्या गावच्या रेल्वे स्टेशनवर उतरणार होता आणि ताबडतोब देखण्या घोड्यांच्या छान सजवलेल्या चारचाकी गाडीतून सरळ रेसिडन्सीकडे (ब्रिटिश अधिकाऱ्याचे निवासस्थान) जाणार होता. नंतर तेथून गाजावाजा न करता दोन-दोन माणसांनी नेल्या जाणाऱ्या खुर्च्यांमधून ते पर्वतातील निवासाकडे उन्हाळ्याची विश्रांती घ्यायला जाणार होते.

काही महिन्यांपूर्वीच सर्व शाळांना परिपत्रक पाठवून, अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आला होता. चांगला पोषाख करून शाळेतल्या सर्व विद्यार्थ्यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभे राहून हिज एक्सलन्सी व्हाइसरॉय येताच योग्य प्रकारे मानवंदना देऊन त्यांचे स्वागत करावे. शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक मात्र बेचैन झाले होते. त्या दिवशी काहीतरी चूक होईल आणि आपल्या संस्थेची राज्यकर्त्यावर निष्ठा नाही असे दिसेल, असे भय त्यांना वाटू लागले. त्या महान घटनेत सहभागी होण्यासाठी खास कवायती घेण्याच्या आज्ञा सुटल्या आणि मुलांना दमछाक करणारे पुरेपूर प्रशिक्षण देण्यात आले.

इतर मुलांसोबत गोपाळही रेल्वे स्टेशनकडे कवायत करीत चालला होता. तेव्हा त्याला आपल्याला महत्त्वाची भूमिका करायची आहे आणि ब्रिटिश राज्यकर्त्यासंबंधीचे आपले कर्तव्य पार पाडायचे आहे, याची काही जाणीव नव्हती. महत्त्वाचा प्रसंग साजरा करण्यासाठी वाटण्यात आलेल्या थोड्याशा मिठाईने तो आनंदात होता. इतरांप्रमाणेच तोही उत्सव साजरा करण्याच्या मनःस्थितीत होता. कवायत मास्तरांच्या चेहऱ्यावरही कधी नव्हे ते स्मित होते आणि आज ते नेहमीच्या ताठरपणाने फिरत नव्हते.

रेल्वे स्टेशन आल्यावर मुलांना त्यांच्या आकारानुसार तसेच उंचीनुसार फूटपाथवर रांगेत उभे



हे क्षितिज रंगीत माझे, मी सहज तिथे झेपावे। त्या रंगांमध्ये माझे आयुष्य रंगुनी जावे।।

**कलाक्षेत्रातील संस्था :** Mindscreen Film Institute, चेन्नई, सिनेमॅटोग्राफी, पटकथा लेखन



प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिस्टन, अमेरिका



करण्यात आले; ज्यांचे पोषाख चांगले होते, त्यांना पुढच्या रांगेत ठेवण्यात आले.

आता काय होणार? गोपाळला दुसरे काही सुचत नव्हते. कवायत मास्तर इकडून तिकडे-तिकडून इकडे फिरत होते. जणू काही ते सैन्याची कवायतच घेत होते. ते लोकांबरोबर आपण संपर्काधिकारी असल्याच्या थाटात बोलत होते. मुख्याध्यापकदेखील केलेल्या व्यवस्थेबद्दल अधूनमधून त्यांचा सल्ला घेताना दिसत होते. काही मिनिटे झाली की, ते आपल्या मोठाल्या रिस्टवॉचमधे पाहून येणारा व्हाइसरॉयचा लवाजमा कुठे असेल ते जाहीर करीत होते. पण तासाभरात काहीच घडले नाही. मुले अस्वस्थ झाली आणि ''व्हाइसरॉय कधी येणार आहेत?'' असे विचारू लागली. कवायत मास्तरांनी गडबड करणाऱ्यांना चापले आणि विलंबाचे कारण शोधण्यासाठी ते रमतगमत निघाले.

जसजसा वेळ जाऊ लागला तसतसे उन्हाचे चटके बसू लागले. सगळीच माणसे आता गळून जाऊ लागली. एक-एक शिक्षक रस्त्याच्या कडेला लावलेल्या झाडांच्या सावलीचा आश्रय घेऊ लागला. मुले घोळक्या घोळक्याने जमिनीवर बसली. आता उन्हाने ती पार मलूल होऊ लागली.

थकलेला गोपाळ आपल्या वर्गमित्रांकडे पाहात होता. त्याला आता खूप कंटाळा आला असता; पण तेवढ्यात त्याला उजव्या पायाला कुणीतरी गुदगुल्या करते आहे, असे जाणवले. एक मोठा काळा मुंगळा डाव्या पायावरच चढत असल्याचे पाहून तो चमकला. निखाऱ्यावर पाऊल पडल्यावर उडी मारावी तशी त्याने उडी मारून तो मुंगळा झटकण्याचा प्रयत्न केला. मुंगळा आंधळा झाल्यागत भिरभिरला आणि पुन्हा त्याच्याकडे येऊ लागला.

गोपाळने एका लहान डहाळीने त्याला दूर लोटले, पण तो मुंगळा दुष्ट हेतू धरून आपल्या मिशांचे केस परजू लागला. त्याच्या हट्टामुळे गोपाळ वैतागला आणि त्याने त्याला आणखी रागाने दूर भिरकावले. तो मुंगळा दूर पडला आणि धुळीत लोळू लागला.

गोपाळला बरे वाटले. आता पुढे मुंगळा काय करतो, हे तो उत्सुकतेने पाहू लागला. मुंगळा



स्वच्छंदपणे विहरावे, ही मनात माझ्या आस। मी आकाशीचा पक्षी हे सत्य नसे हा भास।।



जरूर वाचा : मृण्मयी - गो. नी. दांडेकर - मॅजेस्टिक प्रकाशक

प्रायोजक - श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

पुन्हा सावरला. आपले काम न झाल्याने तो पिसाळल्यासारखा झाला. त्याने वासाचा मागोवा घेतला आणि रणांगणावरील शत्रूच्या रणगाड्याप्रमाणे गोपाळवर चाल करण्यासाठी येऊ लागला.

त्याचा राग इतका अनावर दिसत होता की, क्षणभर गोपाळला वाटले, आपली शक्ती लढायला अपुरी पडणार. त्याने घाईघाईने मूठभर वाळू गोळा केली आणि चाल करून येणाऱ्या मुंगळ्यावर टाकली.

गोपाळच्या नव्या तंत्राने खूप गोंधळून गेलेला मुंगळा तात्पुरत्या दफनातून बाहेर आला.

गोपाळला आता विजयाचा आनंद झाला, त्याचबरोबर करुणाही वाटली. त्याने हळुवारपणे गोंधळलेल्या त्या मुंगळ्याला उचलून डहाळीवर घेतले तसा तो डहाळीला चिकटून राहिला आणि पराभव स्वीकारल्यागत गप्प राहिला.

काही वेळाने तो डहाळीवरून चालत आपला मार्ग शोधू लागला. तो गोपाळच्या अगदी बोटांजवळ आला. गोपाळने तिथली बोटे काढून डहाळीचे दुसरे टोक बोटांनी पकडले नसते तर तो मुंगळा सरळ त्याच्या अंगावर चढला असता. आता मुंगळ्याला आपण अतिशय खोल विवराच्या कडेला असल्यासारखे वाटले. मग तो मागे वळला, गोपाळच्या बोटांच्या दिशेने चालू लागला. गोपाळने पुन्हा मघाचीच युक्ती अमलात आणली. त्याने डहाळीचे दुसरे टोक पकडले. त्याला हा खेळ आवडला. तो खेळ बराच वेळ अशा रीतीने चालू राहिला.

मग एकाएकी तुतारीची गर्जना आणि बँडच्या तालावरील 'गॉड सेव्ह द किंग' (देव राजाला चिरायू करो) हे गाणे त्याच्या कानावर आदळले. त्याच्याभोवती खूप धावपळ, खूप गडबड सुरू झाली. त्याने मुंगळ्यावरून आपले लक्ष आपल्या दोस्तांकडे वळवले. ते सगळे फूटपाथच्या कडेशी रांगेत उभे असलेले दिसले.

डहाळी, मुंगळा, त्याचा खेळ टाकून देऊन आपल्या मित्रांमध्ये जाण्याचे त्याने ठरवले तोच त्याच्या लक्षात आले की, डहाळीवर त्याच्या बोटाशी असलेला मुंगळा नाहीसा झाला आहे, तो घाबरला. तो मुंगळा आपल्या बोटांवरून सरकत आपल्या बाहीत शिरला असेल या विचाराने भयभीत होऊन तो त्या मुंगळ्याचा शोध जमिनीवर आणि आपल्या कोटामध्ये घेऊ लागला.

मुंगळा कुठल्या कुठे गडप झाला होता. बेचैन मनाने तो आपल्या मित्रांमध्ये मिसळला. त्याआधी केव्हाच हिंदुस्थानचा व्हाइसरॉय मात्र निघून गेला होता.

आता भराभर गर्दी पांगू लागली. 'मी त्याला जवळून पाहिले' एक मित्र म्हणाला.

'मला घोडे आवडले', दुसरा एक म्हणाला.



'काय भरदार व्यक्तिमत्त्व होते ते!' गोपाळने कवायत मास्तरांचे मत ऐकले.

गोपाळचा कोट उतरवून घडी करून लाकडी पेटीत ठेवता ठेवता आईने विचारले, 'तुझा वेळ मजेत गेला ना?'

'होय.'

'न् व्हाइसरायला चांगलं पाहिलंस ना?'

'नाही'

'का रे?'

'मी कामात होतो.'

●●●

(आर. के. लक्ष्मण यांच्या **Idle Hours** या कथा – प्रवासवृत्त– निबंध संग्रहात ही कथा आहे. प्रकाशक इंडिया बुक हाऊस प्रा. लि., मुंबई. प्रथम प्रकाशन वर्ष १९८२)

**(वरील कथेचा रसास्वाद पुढे पाहा.)**



**आभाळ झुलते वरी बिलगते ते क्षितिजाच्या काठा । पाऊल माझे ओढुन नेती दूरदूरच्या वाटा।।**

**जरूर वाचा : सुपरहिरो – मृदू मनाचा मनस्वी कलावंत – अनिल अवचट–** दीपा देशमुख, मनोविकास प्रकाशन

**प्रायोजक - श्री. विद्याधर जोगळेकर, पुणे**

# व्हाइसरॉयच्या भेटीचा दिवस
# या कथेच्या मांडणीतील सौंदर्य



कथेच्या सुरुवातीला गोपाळची आई गोपाळला खास ठेवणीतील नवे कपडे घालते. इतर मुलेही असेच करणार असतात. यात याचे वर्णन येते. हे वर्णन वाचत असताना तो कोणता खास दिवस असावा, याविषयीचे कुतूहल मनात जागृत होते.

पुढील परिच्छेदात या खास दिवसाचे कारण सांगितले जाते. त्या छोट्याशा गावातून व्हाइसरॉय जाणार असतात. ही घटना छोट्या गावाच्या दृष्टीने महत्त्वाची असते. त्यांच्या स्वागताला मुलांनी जमायचे असते. यासाठी शाळेने मुलांची कशी तयारी केलेली असते याचे वर्णन वाचकांच्या डोळ्यासमोर जिवंत चित्र उभे करते.

व्हाइसरॉयच्या स्वागताचे महत्त्व कळण्याइतका गोपाळ मोठा नाही; पण शाळेतील उत्साहाच्या वातावरणामुळे तो आनंदात आहे. कवायतीचे शिक्षक मुलांना स्टेशनवर शिस्तीत उभे करतात. वातावरण उत्सुकतेचे. सर्वजण व्हाइसरॉयची वाट बघत आहेत. इथे कथेचा अर्धा भाग पुरा होतो. एकूणच व्हाइसरॉयच्या भेटीचे महत्त्व, शिक्षक आणि मुले यांच्या मनातील उत्सुकता, त्यांना होणाऱ्या उशिरामुळे येऊ घातलेला कंटाळा, शिस्त सोडून थकलेल्या विद्यार्थ्यांचे घोळक्याने झाडाखाली बसणे या सर्व वर्णनातून मुलांचे मानसशास्त्र, त्यांचे अस्वस्थ होणे हे जाणवू लागते. पुढील सात परिच्छेदात एक वेगळीच घटना घडते. घटना तशी क्षुल्लकच पण छोट्या गोपाळच्या दृष्टीने खूप महत्त्वाची.

कंटाळलेल्या गोपाळच्या पायाशी मोठा मुंगळा येतो. गोपाळ एका डहाळीने उचलतो आणि त्याला डहाळीवर इकडे-तिकडे फिरवून खेळवतो. एक क्षण त्याला मुंगळ्याविषयी करूणा वाटते. आपला विजय झाला, असे वाटते. हा खेळ खूप वेळ चालतो. या सर्व खेळाचे तपशिलाने केलेले वर्णन लहान मुलांचे भावविश्व साकार करते.

एकाएकी God Save the King हे गाणे बँडवर वाजवले जाते. गोपाळ आपल्या खेळाच्या तंद्रीतून जागा होतो. आपल्या दोस्तांकडे वळतो. डहाळी टाकणार तोच तो मुंगळा नाहीसा होतो. तो आपल्या बाहीत तर शिरला नाही ना अशी बालसुलभ भीती त्याच्या मनाला ग्रासून टाकते. तो त्याचा शोध घेऊ लागतो आणि बेचैन मनाने आपल्या दोस्तांमध्ये मिसळतो. नंतर गोपाळ घरी येतो. आई त्याला ''व्हाइसरॉयना नीट पाहिलेस का?'' विचारते. तो उत्तरतो, ''नाही.'' ती विचारते ''का?'' तेव्हा तो उत्तरतो, ''मी कामात होतो.'' (I was busy) त्याचे शेवटचे हे वाक्य लहान असले तरी खूप अर्थपूर्ण आहे.

कथेच्या निम्म्या भागात व्हाइसरॉयच्या भेटीची तयारी, तिचे महत्त्व यावर भर आहे. दुसऱ्या भागात गोपाळचे मुंगळ्यांशी चाललेल्या खेळाचे वर्णन आहे. कथेच्या ९० ओळींपैकी ३३ ओळी त्यासाठी आहेत. चौथ्या परिच्छेदातील ''गोपाळला व्हाइसरॉयच्या स्वागताच्या महत्त्वाची जाणीव नाही'' या वाक्यावर दुसरा भाग अवलंबून आहे. सर्वांना एकच गोष्ट सारखीच महत्त्वाची वाटत नाही हे सत्य आर. के. लक्ष्मण यांनी सुचवले आहे. गोपाळला मुंगळ्याशी खेळताना करुणा वाटते, विजयाचा आनंद मिळतो. व्हाइसरॉयच्या केवळ दर्शनाने त्याला तसे काही मिळणार नव्हते. व्हाइसरॉयचे दर्शन हा अनुभव मुंगळ्याशी झालेल्या खेळासारखा उत्कट नव्हता, खिळवून टाकणारा नव्हता. त्या खेळात तो किती गुंगून, रंगून गेला. व्हाइसरॉयना पाहून इतरांना आलेला उत्कट अनुभव त्याला आलेला दिसत नाही.

**– आ. ना. पेडणेकर**
६ अनुपमप्रभा, अमरसी रोड, मालाड (प.), मुंबई ६४

(पूर्वप्रसिद्धी – सौर कार्तिक शके १९२३/
नोव्हेंबर २००१, वर्ष २-अंक २)

**चित्रकार : गिरीश सहस्रबुद्धे**



**चैतन्यमंत्र देणाऱ्या सूर्याची करितो भक्ती। काळोख दूर करण्याची तो नित्य देतसे शक्ती।।**



**जरूर वाचा : आदिवासींच्या जीवनात प्रकाशबीजं रुजविणारा प्रकाशयात्री – डॉ. प्रकाश आमटे** – दीपा देशमुख, मनोविकास प्रकाशन.

**श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे,** सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

# कलावंतांच्या नजरेतून कलाकृती...

सामान्य रसिकांनी घेतलेला कलानुभव आणि एखादया कलावंताने ज्या कलेची साधना केलेली आहे, त्याच क्षेत्रातील एखादया कलाकृतीचं त्याचं अनुभवणं यातील फरक पुढील लेख वाचताना तुमच्या सहज लक्षात येईल.

चित्रकलेचं शिक्षण घेत असताना चित्रतपस्वी आदरणीय एस. एम. पंडित यांच्या चित्रांचं प्रदर्शन बघण्याचा योग, साक्षात पंडितांच्या उपस्थितीत आजचे प्रथितयश चित्रकार गोपाळ नांदुरकर यांना आला. पंडितांची कलासाधना व कलानिष्ठा, त्यांचे संस्कार आणि श्रद्धा या साऱ्यांचा एक अद्भुत आविष्कार स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तिचित्रात साकारलेला नांदुरकरांना जाणवला. त्या चित्रातून जाणवलेलं सौंदर्य 'दैवी प्रतिभेचे 'चित्र'रूप' या लेखात त्यांनी शब्दबद्ध केलं आहे.

वयाच्या पासष्ठाव्या वर्षी आदरणीय रोहिणीताई भाटे यांनी सादर केलेली नृत्यमैफल त्यांच्या शिष्या शर्वरी जमेनिस यांच्या चिरस्मरणात राहिली, ती त्या नृत्यातील चैतन्य, सळसळती ऊर्जा, लालित्यपूर्ण पदन्यास आणि भावमुद्रा यांमुळेच! वरवरचा कलाविष्कार आणि कलेचं आतून उमलून येणं यातला फरक कळायला कलावंताचीच नजर हवी.

प्रसिद्ध कथक नर्तिका शर्वरी जमेनिस यांनी शब्दबद्ध केलेला अनोख्या मैफिलीचा अनुभव वाचूया त्यांच्या 'मी अनुभवलेली अविस्मरणीय मैफल' या लेखात.

---

## दैवी प्रतिभेचे 'चित्र'रूप

**– गोपाळ नांदूरकर**

तो १९९१ सालचा सप्टेंबर महिना होता. मी उपयोजित चित्रकलेच्या तिसऱ्या वर्षाचे शिक्षण घेत होतो. त्या दिवशी मी पुण्याच्या बालगंधर्व कलादालनाच्या बाहेर हळूहळू पुढे सरकणाऱ्या रसिकांच्या मोठ्या रांगेत उभा होतो. लहानपणापासून ज्या चित्रकारांची चित्रे मला मोहिनी घालत आली होती, माझ्या वडिलांनी जमवून ठेवलेली ज्यांची कॅलेंडर चित्रे मी मन लावून पाहात पाहात मोठा झालो, ते थोर चित्रकार एस. एम. पंडित यांचे चित्रप्रदर्शन पुण्यात भरले होते. आणि स्वत: पंडितजीही तिथे उपस्थित होते. माझ्यासाठी तो क्षण



**पूर्णाकृती चित्र पान क्र. ५१ वर पाहा**

एक मोठं स्वप्न पूर्ण करणारा होता; कारण कधी पंडितजींना पाहता येईल, त्यांची मूळ चित्रे पाहता येतील असं वाटलंच नव्हतं. भारावलेल्या अवस्थेतच मी कलादालनात प्रवेश केला. आत खूप गर्दी होती. त्या गर्दीच्या पलीकडे भिंतींवर मोठी मोठी चित्रे लावलेली दिसत होती. आणि समोरच्या बाजूला माझे लक्ष गेले. तेथे एक भव्य तैलचित्र विराजमान होते. ज्या चित्राच्या छापील प्रती मी घरी पाहात होतो, तसेच अनेक ठिकाणी लहान-मोठ्या आकारात ते चित्र छापलेलं पाहिलं होतं; पण आज मात्र ते भव्य चित्र प्रत्यक्ष समोर होते.

मित्र-मैत्रिणींनो ते चित्र होते 'स्वामी विवेकानंदांचे.' कन्याकुमारीच्या स्वामी विवेकानंद





**चित्रपट पाहा : काय दयाचे बोला –** करामती भाचे व वकील मामाच्या बुद्धिमान युक्तिवादाची कथा

प्रायोजक – श्रीमती उमा परांजपे, पुणे

इ. स. २०१५-१६ हे चित्रकार एस. एम. पंडित यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांची संपन्न चित्रसंपदा कर्नाटकातील गुलबर्गा येथे त्यांच्या घरातील कलादालनात जतन केलेली आहे. आपण आवर्जून जाऊन ती अनुभवायला हवी. आपल्या देशातील तसेच परदेशातील चित्रकारांच्या अनेक उत्तमोत्तम चित्रकृती विविध संग्रहालयात आहेत, त्या आपण प्रत्यक्ष पाहायला हव्या, त्यांचा आस्वाद घ्यायला हवा. सजगपणे इंटरनेट व इतर प्रसिद्धीमाध्यमांद्वारे चित्रकलाविषयक घडामोडी, कलाकृती, कलावंत यांची माहिती तुम्ही मिळवा, त्यातून तुमची सौंदर्यदृष्टी विकसित होऊन फार मोठा कलानंद तुम्हाला मिळवता येईल आणि आपले जीवन समृद्ध करता येईल.



**चित्रकार एस. एम. पंडित**

शिलास्मारकासाठी पंडितजींनी साकारलेले ते भव्य तैलचित्र! त्यात दिसणारे पूर्णाकृती 'स्वामीजी', त्यांच्यामागे पसरलेले विस्तीर्ण आकाश आणि पायाशी दिसणारा समुद्र. त्या चित्रासमोर उभे राहून ते प्रत्यक्ष अनुभवणे हा फार रोमांचकारी अनुभव होता.

एखाद्या कलावंताची प्रतिभा व प्रज्ञा, त्याची कलासाधना आणि कलानिष्ठा, त्यांचे संस्कार आणि श्रद्धा या साऱ्यांचा एक अद्‌भुत आविष्कार त्या चित्राच्या रूपाने साकारला होता.

या लेखासोबत छापलेले ते चित्र नीट पाहा. मी मांडत असलेली त्या चित्राची गुणवैशिष्ट्ये जाणीवपूर्वक वाचा आणि पुन्हा त्या चित्राकडे पाहा, म्हणजे तुम्हाला त्याचे श्रेष्ठत्व नक्कीच जाणवेल.

मित्रांनो, आपल्याला स्वामी विवेकानंदांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची, त्यांच्या ज्ञानाची, योगदानाची थोडीशी ओळख झालेली आहे. अर्थात स्वामीजींचे आकलन करून घेण्यासाठी आपल्याला सारा जन्मही अपुरा पडेल एवढे ते महान व्यक्तितत्त्व!

स्वामीजी शिकागोच्या धर्मपरिषदेला जाण्याआधी दि. २४ फेब्रुवारी १८९२ या दिवशी कन्याकुमारीला आले. त्यांनी अध्यात्मसाधना केली आणि त्या समाधी अवस्थेत त्यांना दिव्य आत्मज्ञान प्राप्त झाले. या शिलेवरून स्वामीजी उठून उभे राहिले तेव्हा एका थोर ईश्वरी शक्तीचा साक्षात्कार झालेला तो योगी महात्मा जगाला आपल्या ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी सज्ज झाला होता.

या घटनेनंतर सत्तर वर्षांनी त्या शिलाखंडावर स्वामीजींचे स्मारक उभारले जात होते. त्यासाठी त्यांचे भव्य तैलचित्र साकारण्याचे काम चित्रकलेतील कलातपस्वी महान चित्रकार श्री. एस. एम. पंडित यांना देण्यात आले. पंडितजींचा पिंड आध्यात्मिक होता. भारतीय देवदेवता व पौराणिक विषय चितारण्यात पंडितजींचा हातखंडा होता. तसेच ते उत्तम व्यक्तिचित्रकार *(पोर्ट्रेट पेंटर)* होते.

स्वामीजींच्या चित्राचे एक सकारात्मक आव्हान पंडितजींनी स्वीकारले. आपण जेव्हा एखादा विषय मन:पूर्वक चित्रित करायला घेतो, तेव्हा प्रथम त्या विषयात स्वत:ला झोकून देणे आवश्यक असते. तशा विषय प्रवेशासाठी पंडितजींनी प्रथम स्वामीजींचे गुरू पूज्य श्रीरामकृष्ण परमहंस यांचे व गुरुपत्नी श्री शारदामाता यांची चित्रे पूर्ण केली. मला वाटतं हा कलावंत मनाने स्वामीजींचे व्यक्तिमत्त्व समजून घेत होता, त्यांच्याजवळ पोहोचण्याचा प्रयत्न करीत होता. पंडितजींनी त्याबाबतचा अनुभव सांगितला होता की, त्यांनी जवळजवळ महिनाभर ध्यानधारणा व उपासना केली आणि त्याचे परिणामस्वरूप त्यांच्या डोळ्यासमोर स्वामीजींचे हे रूप उभे राहिले. दैवी प्रतिभेचा तो एक साक्षात्कारी क्षण होता. त्या प्रेरणेतून त्यांनी स्वामीजींचे हे चित्ररूप साकारले.

मित्रहो, हा काही चमत्कार नाही. हे चित्र म्हणजे कलावंतांच्या उच्च दर्जाच्या प्रतिभेचा आणि प्रज्ञेचा विलास आहे.

स्वामीजींचे जे मोजके फोटो उपलब्ध आहेत त्यावरून त्यांच्या

**कविता हे शब्दांचे लेणे... हे तर तुझेच देणे ! तुझ्याच सहवासात बहरते आनंदाचे गाणे।।**

**चित्रपट पाहा : दे धक्का –** ध्येयामागे जिद्दीने धावणाऱ्या मुलीची व कुटुंबाची कहाणी

वाचनाच्या आनंदाने उजळे आपुले जीवन, **'छात्र प्रबोधन'** सततच देई उपयुक्त विचारधन.

तेजस्वी व्यक्तिमत्त्वाची, अंगकाठीची आपल्याला कल्पना येते. त्यांच्या हाताची घडी घातलेला फोटो तर प्रसिद्धच आहे. पण पंडितजींनी चितारलेले स्वामीजी त्या शिलेवर उभे आहेत ते यतीवेशात. भारतीय संस्कृतीचे उदात्त दर्शन घडवणारी योग्याची भगवी वस्त्रे त्यांच्या अंगावर आहेत. त्यांच्या देहबोलीतून त्यांचे अविचल व्यक्तिमत्त्व प्रतीत होते. त्यांच्या पाठीमागचे आकाश त्यांच्या अमर्याद मोठेपणाची जाणीव करून देते. पायाजवळचा समुद्र आणि आकाश यांना जोडणारी क्षितिजरेषा चित्रात किती खाली ठेवली आहे पाहा. त्या क्षितिजरेषेपाशीच चित्रकारांनी स्वत:ची नेत्रपातळी *(Eye Level)* ठेवल्यामुळे स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वाची उत्तुंगता *(larger than life)* व्यक्त होते. स्वामीजींच्या चेहेऱ्यावरील बारकावे, भाव आणि त्यांचे तेजस्वी डोळे रंगवण्याचे पंडितजींचे कौशल्य केवळ लाजवाब आहे.

पंडितजींनी स्वीकारलेले हे आव्हान स्वकर्तृत्वाने लीलया पेलले आणि एक अजरामर व्यक्तिचित्र साकार केले. आज कन्याकुमारीच्या स्मारकात ते मूळ चित्र विराजमान आहे.

पंडितजींनी काढलेली मूळ चित्रे पूर्णत: भारावलेल्या अवस्थेत पाहून मी त्यादिवशी त्यांच्यापुढे नतमस्तक झालो. ते चित्रयोगी हात जोडून सर्वांच्या आदरयुक्त भावनांचा स्वीकार करीत होते. ते अविस्मरणीय क्षण आजही माझ्या मनात ताजे आहेत.

●●●

**– गोपाळ नांदूरकर**
१० विष्णू सदाशिव अपार्टमेंट,
४१ श्रीराम सोसायटी, पुणे ५८

# मी अनुभवलेली अविस्मरणीय मैफल!

**– शर्वरी जमेनिस**

कलाकाराच्या बाबतीत असं म्हटलं जातं की, अनेक कार्यक्रम उत्तम होतात; पण एखादा दिवस असा येतो की, काहीतरी नेहमीपेक्षा वेगळं, अद्‌भुत, सध्याच्या भाषेत बोलायचं तर 'भन्नाट' आणि कलेच्या भाषेत बोलायचं तर काहीतरी 'दैवी' घडून जातं आणि ती कलाकृती आपल्या कायमची स्मरणात राहाते. त्यातून मिळणारा रसानुभव आणि आनंद हा शब्दात मांडता येत नाही. तो केवळ त्याक्षणी जगायचा अनुभव असतो. पण मी जेव्हा माझ्या गुरू पंडिता रोहिणी भाटे यांच्या मैफिलींचा विचार करते तेव्हा मला


पंडिता रोहिणी भाटे

ही अनुभूती प्रत्येक मैफिलीतच असलेली जाणवते.

जसजशी 'मी' कथक नृत्याच्या बाबतीत जाणती झाले तोवर रोहिणीताईंची साधना चार तपांहून जास्त झाली होती. त्यांच्या नसानसात, प्रत्येक श्वासात कथक नृत्यशैली इतकी भिनली होती की, या तपश्चर्येची झळाळी, तेज त्यांच्या प्रत्येकच कलाकृतीला अद्‌भुततेने नटवत होते.

पण तरीही उल्लेख करायचा आणि एखादीच नृत्याची मैफल सांगायची तर त्यांच्या पासष्ठीनिमित्त झालेली स्नेहसदन सभागृहातली त्यांची मैफल.

पासष्ठाव्या वर्षी साधारणत:

काठीचा आधार घेऊन चालणाऱ्या सर्वांना अचंबित करेल आणि पंचविशीतल्या नृत्यांगनांनाही ओशाळायला होईल असं चैतन्य, सळसळती ऊर्जा आणि राजस, लोभस देखणं व्यक्तिमत्त्व म्हणजे रोहिणीताई!

त्यादिवशी पुण्यातील स्नेहसदनचं दालन खचाखच भरलेलं होतं. रसिक आतुरतेने वाट पाहात होते आणि पांढऱ्या शुभ्र साडीमधल्या रोहिणीताई डौलदार चाल करत माईकजवळ आल्या. अतिशय विनम्रपणे रसिकांना अभिवादन करून मैफिलीची सुरुवात त्यांनी एका वेगळ्याच वंदनेने केली– **'वृंदावने मत्त मिलिंद...'** एखाद्या देवी किंवा देवतेचे वर्णन नसून या वंदनेत वर्णन होते ते कृष्णाच्या अस्तित्वामुळे प्रसन्न झालेल्या वृंदावनातील वातावरणाचे. आपल्या अदाकारीने आणि सात्विकतेने परिपूर्ण अशा अभिनयाने रोहिणीताईंनी जणू वृंदावनच रसिकांसमोर उभं केलं. त्यानंतर त्यांनी प्रस्तुत केलेला साडेदहा मात्रांचा 'चित्ररूपक' हा ताल जणू काही या वृंदावनात नृत्यविलास करणाऱ्या श्रीकृष्णाचेच मोहक रूप दाखवत होता. स्वच्छ शब्दोच्चार असलेली अप्रतिम पढन्त, लालित्यपूर्ण अंगसंच, लयीवरची पकड, या वयातही थक्क करायला लावणारे पदन्यास आणि रसिकांशी आपल्या बुद्धिमत्तेने आणि वाक्चातुर्याने साधलेला संवाद यामुळे हा ताल प्रचलित तालांमधला नसूनही लोकांना आपला वाटला.

ऊर्जा आणि चैतन्याचा उत्सव असणाऱ्या या रचनेनं त्यांनी 'मुग्धा' ही नायिका सादर केली. 'मुग्धा' म्हणजे *teenager.* ना धड लहान ना धड मोठं असं मधलंच तुमच्या वयासारखंच 'अल्लड' वय. पण त्या अल्लड वयातला निरागस भाव नुसत्या डोळ्यांमधून रोहिणीताईंनी इतका सशक्तपणे उभा केला, की पासष्ठ वर्षांची ही नृत्यांगना सोळा वर्षांचीच भासू लागली.

त्यानंतर केलेली 'माखनचोरी' म्हणजे कार्यक्रमाचा सर्वोच्च बिंदू होता. ताक घुसळून लोणी काढताना दाखवलेले बारीक बारीक तपशील, बाळकृष्णाच्या चेहऱ्यावरील मिश्कील भाव आणि शेवटचा यशोदेचा लटका राग, त्याला लोणी भरविणं सगळंच बेमालूम!

मैफिलीची सांगता ज्ञानेश्वरांच्या विरहिणीने केली. 'घनु वाजे घुणघुणा...' आत्ममग्न करायला लावणारी, हुरहुर लावणारी ही रचना... 'दर्पणी पाहता रूप न दिसे हो आपुले' हे सादर करताना चेहऱ्यावर उमटलेले ते भाव आठवले की, आजही अंगावर रोमांच उभे राहातात आणि परमेश्वराच्या दर्शनाला आसुसलेला भक्त साकारताना खरोखरच सिद्धीला पोहोचलेल्या त्या कलाकाराने रसिकांचे डोळे कधी ओले केले हे कोणालाच कळले नाही... कार्यक्रम संपला तेव्हा टाळ्यांचा कडकडाट आणि डोळ्यांतून अश्रुधारा आणि उभे राहून मानवंदना अशी रसिकांची त्रिवेणी दाद बघायला मिळाली. रोहिणीताईंना तितकीच समर्पक साथ करणाऱ्या पं. अरविंदकुमार आझाद (तबला), श्री. प्रसन्न राजवाडे (हार्मोनियम), डॉ. माधुरी जोशी (गायन) आणि श्री. अजित सोमण (बासरी) या सर्व कलाकारांचे भरपूर कौतुक झाले.

रोहिणीताई नेहमी म्हणत– लोकांसाठी, रसिकांसाठी चेहऱ्यावर हास्य आणून 'नृत्य' करणं म्हणजे खोटं खोटं, वरवरचं नृत्य करणं *(प्लॅस्टिक स्माईलवालं)*; पण कलाकाराच्या आत दिवा लागणं महत्त्वाचं... कारण त्यातून जो चेहऱ्यावर प्रकाश येतो त्या प्रसन्नतेनं दिसणारा चेहरा लोकांच्या कायमस्वरूपी स्मरणात राहातो. आजही रोहिणीताईंच्या मैफिली स्मरताना सर्वप्रथम डोळ्यांसमोर येतो, तो त्यांचा प्रसन्न, तेजस्वी, नृत्याच्या प्रतिभेनं उजळलेला आणि डोळ्यातून सारं काही व्यक्त करणारा चेहरा...!

●●●

**– शर्वरी जमेनिस**
शशितारा विहार, संतोष हॉलमागे,
सिंहगड रस्ता, पुणे



फुलाफळातून दाटून आले मातीचे ऐश्वर्य। मावेना नयनात असे हे रंगगंध औदार्य।।

**चित्रपट पाहा : दहावी फ** – दहावीच्या मुलांच्या संतापाला विधायक वळण लावणाऱ्या शिक्षकाची कथा

मन वज्र हवे अन् मनगट ते पोलाद, **'छात्र प्रबोधन'** वाचून द्यावा कृतिरूप प्रतिसाद.

# भाग्ययोग


– मल्हार अरणकल्ले

**डोंगराच्या कुशीतल्या छोट्याशा गावात मोठा होणारा तुमच्याच वयाचा एक शाळकरी मुलगा! सभोवताली अस्सल रंगाचा, लोभस आकाराचा, घुंगुरवाळ्या नादांनी भारावलेल्या निसर्गाचा *कॅनव्हास* बारा महिने सोबतीला! अस्सल ग्रामसंस्कृतीचा गंध, स्वाद सभोवताली दरवळणारा! अशा वातावरणात रसिकतेची, कदाचित लेखनाची बीजंही नकळत मनात रुजली असावीत. हा 'भाग्ययोग' मल्हार अरणकल्ले यांना लाभला. त्याचं हे शब्दरूप!**

**मा**झं लहानपण खेड्यात गेलं. डोंगराच्या कुशीतलं छोटं गाव. निसर्गसौंदर्याची लयलूट, भक्तीची प्रासादिकता आणि संस्काराची दाट छाया, अशा दागिन्यांची समृद्धी. दुथडी वाहणारा ओढा. तुडुंब विहिरी. काठोकाठ भरलेली तळी. भव्य मंदिरं. गच्च झाडी. हिरवीगार शेतं. गवताळ कुरणांतून वळसे घेत जाणाऱ्या पाऊलवाटा. अस्सल रंगांचा आणि लोभस आकारांचा मोहवून टाकणारा असा कॅनव्हास बारा महिने सोबतीला असे.

रोजची सकाळ कमालीची ताजी-प्रसन्न असे. प्रत्येक दिवसाचा रंग वेगळा. कॅलिडोस्कोपमध्ये चित्रांचे आकार बदलत जावेत, तसा आजूबाजूचा निसर्ग रूपं पालटणारा. तिथला वारा आमच्याशी धावण्याची शर्यत लावी. पानं-फुलं लपंडाव केळत. पाऊसझड आनंदाचा चिंब अनुभव ओंजळीत टाकी. पक्ष्यांची चिवचिव हाका घाली. गाई-गुरांच्या गळ्यातला घंटांचा नाद आमचं मन उचलून डोंगरमाळावर घेऊन जाई.

कोवळी उन्हं गावात यायच्या आधीच मंदिरांत पूजाविधीचे गंभीर शब्द उमटू लागलेले असत. निरंजनाच्या मंद प्रकाशानं गाभारा जागा झालेला असे. आरतीच्या समूहस्वरांनी मंदिरात प्रसन्नतेचा दरवळ दाटून येई. फिकट प्रकाशात रस्त्यांना जाग येताच, पाणवठ्याकडं जाणाऱ्या वाटा बोलक्या होत. कुठं कुठं आडांवरचे रहाट कुरकुरू लागलेले



नितांत हळवे डोंगर आणि निवांत साऱ्या दिशा। संथ वाहत्या पाण्यालाही मोहकतेची नशा।।

चित्रपट पाहा : **Amazing Spider Man** –विज्ञान काल्पनिकेतील कोळ्याच्या जाळ्यांचा अभिनव वापर



असत. सडा-रांगोळ्यांनी घरांची अंगणं शुचिर्भूत होऊन जात. मग मुख्य रस्त्यांतला गलबला वाढत जाई आणि गावकुसाचा रस्ताही वर्दळीला येई.

या वातावरणात साहित्याचे मळे बहरलेले असत. वाऱ्याच्या लहरींबरोबर कवितेचे कोवळे शब्द वाहत येत. नजर फेकावी तिकडे चित्रमय आकारांची आणि रंगांची दुनिया दिसे. या साऱ्यांतून शब्दांचे खजिने ओंजळीत येत गेले.

निसर्गानं हाती दिलेलं हे चित्रमय पुस्तक नंतर सतत सोबतीला राहिलं.

आमचं घर पेठेच्या रस्त्याच्या आतल्या बाजूला होतं. तिथून छोटा रस्ता मुख्य रस्त्याकडं घेऊन येई. या रस्त्यावरून शाळेकडं जाताना रोज किती तरी आकर्षणं ठिकठिकाणी दबा धरून बसलेली असत. या रस्त्याला गवताची आणि रंगीबेरंगी फुलांची नक्षी लगडलेली असे. विविधरंगी पक्षी, फुलपाखरं, किडे असली मित्रमंडळी येता-जाता लक्ष वेधून घेत. सगळ्यांचीच इकडून तिकडं धावपळ सुरू असे आणि आमच्या नजरांचे आरसेही त्या हालचालींचा पाठलाग करीत असत.

या अद्‌भुत दुनियेवरचं लक्ष मोठ्या प्रयासानं काढून घ्यावं लागे; पण पुढंही नवं आकर्षण अडवण्याला सिद्ध असे. गुबूगुबू आवाजाचं ढोलकं नक्षीदार झूल पांघरलेल्या, खिलारी शिंगांच्या नंदीबैलाकडं खेचून नेई. शाळेकडं जाणाऱ्या रस्त्यावरची वळणं, तिथली झाडं यांच्याशी नकळत गट्टी जुळून जाई.

आमची शाळा म्हणजे पेशव्यांच्या सरदारांचा वाडा होता. मोठा दिंडी दरवाजा, रुंद-चौरसाकृती खांब, तुळया, भक्कम कडीपाट, कमानींच्या खिडक्या, नक्षीदार सज्जे, महिरपी कोनाडे. नजर जाईल तिकडं सुंदरतेचं आणि भव्यतेचं दर्शन होई. वाड्याच्या मोठ्या चौकात कारंजी नाचत असत. शाळेचा गणेशोत्सव तिथंच साजरा होई. गणपतीच्या मखराची सजावट पेशवेकालीन थाटात केली जाई. हंड्या, झुंबरं, जरीकामाच्या नक्षींचे भरजरी पडदे, वेगवेगळ्या नक्षीदार मूर्ती यांचं दर्शन मनोहारी असे. सामूहिक आरतीचे सूर दिवसभर कानांत भरून राहत.

रविवारची संपूर्ण सुटी आठवडे बाजाराच्या बरोबरीनं संपून जाई. साडेदहा-अकरा वाजण्याच्या



**भरारीत असे, क्षितिजाचे ध्येय। वादळाचे भय, अस्तंगत।।**



**कलाक्षेत्रातील संस्था : National Centre for the Performing Arts** (NCPA), मुंबई, उपयोजित कला

जिद्द, साहस, रंजकता यांचा मेळ भारी, **'छात्र प्रबोधन'** सवे घेऊ उंच भरारी.

सुमारास बाहेरगावच्या व्यापाऱ्यांच्या बैलगाड्या बाजाराच्या तळावर यायला सुरुवात होई. भाजीपाला, कापड, धान्य, तयार कपडे, मसाल्याचे पदार्थ, खेळणी असलं सर्व काही या बाजारात असे. किरकोळ भाजीपाला विकणारे शेतकरी रस्त्याच्या कडेनं माल मांडून बसत. तळाजवळ डोंबाऱ्याचा खेळ रंगलेला असे. निळ्या चौकोनी डब्यांतून गारेगार काढून देणारे पोरांचा घोळका सोबतीला घेऊन सायकल फिरवीत असत. खेळण्यांच्या दुकानांभोवती पोरांचा गराडा पडलेला असे. कापडविक्रीच्या पालांत लग्नाचे बस्ते बांधले जात. भाजी विक्रेत्यांच्या परस्परांशी स्पर्धा करणाऱ्या आरोळ्यांनी बाजारतळ दुमदुमून गेलेला असे.

गावाजवळच्या डोंगरावर अंधार येऊन बसावा आणि अचानक रस्त्यांवर उतरून त्यानं अवघं गाव मुठीत ठेवून द्यावं, तशी संध्याकाळ होत जाई. पणत्यांनी मंदिरांचे मंडप उजळून जात. काही वेळानं तिथं गॅसबत्ती पेटवली जाई आणि मग कीर्तन-प्रवचनांत मंडळी रंगून जात. मोठ्यांचं बोट धरून मुलंही तिथं दाखल झालेली असत. कथेकरी बुवा गोष्टीरूप आख्यानांतून रामायण-महाभारत साक्षात उभे करीत. सारी पात्रं आणि प्रसंग जिवंत होऊन समोर दिसू लागत. कोपऱ्याकोपऱ्यांवरच्या खांबांवर रॉकेलचे दिवे पेटले असत. मंदिरातून रात्री घराकडं परतताना त्यांचा प्रकाश बोट धरून घरापर्यंत घेऊन जाई.

सुगीच्या दिवसांत शेतांचा रंग विलक्षण खुलून जाई. तयार झालेल्या पिकांनी शिवारं श्रीमंत झालेली असत. पाखरांचे थवे कणसं फस्त करण्यासाठी शिवारात गोळा होत. राखणीसाठी शेतात मचाणं उभी केली जात. तिथून गोफणी फिरू लागत. पाखरांना हुसकावण्यासाठी दिलेल्या हाकांनी रानं दणाणून जात. पाहता पाहता भलरीची गाणी सुरू होत आणि खळ्यांवर धान्यांच्या राशींचं सोनं जमा होत राही.

ढोल-लेझीम, ताशा आणि पिपाणी ही वाद्यं सणांची चाहूल देत. या काळात गावातलं वातावरण कमालीचं बदलून गेलेलं असे. रंगसफेती केलेली घरं, स्वच्छ झालेली अंगणं, दरवाजांवर झुळझुळणारी तोरणं आणि घराघरांतून येणारे गोड पदार्थांचे हवेहवेसे सुवास. सणांच्या समृद्धीचे मोती तेव्हा इतके भरभरून जमा केले, की आजही त्यांची उणीव भासत नाही. ग्रामदैवताच्या यात्रेत पालखी नगरप्रदक्षिणेला निघे, तेव्हा त्या गर्दीत तल्लीन होऊन चालताना मन हरखून जात असे. मुख्य दिवशी छबीना मिरवणूक असे. ती तर केवळ पर्वणीच वाटे. ढोल-लेझमींचे ते मर्दानी आवाज नंतर किती तरी दिवस मनात सोबतीला राहत. या आवाजांचं नातं आजही एवढं घट्ट आहे, की नुसत्या आठवणींनीही समोर अनेक ढोल-ताशे घुमू लागतात आणि लेझमींचे खेळ नाचू लागतात.

गावातल्या मोठ्या चौसोपी वाड्यांच्या भिंतीवर चित्रकथा रंगविलेल्या होत्या. उन्हा-पावसात असूनही त्यांचा रंग थोडाही फिसकटला किंवा विरला नव्हता. ही चित्रं पाहण्यात, त्यांच्या आकारांचं आणि रंगांचं सौंदर्य समजून घेण्यात किती वेळ जाई, त्याची गणतीच नसे. या वाड्यांच्या दरवाजांवर, चौकटींवर अप्रतिम कोरीव काम असे. घडविलेल्या दगडांतही सुंदरतेचा आविष्कार असे.

संस्कारक्षम वयात माझ्याभोवती या असल्या खुल्या पुस्तकांचा खजिनाच होता. ही पुस्तकं केव्हाही वाचता येत असत. त्यांची पानं किती तरी वेळा डोळ्यांत मनसोक्त साठवून घेता येत. कथा-कविता, कादंबऱ्या, ललित साहित्य हाती येण्याआधीच गवसलेलं हे संपन्न ग्रंथालय आजही बरोबर आहे. असा भोवताल लाभला, त्याला भाग्ययोग नाही तर काय म्हणणार?

●●●

**- मल्हार अरणकल्ले**
१०/२, गुरुजन सोसायटी,
कोथरूड, पुणे 411038



**भूमी तापली तापली, तिने करुणा भाकली। ओल्या ढगाची पखाल भूमीपावेतो वाकली।।**

**कलाक्षेत्रातील संस्था : Film & Television Institute of India** (FTII), पुणे (महाराष्ट्र), चित्रपट निर्मिती प्रशिक्षण

# किस्से 'पु.लं.'चे...

- एकदा पु. ल. ना एक *'कुकरी सेट'* भेट म्हणून मिळाला. तो सेट सुनीताबाई देशपांडे आपल्या भाचीला दाखवत होत्या.
  सुनताबाईंचा सर्व काही जपून ठेवण्याचा स्वभाव माहीत असल्यामुळे भाची सुनिताबाईंना म्हणाली,
  ''अगं, एवढा सुंदर सेट फुटू नये या भीतीने तू तो कधी वापरणारच नाहीस का?''
  त्यावर पु. ल. पटकन म्हणाले, ''हो तर! सुनीता मला कधी ऑमलेटसुद्धा करून देत नाही.. अंडी फुटतील म्हणून!!''
- एकदा पु.ल. प्रवासात असताना त्याना कोणीतरी भेटला.
  तो त्याचा चाहता होता. तो म्हणाला की,
  ''माझी फक्त दोन व्यक्तींवर श्रद्धा आहे, एक ज्ञानेश्वर आणि दुसरे तुम्ही.
  माझ्या खोलीत मी ज्ञानेश्वरांच्या फोटोसमोर तुमचाही फोटो ठेवलाय.''
  त्यावर पु.ल. म्हणाले, ''अहो असं काही करू नका नाहीतर लोक विचारतील,
  ज्ञानेश्वरांनी ज्याच्याकडून वेद म्हणून घेतले तो रेडा हाच का म्हणून?''
- पु. ल. एकदा मिठाईच्या दुकानात गेले, मिठाई खरेदी केली आणि खोक्यात बांधून द्यायला सांगितले. दुकानातील व्यक्ती म्हणाली, ''खोक्याचा चार्ज पडेल.''
  त्यावर पु.ल. म्हणाले, ''अरे वा, म्हणजे आतली मिठाई फुकट?''
- स्वत:च्या खास विनोदी पद्धतीत पु. ल. एके ठिकाणी म्हणतात, ''मुलगी अगर मुलगा सरळ वळणाची अगर सरळ वळणाचा कसा असतो कोण जाणे! कारण वळण म्हटल्यावर ते सरळ कसे असणार? भूमितीला बुचकळ्यात टाकणारी ही सरळ वळणाची आडवळणी व्याख्या आहे.''



## हसरा कोपरा



### निर्णय

जगदीशला पोहायला शिकायचे होते. मित्रांबरोबर तो तलावावर गेला. थोड्या पाण्यात उतरता उतरता त्याचा पाय घसरला व तो बुडू लागला, मित्राने लगेच त्याला बाहेर काढले व काठावर आणले. काठावर आल्यानंतर जगदीश म्हणाला,
''माझा निर्णय आता पक्का आहे. जोपर्यंत पोहता येणार नाही, तोपर्यंत मी पाण्यातच उतरणार नाही.''

### सामान्यज्ञान

आपल्या छोट्या भाच्याचे सामान्यज्ञान पाहण्यासाठी मामांनी प्रश्न केला – लागोपाठ दोन दिवस पाऊस पडू शकतो का नाही? सांग बरं.
''मुळीच नाही'', भाचाने आत्मविश्वासाने उत्तर दिले.
''का नाही पडू शकत? कारण सांगू शकशील?''
''मध्ये रात्र असते म्हणून'', भाचाने लगेच सांगितले.


कशास वाटे तुला पानगळ उदास आणि हिरमुसलेली। गळावयाला हवे जुन्याने, उगवुन येईल नवे तरी।।

कलाक्षेत्रातील संस्था : **Whistling Woods International**, मुंबई (भारत)– कम्युनिकेशन व मीडिया आर्टस्

आस्वाद कवितेचा

# पुस्तकांचे आभाळमन

**– शैलजा देशमुख**



*पुस्तकं गच्च भरलेलं आभाळ असतात*
*तेव्हा आपण जमीन व्हावं लागतं,*
*आणि मुरवावं लागतं त्यांना,*
*आपल्या आत।।१।।*

*कधी ती झाडे होतात घनदाट,*
*तेव्हा आपण पांथस्थ होऊन*
*बसायचं असतं त्यांच्या सावलीला,*
*निवांत।।२।।*

*कधी कधी तर ती पक्षी होतात,*
*तेव्हा पंखात बळ घेऊन,*
*उडावं लागतं आपल्याला*
*त्यांच्या बरोबरीनं।।३।।*

*पुस्तकातून कधी शिशिरही भेटतो,*
*मग आपण उजाड माळ होतो,*
*तेव्हा तीच वसंताची चाहूल होतात,*
*आपल्यासाठी।।४।।*

*पुस्तकांना स्पर्श असतो, वास असतो.*
*पण त्यासाठी मनाला फुटाव्या लागतात.*
*संवेदनांच्या लक्ष पाकळ्या*
*मग पुस्तके उधळून टाकतात*
*वसंतातले सगळे रंग।।५।।*

*पुस्तकांना कळते सगळे, सगळे*
*आपल्याला कळते का?*
*पुस्तकांचे आभाळमन?*

– नीलिमा पालवणकर

**'ग्रं**थ हेच गुरु,' 'ग्रंथ म्हणजे आपलं अनुभवविश्व संपन्न करणारे मित्र!' अशा प्रकारची ग्रंथमहात्म्य सांगणारी सुभाषितवजा वाक्यं आपण निबंधामध्ये वापरत असतो. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या अनेक थोर व्यक्तींच्या जडणघडणीत पुस्तकांचे योगदान किती होते, हेही आपण वाचलेले असते. पण रसिक, भावनाप्रधान कविमनाच्या व्यक्तींचं पुस्तकांशी असलेलं नातं खूप भावनिक पातळीवरचं असतं, हा अनुभव नीलिमा पालवणकर यांची 'पुस्तक' ही कविता वाचताना येतो.

आभाळ, झाडं, पक्षी, जमीन, माळरान, शिशिर-वसंतातील निसर्गाचे विभ्रम यांविषयी कवितेतील निवेदिकेला खूप ओढ आहे. तसंच पुस्तकांविषयीही तिला प्रेम आहे. त्यामुळे पुस्तकं म्हणजे कधी तिच्यासाठी आभाळ असतात तर कधी पक्षी! पुस्तकात तिला कधी शिशिर ऋतू भेटतो तर कधी वसंत! आणि मग पुस्तकांशी नातं असणारी ती असते कधी जमीन, कधी पांथस्थ (वाटसरू) तर कधी उजाड माळ. ही नाती एकेका कडव्यातून कशी उमलत जातात हे आता पाहूया.


**पुस्तक गच्च भरलेलं आभाळ असतात...**

आभाळ जसं अथांग, व्यापक असतं. तसंच पुस्तकांचं विश्वही अथांग.. कथा-कादंबरी-कविता-ललित लेखन.. वैचारिक... एक ना अनेक प्रकारच्या अनंत पुस्तकांनी हे पुस्तकांचं विश्व गच्च भरलेलं. केवळ संख्येनेच नाही तर गुणात्मकतेनेही! मानवी जीवनाला आधार देणारी मूल्यं, शुद्ध सात्त्विक विचार, आपल्या जगण्यातल्या लहानसहान गोष्टी, भाव-भावना, विचार यांनी हे पुस्तकांचं आभाळ गच्च भरलेलं असतं. जमिनीला तृप्त करणारे,



**हे नच पुस्तक, ही तर खिडकी जग भवतीचे पाहण्यासाठी। हे नच पुस्तक ही तर दुर्बिण अदृष्टाला भिडण्यासाठी।।**

**कलाक्षेत्रातील संस्था : Asian Academy of Film & Television** (AAFT), नोईडा (दिल्ली)- चित्रपट निर्मिती प्रशिक्षण



पाण्यांनी भरलेले ढग आभाळात असतात. सूर्याचे तेजही ते सामावून घेते; चंद्राची शीतलताही आभाळात असते आणि या सर्व गोष्टी ते जमिनीला देतं. त्याच्या साहाय्याने पृथ्वीवर जीवन फुलतं-फळतं. म्हणूनच कवयित्रीने पुस्तकं म्हणजे संपृक्त ढग असलेले आभाळ आणि वाचक म्हणजे ती पुस्तके वाचून समृद्ध होणारी जमीन अशा प्रतिमा वापरल्या आहेत. मात्र आपण जमीन व्हायला हवं... म्हणजे पुस्तकांतून उदात्त विचार, भावनांचा ओलावा, आनंदाचा शिडकावा अनुभवण्यासाठी उत्सुक वाचक बनायला हवं.

**कधी ती झाडे होतात घनदाट...**

थकल्या भागल्या वाटसरूला-पांथस्थाला झाडं शीतल सावली देतात. सुंदर फुलं-फळं यांचंही देणं देतात. पुस्तकंही अशीच या झाडांसारखी-जीवनातलं रखरखीत उन्ह-दु:ख विसरायला लावणारी!!

एखादवेळी अभ्यास करून कंटाळा येतो, कधी मन उदास असतं, कधी एकटेपणा जाणवतो, अशावेळी खुशाल एखादं छानसं उत्साह देणारं गाणं-कविता आठवावी, छानशी गोष्ट वाचण्यात रमून जावं... या पुस्तकांच्या झाडात काय-काय असतं...

कोवळ्या भावनांची स्पंदनं... सुंदरतेच्या सुमनांवरची फुलं... कधीच न संपणारे माणसाच्या भावभावनांचे जीवनगाणे, लेखकांच्या प्रतिभेला फुटलेली पालवी म्हणजे या झाडांची पानेच पाने.

अशा पुस्तकांच्या झाडाखाली आपण पांथस्थ-वाटसरू होऊन बसायचं म्हणजे नेमकं काय? वाटसरू जसा झाडाच्या सावलीत शांतता, शीतलता अनुभवतो तसाच आनंद पुस्तकं वाचताना आपण मिळवायचा...

**कधी कधी तर ती (पुस्तकं) पक्षी होतात...**

पक्षी-बळकट पंखांनी उड्डाण करणारे, भरारी घेणारे, उंच उंच गरुडझेप घेणारे, वादळवाऱ्याला न



**हे नच पुस्तक हा तर परवाना विश्वनागरिक होण्यासाठी। हे नच पुस्तक हा तर आरसा स्वत:लाच ओळखण्यासाठी।।**



**कलाक्षेत्रातील संस्था :** श्रीराम भारतीय कला केंद्र, नवी दिल्ली, संगीत, नृत्य व उपयोजित कला प्रशिक्षण

जुमानता त्यावर मात करणारे, सूर्याचे तेज पिणारे सूर्यपक्षी.

कारण हे पक्षी अशा पुस्तकातले असतात की ज्या पुस्तकांत रेखाटलेली असतात दिव्य स्वप्ने. उंच आकांक्षा, उच्च ध्येये, महान मानवी कर्तृत्व – ती कधी असतात थोरांची दीपस्तंभासारखी चरित्रे–आत्मचरित्रे, सावरकरांची 'माझी जन्मठेप', कलामांचं 'अग्निपंख', कुसुमाग्रजांची 'क्रांतीचा जयजयकार'... अशी पुस्तके आपल्यातही भव्य स्वप्नांचे बीज पेरतात. जीवनात भव्य–दिव्य उंच भरारी घेण्यासाठी बळ देतात.

**'पुस्तकांतून कधी शिशिरही भेटतो'...**

शिशिर... गळत्या करपल्या पानांचा, शुष्क सुकल्या फांद्यांचा. माणसाच्या जीवनात सुखाबरोबर करुण वेदनाही असतात. अनेक 'उपेक्षितांचं अंतरंग' ही पुस्तकं उलगडतात. तेव्हा आपणही त्यांच्या दु:खाशी एकरूप होऊन 'उजाड माळ' होतो. आपल्याही डोळ्यात नकळत पाणी येतं.

मात्र हीच पुस्तकं कधी वसंताची चाहूलही देतात. आपल्या जीवनात अनेक आनंदाचे क्षण येतात. अनेक माणसांशी आपले भावबंध जुळतात. अनेक पुस्तकातून त्याचेही चित्रण आपल्याला वसंत ऋतूच्या बहराचा अनुभव देते.

पुस्तकांना ज्ञानाचा स्पर्श असतो, भावांचा गंध असतो. वसंतऋतूतील फळाफुलातून रूप–रस–गंध–स्पर्श–नाद या पंचसंवेदना आपल्याला भावतात. तसंच पुस्तकंही लेखकाने पंचेंद्रियांनी घेतलेल्या अनुभवांतूनच जन्माला येतात. म्हणूनच पुस्तकांचा आस्वाद घ्यायचा तर आपल्या मनाला संवेदनांच्या लक्ष लक्ष पाकळ्या फुटाव्या लागतात. पुस्तकातील विचारांशी, भावभावनांशी, त्यातील व्यक्तिरेखांशी आपण एकरूप होऊन ती वाचावी लागतात. असे झाले तरच ही पुस्तके उधळून टाकतात वसंतातले ते सगळे पंचरंग !

शेवटल्या तीन ओळीत कवयित्री सर्व रसिकांनाच आवाहक प्रश्न विचारते – माणसाच्या अवघ्या जीवनाकडे ही पुस्तकं समंजसपणे पाहातात, त्यांना हेही कळतं की, तुम्हा वाचकांना–रसिकांना द्यावं, त्यांना कळलेलं सगळं! असे हे त्यांचे देणाऱ्याचे आभाळमन आपल्यातील घेणाऱ्यांना कळते का? कळायला हवे ना ! त्या शेवटल्या प्रश्नचिन्हात हे उद्गारचिन्ह दडलेलं आहे.

आता रचनेच्या दृष्टीने विचार केला तर पहिली चार कडवी अशी आहेत की, प्रत्येक कडवे म्हणजे एकेका पूर्ण वाक्याची एकके आहेत. पहिल्या तीन ओळींचे तीन स्वल्पविराम आणि चौथ्या ओळीचा पूर्ण विराम. पहिल्या चारही कडव्यांतील अंतर्गत लय एकसारखी आहे. अर्थाच्या दृष्टीने पहिली ओळ पुस्तक प्रतिमा, दुसरी ओळ वाचक प्रतिमा आणि तिसरी–चौथी ओळ पुस्तकांबद्दल वाचणाऱ्याची ओढ अशी मांडणी झालेली दिसते.

पुढील कडवी या आकाराच्या बंदिशीतून सुटून रचनेचे स्वातंत्र्य घेतात; आणि मुक्तपणे अधिक उत्कटतेने बोलू लागतात. खरं म्हणजे मनाला संवेदनांच्या लक्ष कळ्या फुटून पुस्तकांतील वसंताच्या साऱ्या रंगांची उधळण सर्वांगांनी अनुभवण्याच्या क्षणी ही कविता सहाव्या कडव्यात संपते; आणि सातव्या कडव्यात पुस्तकाच्या आभाळमनाचे पडसाद आपल्या कानात, मनात निनादत राहतात. थोडक्यात काय, पुस्तकांचं अफाट विश्व वाचकाला काय देतं हे सांगताना वाचकाची घेण्याची आस्वादाची भूमिकाही खूप उत्कट असली की, काय जादू घडते याचं शब्दचित्र म्हणजे नीलिमा पालवणकरांची 'पुस्तकं' ही कविता !

(प्रा. एम्. पी. पाटील यांच्या 'कविता शिकवलेल्या, कविता आवडलेल्या' या पुस्तकातील लेखाच्या आधारे साभार.)

●●●

**– शैलजा देशमुख**

सी – १०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २,पुणे 411009

sgdeshmukh50@gmail.com



हिरव्या या धरतीची उबदार माया । गर्द झाडी निळ्या-काळ्या लडिवळ छाया।।

**कलाक्षेत्रातील संस्था : The Bangalore School of Speech and Drama,** बंगळुरु (कर्नाटक)– नाट्य, वक्तृत्व प्रशिक्षण




मातृभाषेचा करू आम्ही आचारातून प्रचार, **'छात्र प्रबोधन'** आम्हा हा प्रेरक विचार.

# ‘छात्र प्रबोधन’ - वर्ष पंधरा : आढावा

**सौर आश्विन शके १९३६ ते सौर भाद्रपद शके १९३७ (इ.स. २०१४ - २०१५)**

| आढावा : संख्यात्मक सारणी (वर्षभरात येऊन गेलेले एकूण साहित्य) | | | |
|---|---|---|---|
| विशेषांक - ४ | माहितीपर - २४ | कृतिपर-विज्ञान,कला,प्रकल्प-२० | लेखमाला- २ (लेख - ११) |
| कथा - २२ | व्यक्तिपरिचय- २ | प्रासंगिक - ६ | अभ्यासाला पूरक साहित्य -१ |
| कविता - २५ | भटकंती - ४ | व्यक्तिविकसन - ६ | लेखक - ११६, कवी - २२ |
| ललित - २६ | जरूर वाचा/पाहा - ८ | एकांकिका - ३ | चित्रकार - २१, एकूण पृष्ठे ५७६ |




**सौर आश्विन, शके १९३६। ऑक्टोबर २०१४**
**वर्ष १५ अंक १**

**कथा :** पजण - **कमल राजाज्ञा**
**कविता :** चांदण्याची दुलई-**कविता मेहेंदळे**
**ललित :** ‘रम्य पदांचा न्यास’ कवितेचे रसग्रहण - **आश्लेषा महाजन**
**माहितीपर :** नावातील गंमती-जंमती - **श्रीनिवास शारंगपाणी**
**व्यक्तिविकसन :** स्मृतींच्या गावातील गंमती-जंमती - **डॉ. मानसी देशमुख**
**संवाद कौशल्य :** (१०) प्रभावी संवाद कौशल्यातून करिअरकडे - **डॉ. श्रीराम गीत**
**समूहगीत :** रम्य पदांचा न्यास - **आश्लेषा महाजन**




**सौर कार्तिक, शके १९३६। नोव्हेंबर २०१४**
**वर्ष १५ अंक २ - दीपावली विशेषांक**

**कथा :** म्हंजे म्हंजे वाघाचे पंजेऽऽ - **क्षितिज देसाई**, पंख असलेला माणूस! - **भारत सासणे**, रणफंदीची जात आमुची! - **निनाद बडकर**, एक नूर आदमी! - **मंगला गोडबोले**, भूक मायेची - **अनु. अंजनी नरवणे**, जादू की झप्पी! - **डॉ. प्रदीप आवटे.**
**कविता :** निबंधन् - **आसावरी काकडे**, प्रवासाच्या खिडकीतून - **आश्लेषा महाजन**, यशाचा सुगंध - **डॉ. सुमन नवलकर**, इटुक इवली कळी - **मृणालिनी कानिटकर-जोशी**, एक ससा लाल डोळ्यांचा - **अनु. मेघना पळशीकर**, मी कुमार होतो - **किशोर पाठक**
**ललित :** कॉफी, कॅमेरा आणि काहीबाही - **प्रसाद सांडभोर**, चित्रलीला - **गोपाळ नांदूरकर**, आली दिवाळी दिवाळी - **डॉ. नीलिमा गुंडी**, दगड - **श्रीनिवास शारंगपाणी**, वक्तृत्वाची पहिली पाठशाळा - **प्रवीण दवणे**
**माहितीपर :** समुद्र जीवाणूंपासून प्रतिजैविके - **डॉ. सुनीति गोरे**, गाऊ ‘मंगल’गान - संकलित, निसर्गातील मूलभूत बले - **डॉ. निवास पाटील**
**व्यक्तिविकसन :** न मळलेली वाट - **सुप्रिया वाकणकर**, निर्णयाच्या अवघड वळणावर... - **उमेश झिरपे**, गुण-दोषांतील सीमारेषा - **शैलजा देशमुख**
**विशेष लेखमाला :** जोडीने केलेला ध्येयप्रवास... समृद्ध सहजीवन - **डॉ. रवींद्र कोल्हे**, सर्जनशील सहप्रवास - **सुनील सुकथनकर**, जोडी जमली रे! - **सुभाष देशपांडे**
**विशेष विभाग :** समस्या परिहार हीच खरी समस्या!! - **रामचंद्र डिंबळे**, समस्या आणि समस्या परिहार - **डॉ. उर्मिला सडोलीकर**, ‘झोजिला’चे युद्धनाट्य! - **राहुल कोकीळ**, समस्या परिहारातील अडथळे - **डॉ. वसुधा कुलकर्णी**, उत्तरांची दिशा - **मल्हार अरणकल्ले**




**सौर अग्रहायण, शके १९३६। डिसेंबर २०१४**
**वर्ष १५ अंक ३**

**कथा :** काडी पेहलवान झाले हनुमान - **डॉ. लीला दीक्षित**
**एकांकिका :** वेडं वय - **शिल्पा कुलकर्णी**
**कविता :** थंडी - **डॉ. प्रदीप आवटे** चालत राहा - **डॉ. विनय अपसिंगकर**,
**ललित :** मातीचं माहेर - **सुनील शिनखेडे**
**माहितीपर :** सागर शिंपले - **नरेन्द्र नायडू**, बहुउपयोगी आजीचा बटवा - **डॉ. कांचनगंगा गंधे**

**निर्माणाचे हात... मिळू दे प्रत्येकाला काम। कुणी न राहो इथे उपेक्षित सदन हेच विश्राम।।**

**कलाक्षेत्रातील संस्था :** भारतेंदु नाट्य अ‍ॅकेडमी, लखनऊ (उत्तरप्रदेश) - अभिनय प्रशिक्षण

स्थल, काल, परिस्थितीचे करुया चिंतन । **‘छात्र प्रबोधन’** करी विचारांचे मंथन.

**व्यक्तिविकसन :** संघर्ष आणि जिद्दीला सलाम !!


**- सुरेंद्र पाटसकर**

**लेखमाला :** समस्या परिहार... (लेखांक ५) अडचण आणि समस्या यातील सीमारेषा **- संहिता करमळकर**

**समूहगीत :** नमस्कार देवा

**- अशोकराव निरफराके, विनयराव हर्डीकर**

---



**सौर पौष, शके १९३६। जानेवारी २०१५**
**वर्ष १५ अंक ४**

**कथा :** भुताचा वाडा **- मीनाक्षी केतकर**

**कविता :** वसा **- वंदना धर्माधिकारी,** सुंदर फसवी गंमत **- आश्लेषा महाजन**

**एकांकिका :** ज्ञानेश्वरी **- गायत्री मुळे**

**ललित :** पाढ्यांचं गाणं **- मल्हार अरणकल्ले**

**माहितीपर :** '१३ ग्रेनेडिअर्स...'**- कर्नल अविनाश केळकर,** पानगळ व पान प्रकल्प **- डॉ. कांचनगंगा गंधे**

**सद्य घडामोडी :** नव्या महाराष्ट्र सरकारपुढील आव्हाने **- ऐश्वर्या शेवाळे**

**समूहगीत :** हे वीर विवेकानंद **- वाच. स्वर्णलता भिशीकर**

---



**सौर माघ, शके १९३६। फेब्रुवारी २०१५**
**वर्ष १५ अंक ५**

**कथा :** 'माय' भूमी **- क्षितिज देसाई**
काकड्या **- अनु.अनघा भट-बेहेरे**

**कविता :** मायमराठी **- अंजली कुलकर्णी**
आपण सारे मित्र **- डॉ. सुमन नवलकर**

**माहितीपर :** विज्ञानयात्री मी आनंदयात्री **- डॉ. वसंत गोवारीकर,**
'न्यूट्रिनो' एक अद्‌भुत मूलकण **- डॉ. संजय ढोले**
राष्ट्रीय विकासासाठी विज्ञान**-डॉ. कांचनगंगा गंधे**

**लेखमाला :** (६) समस्या परिहार काही सूक्ष्म कौशल्ये **- डॉ. उर्मिला सडोलीकर**

**समूहगीत :** पंख पसरुनी विहरे त्याला...**- रामभाऊ डिंबळे**

---



**सौर फाल्गुन, शके १९३६। मार्च २०१५**
**वर्ष १५ अंक ६**

**कथा :** बगीचा **- श. मा. पाटील,**
घे भरारी आकाशी **- सुनंदा खानापूरकर**

**कविता :** लहानपण **- सुदेश पगार,**
खिडकी **- मृदुला पाठक**

**ललित :** माणसातला देव **- सुनील शिनखेडे,**
अभयारण्य भटकंती एक अविस्मरणीय अनुभव **- सुजाता लेले**

**प्रेरणादायी :** वेदनेतून फुलले गाणे **- मृणालिनी चितळे**
खेळाच्या शाळेने मला घडवले **- सविता कोकाटे**

**लेखमाला :** (७) समस्या परिहार प्रश्नावली **- मनीषा मिरजकर**

**समूहगीत :** खळखळ धावत **- विश्वनाथ गुर्जर**

---



**सौर चैत्र, शके १९३७। एप्रिल २०१५**
**वर्ष १५ अंक ७ – वासंतिक विशेषांक**

**कथा :** बागवान **- अनु. अनघा भट**

**कविता :** चैत्रभूल**- मुबारक शेख,**
टक्का टक्का **- आश्लेषा महाजन**

**एकांकिका :** प्रश्न आमचे! उत्तरे आमचीच!! **- डॉ. सावनी गोडबोले**

**ललित :** वाचनः एक आनंदसोहळा **- मुकुंदराज कुलकर्णी,**
वसंतोत्सव **- विद्याधर म्हैसकर**

**प्रेरणादायी :** नोबेल पुरस्काराची मानकरी गरत्रुड इलिअन **- डॉ. अनिल लचके**

**लेखमाला :** (८) समस्या परिहार : लोंगेवालाचा विजय **- राहुल कोकिळ**

**माहितीपर :** निसर्गरम्य'पीक डिस्ट्रीक्ट' **- कविता मेहेंदळे,**
रॉकेटवेड्या मुलांची कथा 'October Sky' **- सुप्रिया खोत**

**कृतिकौशल्य :** टाकाऊतून टिकाऊ **- मधुकर पालकर**

**समूहगीत :** हे गाणे मुक्त मनांचे **- डॉ. अनघा लवळेकर**

---



**सौर वैशाख, शके १९३७। मे २०१५**
**वर्ष १५ अंक ८**

**कथा :** धडपड्या धोंडी **- सरोज चौगुले**

**ललित :** हँगआऊट **- शिल्पा कुलकर्णी**

**कविता :** पाणी-मनात आत... **- आश्लेषा महाजन**

**माहितीपर :** चित्र समजून घेताना **- अमृता वर्तक-देव,**
छंदांविषयी **- जयश्री काटीकर,**
शिवलिंग मोहिम एक टर्निंग पॉईंट **- उमेश झिरपे**

**मुलाखत :** छंदातून कलानंदाकडे... **- कु. केवल मुळे**


**समूहगीत :** पाखरे भरारली **- वाच. स्वर्णलता भिशीकर**

**जसा मी मनातून येतो भरोनी। तसा तू घनातून ये पावसा।।**

**कलाक्षेत्रातील संस्था :** The School of Drama and Fine Arts, अरणत्तुकुरा (केरळ)-अभिनय प्रशिक्षण

काळासंगे धावण्यासाठी धरावी विज्ञानाची कास, सभासद होऊन **'छात्र प्रबोधन'**चे मिळतो हा विश्वास.


**सौर ज्येष्ठ, शके १९३७। जून २०१५**
**वर्ष १५ अंक ९**



**कथा :** ढोल्या - **डॉ. महेश केळुसकर**,
कुठे गेली नीरजा?
**- नीलिमा करमरकर**
**कविता :** डोंगर - **मुबारक शेख**,
ऊठ मुला - **एकनाथ आव्हाड**
**ललित :** कोरा स्पर्श-कोरा गंध - **सुनीला गोंधळेकर**
**माहितीपर :** निसर्गसंपन्न बांधवगड - **सुजाता लेले**,
भूकंप : एक विनाशकारी संकट - **डॉ. श्रीकांत कार्लेकर**,
चला करूया इतिहासाचा अभ्यास - **सुहासिनी देशपांडे**
**समूहगीत :** आव्हानांच्या गगनामध्ये-**डॉ. अनघा लवळेकर**

---

**सौर आषाढ, शके १९३७। जुलै २०१५**
**वर्ष १५ अंक १०, विद्यार्थी विशेषांक**



**कथा :** 'मित्रा'चे अंगणी
**- कु. रोहिणी जोशी**,
आणि... तिचे डोळे उघडले
**- कु. अश्विनी पाटील**
**कविता :** छाया ओल्या दुष्काळाची - **चि. श्रेयस पांडे**
पाऊस... - **कु. वेदश्री सिनकर**,
ओढ - **कु. वेदश्री पुराणिक**
**ललित :** येरे येरे पावसा - **चि. अमोघ वैद्य**,
मुक्त चिंतन - **कु. सई कामत, कु. तृप्ती मोरे, कु. तन्वी बोरा**,
हॅलो, मी मोबाईल बोलतोय- **चि. यदुनाथ कुलकर्णी**
**माहितीपर :** सिंधू संस्कृती-एक प्राचीन संस्कृती
**- कु. अनन्या जोगळेकर**,
देखणे कुरल - **कु. तेजल मेखे**,
सफर शिवथरघळीची - **कु. देवश्री जोगळेकर**,
ऑलिंपियाड विजेता - अभिषेक देढे,
।।तस्मै श्रीगुरवे नम:।। - **कु. मानसी पूरकर**,
पंढरीची वारी - **कु. गार्गी देवचके**,
Fast and Furious - 7 - **चि. रुचिर कुलकर्णी**,
**समूहगीत :** हाक तुझी परि मनी वसे - **रामभाऊ डिंबळे**

**सौर श्रावण, शके १९३७ । ऑगस्ट २०१५**
**वर्ष १५ अंक ११**



**कथा :** पोकळी - **कॅ. सुनील सुळे**
धाडसी नानीबाई - **अरूण फाळके**
**ललित :** चैतन्य - **मंदाकिनी गोडसे**
**कविता :** जादूगार - **सुमती पवार**,
सलाम - **प्राची कर्वे**
**माहितीपर :** भारतीय संस्कृती, जैवविविधता आणि पर्यावरण - **डॉ. कांचनगंगा गंधे**,
मुंगीबाई मुंगी - **डॉ. राहुल मराठे**,
ऑपरेशन म्यानमार आणि आंतरिक सुरक्षा
**- रणजित चव्हाण, निलेश वारणकर**
**व्यक्तिविकसन :** गणवेषाचा प्रभाव - **कॅ. अरविंद भावे**
**लेखमाला :** 'हे संचालक नमो' - **डॉ. नलिनी गुजराथी**
**समूहगीत :** विकसता विकसता - **कै. डॉ. आप्पा पेंडसे**

---



**सौर भाद्रपद, शके १९३७। सप्टेंबर २०१५**
**वर्ष १५ अंक १२ - रसास्वाद विशेषांक**
**कथा :** व्हाइसरायच्या भेटीचा दिवस
**- आ. ना. पेडणेकर**
**ललित :** आस्वादाच्या वाटेने
**- शैलजा देशमुख** ,
नेत्रसुख - **सुनीला गोंधळेकर**
भोवतीची गंधवार्ता - **आश्लेषा महाजन**
ऐकू आनंदे... - **शिल्पा कुलकर्णी**
जसा स्पर्श पाण्यावरी चांदण्यांचा- **अंजली कुलकर्णी**
जय खादाडी - **प्राची कुलकर्णी-गरुड**
मी अनुभवलेली अविस्मरणीय मैफल!- **शर्वरी जमेनिस**
दैवी प्रतिभेचे 'चित्र'रूप - **गोपाळ नांदूरकर**
भाग्ययोग - **मल्हार अरणकल्ले**
**कविता रसास्वाद :** पुस्तकांचं आभाळमन
**कविता :** आस्वादाचे अष्टक - **सुनील शिनखेडे**
**लेखमाला :** द्रष्टे समाजशिल्पी आप्पा पेंडसे (१)
**- डॉ. व. सी. ताम्हनकर**
**समूहगीत :** तत: किम् - **अशोकराव निरफराके**

---

**स्पर्धा-उपक्रम -** छात्र प्रबोधनतर्फे यावर्षी एकूण तीन राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन केले होते. १. तुम्हीच संपादक व्हा! हस्तलिखित स्पर्धा २. आपल्या गावातील कोणत्याही एका समस्येवर १० ते १५ मिनिटांची व्हिडिओ क्लिप तयार करणे. ३. 'छात्र प्रबोधन' अंकातील साहित्याचा वापर करून ३० मिनिटांची ध्वनिफीत तयार करणे. तर जोडीकार्य, कार्यानुभव आणि अभिवाचन कार्यशाळा असे उपक्रम राबवले गेले. वर्षभरात स्पर्धा-उपक्रम मिळून ३५० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

**मनात असू दे तुकया-ज्ञाना अभंग ओवी मळा । ये हृदयीचे ते हृदयी हा संतशब्द सोहळा।।**

**कलाक्षेत्रातील संस्था :** National School of Drama (NSD), नवी दिल्ली - अभिनय प्रशिक्षण

**'छात्र प्रबोधन'** सवे घेऊ झेप आकाशात, चंद्र सूर्यासवे गाणे गाऊ आनंदात.


# आस्वादाचें अष्टक

इंद्रधनुष्याचे
आयुष्य केवढे
करीतसे वेडे
क्षणार्धात ।।१।।

उन्हपावसाचा
गोफ विलक्षण
साजिरा श्रावण
सदानंदी ।।२।।

बघू जाता काही
दृष्टीचे नवल
जगण्याचे मोल
शब्दातीत ।।३।।

श्रुतींचे ही धन्य
अवघे जीवन
चित्र एकतान
रियाजाने ।।४।।



गंध सुमधुर
फुलांचाच प्राण
ऐसे समर्पण
सृष्टीमध्ये ।।५।।

काळ्या भुईतून
अंकुरते पीक
हिरवे कौतुक
डोळाभर।।६।।

एक काळी आई
चवींचे माहेर
अवघाचि संसार
रससिद्ध ।।७।।

बोलणे, ऐकणे
पाहणे, चाखणे
ईश्वराचे देणे
अनुभवा ।।८।।

**– सुनील शिनखेडे**
कार्यकारी अधिकारी, आकाशवाणी, बॅक बे रिक्लेमेशन, चर्चगेट, मुंबई 400020

---

***थोडीशी गंमत...*** **– वैजनाथ दुलंगे**




कौलाराला गोंजारत चांदण्याचे नितळ पाय। चंद्र जेव्हा डोलू लागे जीव तेव्हा हरखून जाय...।।

**कलाक्षेत्रातील संस्था :** The Government Film & Television Institute – बंगळुरु (कर्नाटक)–चित्रपट तंत्रशिक्षण

गाणं म्हणत जगण्यासाठी, फुलासारखं फुलण्यासाठी, हवं **'छात्र प्रबोधन'** हाती.

# छात्र प्रबोधन दिवाळी विशेषांक २०१५

## चाहूल छात्र प्रबोधन दीपावली विशेषांकाची

**काय वाचाल दिवाळी अंकात -**

- रंगतदार, कथा, कविता, ललित लेखांचा खजिना,
- विज्ञान-तंत्रज्ञान, अन्य माहितीपर लेख,
- शौर्य/वीरता या विषयावर खास विभाग!
- 'क्षण यशापयशाचे' ही प्रेरणादायी लेखमाला.
- कलाकौशल्य, विज्ञान प्रयोग
- याशिवाय विनोद, शब्दकोडी, गणिती कोडी, आणि बरेच काही...
- कुमारांच्या साहित्यासाठी खास पाने राखीव!

**विशेषांक समृद्ध करणारे काही मान्यवर लेखक -**
संजय ढोले, ऐश्वर्य पाटेकर, कृष्णात खोत, निसीम बेडेकर, सुहासिनी देशपांडे, हेरंब कुलकर्णी, श्रीधर लोणी, चारुहास पंडित, जयसिंह पेंडसे, गिरीश कुलकर्णी, गिरीश प्रभुणे, लताताई भिशीकर, मिलिंद शिंत्रे, आश्लेषा महाजन, शंतनू पांडे, अंजली कुलकर्णी अरुण म्हात्रे, मुकुंदराज कुलकर्णी

**नित्य दिवाळी विशेषांकाबरोबरच अन्य तीन दिवाळी अंकही त्यांच्या खास वैशिष्ट्यांसह प्रकाशित होणार आहेत. सर्व अंक एकत्रितपणे सी. डी. वरही उपलब्ध आहेत. या अंकांची स्वत:साठी व आपली भावंडे, मित्रमैत्रिणी यांच्याद्वारा मोठ्या प्रमाणावर नोंदणी करा.**

### - दिवाळी विशेषांकांची प्रकाशनपूर्व नोंदणी किंमत -

| नित्य मासिकाचा दिवाळी अंक | इंग्रजी | ग्रामीण | युवोन्मेष | चारही अंकांचा एकत्रित संगणकीय (Pdf) अंक सी.डी. |
|---|---|---|---|---|
| ₹ ५० | ₹ ५० | ₹ ४० | ₹ ५० | ₹ ६० |

**ज्या शाळांमध्ये एकाच अंकाची १०० पेक्षा अधिक नोंदणी होईल त्यांना तो अंक विशेष सवलतीत रु. ४० ला उपलब्ध!**

**प्रकाशनपूर्व सवलतीतील नोंदणीचा अंतिम दिनांक ३० सप्टेंबर २०१५**

**प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी आवाहन –**'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकाची तुम्ही आणि सारा महाराष्ट्र आतुरतेनं वाट बघत असतो. अत्यंत दर्जेदार असा आपला यावर्षीचा दिवाळी अंक तयार होतो आहे. **यावर्षी दिवाळी अंकाच्या जास्तीत जास्त नोंदणीसाठी तुम्ही विशेष प्रयत्न करा आणि किमान १० अंकांची नोंदणी करा.** यासाठी दिवाळी अंकांची माहितीपत्रके वितरण केंद्रांवर ५ सप्टेंबरपर्यंत पाठवली जाणार आहेत. त्या केंद्रांशी संपर्क करून तुम्ही ती नेऊ शकाल व त्याआधारे तुमच्या शाळेत व परिसरात मोठ्या प्रमाणावर नोंदणी करा.

**आपल्या गावात वितरण केंद्र सुरू करण्यासाठी आवाहन –**छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकाची ऑगस्टअखेर निश्चित झालेल्या वितरण केंद्रांची यादी पुढे दिली आहे. आपल्या गावात वितरण केंद्र नसल्यास तुम्ही तुमच्या आईवडिलांच्या, शिक्षकांच्या मदतीने वितरण केंद्र सुरू करावे. त्यासाठी तुम्हाला वार्षिक वर्गणी भरून १० सभासद मिळवावे लागतील व ५० दिवाळी अंकांची नोंदणी करावी लागेल. तुमच्या गावातील शाळा, क्लासेस व तुमचे परिचित यांच्याद्वारा हे नक्कीच जमू शकेल. वितरण केंद्र सुरू करायची इच्छा असल्यास तातडीने संपर्क करावा. **(सुदेश पगार – ८२७५५१५५१४)** महाराष्ट्रातील अधिकाधिक गावांमध्ये वितरण केंद्रे सुरू व्हावीत अशी आमची इच्छा आहे.

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील सभासदांना साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. अंक न मिळाल्यास वेगळा अंक पाठवला जाणार नाही. खात्रीशीरपणे दिवाळी अंक मिळण्यासाठी रु. ४०/- जादा पाठवावेत. त्या सर्वांना कुरिअर/रजिस्टर्ड पोस्टाने अंक पाठवले जातील.

**दिवाळी अंक वितरण केंद्रे –** पुढील शहरांत/गावांत छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकांच्या नोंदणी व वितरणाचे काम करणारे काका-काकू किंवा ताई-दादा आहेत, त्यांच्याकडे जाऊन तुम्ही तुमचा दिवाळी अंक १ नोव्हेंबरनंतर घेऊन जावा. कोणतेही कमिशन न घेता, स्वयंसेवी वृत्तीने महाराष्ट्र व गोव्यात गावोगावचे कार्यकर्ते अत्यंत मन:पूर्वक आपल्यापर्यंत हा अंक पोहोचावा म्हणून काम करीत असतात. त्यांना सर्व प्रकारे सहकार्य करावे.

**उसळत्या सागरी स्वप्न झिंगत्या लाटा। खुणवत्या साहसी दूरदूरच्या वाटा।।**

**कलाक्षेत्रातील संस्था :** Mindscreen Film Institute, चेन्नई, सिनेमॅटोग्राफी, पटकथा लेखन



सर्वांगीण विकसनातून मिळवून देण्या आत्मविश्वास, **'छात्र प्रबोधन'** मासिकाचा नित्य असे हा ध्यास.

# छात्र प्रबोधन दिवाळी विशेषांक २०१५ नोंदणी व वितरण केंद्रे

### विभाग १. बोरीवली (प. मुंबई)

| | | |
|---|---|---|
| बोरीवली | सौ. सुमिता पांढरे | ☎ ९९६९०५१५७३ |
| विलेपार्ले | श्री. दत्तात्रय जोशी | ☎ ९८६९०६३७७२ |
| बांद्रा | श्री. मिलिंद चिंदरकर | ☎ ९३२२२४२५६९ |
| गिरगाव | श्रीमती शिरीषा खरे | ☎ २२-२३८८६९३५ |
| चेंबूर | अनघा पंडित | ☎ ९८६९४५०००१ |
| विरार-वसई | श्री. फ्रान्सिस डिमेलो | ☎ ९८५०१८२६६१ |
| पालघर | श्री. तुषार राऊत | ☎ ९८६०२०३१०० |
| दादर | श्री. सतीश पै | ☎ ९८२०२६७३२७ |

### विभाग २. डोंबिवली (मध्य मुंबई, ठाणे)

| | | |
|---|---|---|
| ठाणे | सौ. सुप्रिया बर्वे | ☎ ९८६९११५०४१ |
| डोंबिवली | श्रीमती दीपाली हिंगणे | ☎ ९९३०३४३८२२ |
| कल्याण | सौ. स्मिता मनोरे | ☎ ९९२०९४८७७८ |
| अंबरनाथ | सौ. अश्विनी कुलकर्णी | ☎ २५१-२६०१४११ |
| बदलापूर | श्रीमती कुमुद पटवर्धन | ☎ ८००७०५९९३५ |

### विभाग ३. अलिबाग (रायगड, नवी मुंबई)

| | | |
|---|---|---|
| अलिबाग | श्री.राम जोशी | ☎ ९४२०८३५६५० |
| नागाव | सौ. स्नेहा जोशी | ☎ २१४१-२४५६६१ |
| नागोठणे | सौ. सुलभा गोखले | ☎ २१९४-२७७९०३ |
| मुरुड | सौ. दीपाली जोशी | ☎ ९९६०८६६१७७ |
| देवगड | श्री. जयेश खाडिलकर | ☎ ९४०३५९५१७५ |
| महाड | सौ. रंजना देंडवाल | ☎ ०२१४५-२२४८७९ |
| रसायनी | सौ. शुभदा कोकीळ | ☎ ९८८१९०३६७३ |
| वाशी | सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर | ☎ २२-२७८०१९६८ |

### विभाग ४. रत्नागिरी (रत्नागिरी, सिंधुदुर्ग)

| | | |
|---|---|---|
| रत्नागिरी | सौ. प्रतिभा प्रभुदेसाई | ☎ २३५२-२२२९५३ |
| पावस | सौ. शीतल सामंत | ☎ ९४२११३९५३० |
| चिपळूण | श्री. प्रसाद काणे | ☎ ९४२२४३०९०० |
| गुहागर | श्रीमती मीरा साठे | ☎ ९४२११४१५२८ |
| राजापूर | श्री. संजय कुलकर्णी | ☎ ९४२१२२९७५७ |
| खेड | सौ. नम्रता दामले | ☎ ९४२२४३३९४९ |
| कुडाळ | श्री. उमेश सामंत | ☎ ९४२२९६३५१७ |
| सावंतवाडी | सौ. वंदना करंबेळकर | ☎ ९८५०४७३०१२ |
| कणकवली | श्री. औदुंबर भागवत | ☎ ९४२११४७५१३ |
| तळेरे | डॉ. मनीषा नारकर | ☎ ९४२२४३५४०१ |

### विभाग ५. फोंडा (गोवा)

| | | |
|---|---|---|
| फोंडा | श्री. मोहन आमशेकर | ☎ ९४२२०५८८७३ |
| मार्दोळ | श्री. शिरीष आमशेकर | ☎ ९४२११५८९२२ |
| वास्को | सौ. दीपा गावकर | ☎ ९९२१८९७०९६ |
| परवरी | श्री. वल्लभ केळकर | ☎ ९४२०८१८४८३ |
| म्हापसा | श्री. प्रशांत बर्वे | ☎ ९४२२४५६५५५ |
| डिचोली | श्री. गणेश जोशी | ☎ ९४०५९२१२३१ |

### विभाग ६. इचलकरंजी (कोल्हापूर)

| | | |
|---|---|---|
| इचलकरंजी | श्री.विनायक गद्रे | ☎ ९८८१५९००१८ |
| कुरुंदवाड | श्री. गोपाळ जोशी | ☎ ९८५०९६४८१९ |
| कुंभारी | सौ. सुषमा टंकसाळे | ☎ ९४०५८५६३२० |
| महागाव | श्री. सुभाष सुतार | ☎ ९०९६७१२८१३ |

### विभाग ७. सांगली

| | | |
|---|---|---|
| सांगली | श्री. शैलेंद्र केळकर | ☎ ९४२२६१६०५८ |
| तासगाव | श्री. प्रसाद हसबनीस | ☎ ९४२३८१०४०९ |
| ३२ शिराळे | श्री. सुहास दळवी | ☎ ९९२३७११७७४ |
| कडेगाव | डॉ. मकरंद बर्वे | ☎ ९९२२२१२९०३ |
| मिरज | श्री. श्रीकांत कुलकर्णी | ☎ ९३७२२२३४८५ |

### विभाग ८. सातारा

| | | |
|---|---|---|
| सातारा | श्री. सतीश कुलकर्णी | ☎ ९४२३२६०२६० |
| कोरेगाव | डॉ. मिलिंद शहा | ☎ ९८२२०२३२०८ |
| कराड | श्री. दत्तात्रय कुलकर्णी | ☎ २१६४-२२२५०५ |
| उंब्रज | डॉ. धनंजय कुलकर्णी | ☎ ९४०३५४६९१३ |
| खंडाळा | श्री. अरुण फाळके | ☎ ९८९०६०९६३१ |

### विभाग ९. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| सोलापूर | ज्ञान प्रबोधिनी | ☎ ०२१७-२३१७७८२ |
| पंढरपूर | श्री. दीपक इरकल | ☎ ९४२३५६३८९५ |

### विभाग १०. कर्जत (अहमदनगर)

| | | |
|---|---|---|
| संगमनेर | श्री. अशोक भारंबे | ☎ ९९२१६४४२११ |
| कोपरगाव | डॉ. अंजली फडके | ☎ ९३२५९५०१२१ |
| शिर्डी | डॉ. प्रबोध जोशी | ☎ ९४२१५५८४६६ |
| कर्जत | श्री. गजानन चावरे | ☎ ९९६०११८५८६ |
| पारनेर | सौ. सविता रेपाळे | ☎ ९९२२२५१६६७ |
| श्रीगोंदा | श्री. महेशकुमार शिंदे | ☎ ९९२१२७९४१६ |

### विभाग ११. उत्तर महाराष्ट्र

| | | |
|---|---|---|
| नाशिक | श्री. अनिल दंडगव्हाळ | ☎ ९४२२२४८२६४ |
| धुळे | श्री. एन. एम. जोशी | ☎ ९४२१५००८८२ |



अंकूर हलती थुईथुई फोडत येती लाल भुई। सूर्य उगवता तिरीप होते किरणांची कोवळी सुई।।

**कलाक्षेत्रातील संस्था :** Annapurna International School of Film & Media हैद्राबाद

धडपडणाऱ्या मुलामुलींना संधी देते **'छात्र प्रबोधन'**; शक्ती, युक्ती, बुद्धि मिळते वाचून त्यातील विचारधन.

| | | |
|---|---|---|
| देऊर बु।। | श्रीमती स्वरूपा देवरे | ☎ ७५८८६२८८११ |
| शिरपूर | प्रा. वैशाली पाटील-देवरे | ☎ ९८२३२९९९७३ |
| दोंडाईचा | श्री. सुभाष जैन | ☎ ९८२३४१६८४४ |
| नंदूरबार | डॉ. वैशाली काणे | ☎ ९४२३९८०२९६ |
| शहादा | सौ. सुनीता पटेल | ☎ ९४२०२७११०१ |
| जळगाव | श्री. अनिल भोळे | ☎ ९४२०६६२७१४ |
| अमळनेर | श्री. दत्तात्रय सोनावणे | ☎ ९४२०१११८२ |
| चोपडा | श्री. सुधाकर केंगे | ☎ ९४२३९१५५२९ |
| चाळीसगाव | डॉ. मुकुंद करंबेळकर | ☎ ९८२२२६३२७९ |
| भुसावळ | श्री. अनिल जोशी | ☎ ९३२६११८०२८ |

**विभाग १२. मराठवाडा**

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | सौ. भारती कुलकर्णी | ☎ ९३२४०११३४९ |
| जालना | श्री. विजय देशमुख | ☎ ९४२३४५७६५५ |
| बीड | श्री. कैलास लिंगे | ☎ ९८८१४५१३५७ |
| अंबाजोगाई | ज्ञान प्रबोधिनी | ☎ ९४२१६२२६०९ |
| माजलगाव | श्री. निरंजन वाघमारे | ☎ ९८८१८६७१२३ |
| धाराशिव | श्री. बालाजी माळी | ☎ ९४०३३९११०६ |
| हराळी | ज्ञान प्रबोधिनी | ☎ ८८८८८०२६०४ |
| लातूर | श्री. अमोल होनमाळे | ☎ ८१४९९६०५५५ |
| परभणी | श्री. प्रताप देशपांडे | ☎ ९४०४९७४६१९ |
| सेलू | श्री. भालचंद्र गांजापूरकर-जोशी | ☎ ९४२२८६९५२२ |
| नांदेड | सौ. मीरा तातोडे | ☎ ९८८१०९१०५४ |

**विभाग १३. विदर्भ**

| | | |
|---|---|---|
| अकोला | श्री. भूषण बापट | ☎ ९८५०३८६४९४ |
| अमरावती | श्री. प्रदीप व्यवहारे | ☎ ९८६०६७४७७२ |
| यवतमाळ | श्री. केशवराव वानखेडे | ☎ ७२७६१८१८६३ |
| वर्धा | श्री. मंदार देशपांडे | ☎ ९४२०४१५६४८ |
| उमरखेड | श्री. धनंजय कुदे | ☎ ९४०३४६००४८ |
| चंद्रपूर | श्री. मुकुंद घरोटे | ☎ ९०११६३१६५८ |
| वरोरा | श्री. उमेश लाभे | ☎ ९४०३२४२७०५ |

**विभाग १४. पुणे**

| | | |
|---|---|---|
| पुणे शहर | छात्र प्रबोधन मुख्य केंद्र | ☎ २०-२४२०७१७४ |
| निगडी | ज्ञा.प्र. नवनगर विद्यालय | ☎ २०-२७६५४३८० |
| चिखली | श्री. गौतम इंगळे | ☎ ९७३०२३७३८८ |
| साळुंब्रे | ग्राम प्रबोधिनी विद्यालय | ☎ २११४-२२३३७१ |
| शिवापूर | श्री. संजीव तागडे | ☎ २०-२४३८४०१३ |
| इंदापूर | श्री. तुषार रंजनकर | ☎ ९४२२३२९६१६ |
| चाकण | डॉ. अविनाश अरगडे | ☎ ९४२३५७१५५२ |
| शिरूर (घोडनदी) | श्री. प्रशांत अवचट | ☎ ९८८१०४९४३८ |
| बारामती | सौ. मयुरा कानिटकर | ☎ ९४२३५८४३२४ |
| सासवड | सौ. कल्पना खांडेकर | ☎ ९४२३२०८१०१ |
| भोर | सौ. शुभांगी मुकादम | ☎ ९६२३०९३९६० |

## प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष १५/१२)

**हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...**

या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ ऑक्टोबर २०१५ पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

**प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) 'आस्वादाच्या वाटेने' प्रवास करत असताना कोणकोणत्या गोष्टी तुम्हाला महत्त्वाच्या वाटतात?

२) नेत्रसुखाच्या बाबतीत 'पाहाणे' आणि 'दिसणे' यातला फरक लेखात कसा उलगडून दाखवला आहे?

३) एखाद्या आवाजाचा आस्वाद आपण कोणकोणत्या पद्धतींनी घेऊ शकतो? उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

४) 'भाग्ययोग' या लेखात लहानपणी आपल्या खेड्यात अनुभवलेले कोणकोणते विविध आवाज लेखकाला आजही आठवतात?

५) 'द्रष्टे समाजशिल्पी' आप्पा या लेखमालेतील लेखात आप्पांचे संगीतप्रेम व संगीताची जाण कोणकोणत्या गोष्टीतून दिसून येते?

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० भाद्रपद, शके १९३७, १ सप्टेंबर २०१५ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.



स्वामी विवेकानंदांचे तैलचित्र – चित्रकार कै. एस. एम. पंडित
संदर्भ – अंकातील पान क्र. ३३ वरील ‘दैवी प्रतिभेचे ‘चित्र’रूप’ हा लेख

सौर भाद्रपद, शके १९३७/सप्टेंबर २०१५ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० भाद्रपद, शके १९३७ /१ सप्टेंबर २०१५
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 /2015 - 2017,
Posted at S.P. Post Office, Pune - 30, on 1st of Every Month



भंडारदरा धरणाजवळील रतनवाडी गावातील प्राचीन अमृतेश्वर मंदिराचे हे प्रकाशचित्र आहे.
पार्श्वभूमीला रतनगड घेता आल्यामुळे चित्राला संदर्भ प्राप्त झाला आहे.

महेन्द्र सेठिया, jpmahen@gmail.com

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा. सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.

**सौर दिनदर्शिका**
**शके १९३७**

| | सप्टेंबर २०१५ | भाद्रपद आश्विन |
|---|---|---|
| मं | 1 | १० |
| बु. | 2 | ११ |
| गु. | 3 | १२ |
| शु. | 4 | १३ |
| श. | 5 | १४ |
| र. | 6 | १५ |
| सो. | 7 | १६ |
| मं. | 8 | १७ |
| बु. | 9 | १८ |
| गु. | 10 | १९ |
| शु. | 11 | २० |
| श. | 12 | २१ |
| र. | 13 | २२ |
| सो. | 14 | २३ |
| मं. | 15 | २४ |
| बु. | 16 | २५ |
| गु. | 17 | २६ |
| शु. | 18 | २७ |
| श. | 19 | २८ |
| र. | 20 | २९ |
| सो. | 21 | ३० |
| मं. | 22 | ३१ |
| बु. | 23 | आ. १ |
| गु. | 24 | २ |
| शु. | 25 | ३ |
| श. | 26 | ४ |
| र. | 27 | ५ |
| सो. | 28 | ६ |
| मं. | 29 | ७ |
| बु. | 30 | ८ |

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे
411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ ३०
वार्षिक वर्गणी : ₹ २००

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -